# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ११/२००५.** **दिनांक ०६.०८.२००५.**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०६ ऑगष्ट, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील एसएसएस -वशी-०४-८०२५ -२००५, दिनांक ३० जुलै, २००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०६ ऑगष्ट, २००५ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील. | ०४. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०५. | मा.श्री.प्रकाश रामदास काळे. | ०६. | मा. श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव. |
| ०७. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे. | ०८. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर. |
| ०९ | मा.श्री. रमाकांत गणेश कर्णिक. | १०. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर. |
| ११. | मा. श्री. कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय. | १२. | मा. डॉ. पी. एल. तिवारी. |
| १३. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. | | |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा. कॅप्टन सुरेश वासुदेवा, यांचे दूरध्वनी निरोपांची तसेच मा.श्री.समि खतिब यांचे पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दुखवट्याचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

" मंगळवार दिनांक २६ जुलै, २००५ रोजी व त्या दरम्यान महाराष्ट्राची राजधानी, देशाची अर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. या प्रचंड पावसामुळे महाराष्ट्रातील मुंबईसह अनेक शहरात नद्यांच्या महापूराचे पाणी भरले.यामुळे महाराष्ट्रात प्रचंड मनुष्य, प्राणी व वित्तहानी झाली आहे. अनेक लोक बेघर झाले.अनेक लोकांना प्राणास मुकावे लागले .

या दुर्घटनेत मरण पावलेल्या लोकांच्या कुटुंबीयांचे दु:खात सर्व विश्वस्त, संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत"

यांनतर या सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून अतिवृष्टीमूळे मरण पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण केली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१. व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ व दि.१८.०७.२००५ रोजी अनुक्रमे शिर्डी व मुंबई येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३८९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.०२. व्यवस्थापन समितीचे दि.१७.०७.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या शिक्षण सेवकांच्या मुलाखत सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. ३९०.** व्यवस्थापन समितीचे दिनांक **१७.०७.२००५** रोजी शिर्डी येथे झालेल्या शिक्षण सेवकांच्या मुलाखत सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना )

**विषय नं.०३. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०५.२००५ व दिनांक ०८.०५.२००५ रोजी अनुक्रमे मुंबई व शिर्डी येथे झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.३९१.** व्यवस्थापन समितीचे दिनांक **३.०५.२००५** व दिनांक **०८.०५.२००५** रोजी मुंबई व शिर्डी येथे झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना )

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. जमाखर्च तक्ता जून, २००५**

**निर्णय क्र.३९२. (A).** माहे जून,२००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे जून, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ३९२. (B).** माहे जून, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. माहे जून, २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (C).** माहे जून, २००५ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे जून, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (D).** माहे जून, २००५ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीचे तपशीलवार विवरण, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (E).** माहे २६ जून, २००५ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे**

**निर्णय क्र. ३९२. (F).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. ३९२. (G).** माहे जुलै, २००५ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येतात. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०८. माहे जून, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (H).** माहे जून, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या लिलावाद्वारे झालेल्या विक्रीच्या अहवालाची, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०९. माहे जून, २००५ मध्ये मा. कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (I).** माहे जून, २००५ मध्ये रुपये २५, ०००/- चे मर्यादेत मा. कार्यकारी अधिकारी, यांचे मान्यतेने विविध आवश्यक बाबींवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**१०. रुग्णालयातील रुग्णांना माहे जून, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ३९२. (J).** माहे जून,२००५ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे कॅथलॅब इक्विपमेंट, व्हेंटिलेटर्स, मॉनिटर्स, इ. खरेदीसाठी प्राप्त झालेली कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. ३९३** दि.०६/०८/२००५ रोजी सकाळी ११ वाजता विश्वस्त सभा आयोजित केली होती. त्यात विषय क्र.५,६,७,८ साठी निर्णय उपसमितीने घ्यावेत असा निर्णय झाला. या सभेत मशिनरी व फर्निचर खरेदीकामी पुढीलप्रमाणे तज्ञांना पाचारण करण्याचे ठरले होते. १) डॉ.श्रीकांत केळकर, दीनानाथ मंगेशकर हॉस्पीटल,पुणे २) डॉ.प्रमोद सरनोत, निरामय हॉस्पिटल, पुणे ३) डॉ.चारुदत्त आपटे, सहयाद्री ग्रुप, पुणे ४) The Dean, Pravara Medical Trust, Loni. यापैकी डॉ.प्रमोद सरनोत सभेस उपस्थित होते.

**त्या अनुषंगाने उपसमिती सभेत खालील सदस्य उपस्थित होते.**

मा.डॉ.पी.एल.तिवारी
मा.डॉ.इ.बी.गोंदकर
डॉ. प्रमोद सरनोत, निरामय हॉस्पिटल, पुणे
डॉ.विद्याधर टाकळकर - वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये

मा.व्यवस्थापन सभा दि.१७/०४/२००५ विषय क्र.०९, निर्णय क्र.१५० अन्वये सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी खरेदी करावयाचे विविध मशिनरी, फर्निचर, उपकरणे, कार्यालयीन फर्निचर इत्यादीसाठी अंदाजे रु.९,७४,२१,८५२/- चे खर्चास मान्यता मिळाली आहे. विषय क्र.५ च्या खरेदी संबंधी अर्धी

प्रक्रिया दि.१८/०७/२००५ रोजीच्या मुंबई येथील सभेत १० प्रकारच्या मशिन्सबद्दल अगोदरच निर्णय घेण्यात आला आहे. त्यांचा सविस्तर वृत्तांत सादर करण्यात आला आहे.

दि.०६/०८/२००५ रोजीच्या विश्वस्त सभेत इतर ९ मशिन्सचा विचार झाला. या ९ मशिन्सपैकी भूल देण्याच्या मशिन्स सोबत दिय शस्त्रक्रिया विभागात वापरण्यात येणाऱ्या मॉनिटर विषयी मागील सभेत वाटाघाटी झाल्या होत्या. त्यानुसार १ कार्डियॅक मॉनिटर कार्डियॅक थिएटरसाठी २.५ लाखाला फिलिप्स कंपनीकडून घेण्याचे नक्की करण्यात आले. इतर मशिन्सविषयी सविस्तर अहवाल खालील प्रमाणे -

**१) बॉइल्स अनस्थेशिया मशिन, रेस्पिरेटरसहित** - या मशिन्ससाठी ६ निविदा आल्या होत्या. त्यातील पाच जण उपस्थित होते. सदर निविदांचा तपशील खालील प्रमाणे

| नं. | कंपनीचे नाव | मॉडेल | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| अ) | HL, Mumbai | FABIUS ३ | रु.१५,२८,८०७/- | रु.१२,००,०००/- + १२.५% व्हॅट |
| ब) | L & T, Pune | ELIT ६१५ + EV ५०० | रु.३,९६,०००/- | रु.३,८०,०००/- |
| क) | EMPIRE, Mumbai | मोठे मॉडेल | रु.६,००,०००/- | १५ टक्के डिस्काउंट रु.५,९२,०००/- |
| | | लहान मॉडेल | रु.३,९२,०००/- | १५ टक्के डिस्काउंट |
| ड) | Datex, Mumbai | मोठे मॉडेल | रु.९,७५,०००/- | अनुपस्थित |
| | | लहान मॉडेल | रु.६,५०,०००/- | अनुपस्थित |
| इ) | Hospitech, Mumbai | मोठे मॉडेल | रु.२,८५,०००/- | रु.२,३०,०००/- |
| | | मध्यम मॉडेल | रु.२,२५,०००/- | रु.२,१०,०००/- |
| | | लहान मॉडेल | रु.२,१०,०००/- | रु.१,९०,०००/- |
| ई) | Qualisurge, Pune | मोठे मॉडेल | रु.९५,०००/- | रु.९५,०००/- |
| | | लहान मॉडेल | रु.८०,०००/- | रु.८०,०००/- |

अ) एच.एल.मुंबई या कंपनीने तांत्रिकदृष्टया सर्वोत्कृष्ट अशी मशीन जी कार्डिओलॉजी साठी आवश्यक आहे. रु.१५,२८,८०७/- रुपयांस आयात करुन देण्याची निविदा भरली होती. वाटीघाटीव्दारे हा दर रु.१२,००,०००/- अधिक १२.५% व्हॅट असा कबूल करण्यात आला व असा १ नग त्यांचेकडून खरेदी करावा असा निर्णय झाला.

ब) इतर २ नगाबाबत एल अँड टी, पुणे यांनी सादर केलेल्या निविदांचा विचार करण्यात आला. त्यांनी त्यांच्या ELITE ६१५ + EV ५०० या मशिनसाठी रु.३,९६,०००/- रुपयांची निविदा भरली होती. वाटाघाटी नंतर या निविदेचे दर रु.३,८०,०००/- असे मान्य करण्यात आले. अशा २ नगांसाठी खरेदीची मान्यता देण्यात आली.

इतर मशिन्स किंमतीत कमी असल्या तरी तांत्रिकदृष्टया वरील प्रमाणे सक्षम नव्हत्या. त्यामुळे खरेदीसाठी विचारात घेतल्या नाहीत.

**२) बॉईल्स अनस्थेशिया मशिन जनरल** - सदर कामी खालील ०६ निविदा आल्या होत्या. त्यातील ०५ निविदाधारक हजर होते.

| अ.न. | कंपनी | मॉडेल | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Global, Nashik | MA ३०० मॉडेल | रु.५२,५००/- | रु.५०,०००/- | - |
| ०२ | EMPIRE, Mumbai | - | रु.३,९४,३९४/- | रु.१५ टक्के सूट १० वर्षे वॉरंटी | - |
| ०३ | Hospitech, Mumbai | Major | रु.५०,०००/- | रु.४५,०००/- | - |
| ०४ | Datex, Mumbai | Basic SE-२ | रु.१,७५,०००/- | रु.१,७५,०००/- | अनुपस्थित |
| ०५ | Qualisurge, Pune | Pedius CNL | रु.८०,०००/- | रु.८०,०००/- | - |
| ०६ | L & T, Pune | ELITE ६१५ | रु.२,००,०००/- | रु.१,९०,०००/- | - |

या मशिनच्या ४ नगांची मागणी आपण नोंदविली होती, त्यापैकी सर्वोत्तम अशा एल & टी कंपनीने सादर केलेल्या ELITE -६१५ प्रकारच्या मशिनचे दर रु.२,००,०००/- प्रत्येकी सादर केले आहेत. वाटाघाटी नंतर हा दर रु.१,९०,०००/- प्रत्येकी असा मान्य करण्यात आला व सध्या अशा २ मशिन्सची खरेदी करावी असे ठरविण्यात आले.

इतर निविदा किंमतीने कमी असल्या तरी तांत्रिक क्षमतेतही कमी असल्यामुळे खरेदीसाठी विचार करण्यात आला नाही.

अद्यावत् तांत्रिक क्षमता व किंमत यासंबंधी समन्वय साधून रुग्णांच्या हितास्तव वरील एल & टी चे २ नग सध्या घेण्याचे निर्णय झाला.

०३ ) **Ph & Blood Gas analyser** -

| अ.नं | कंपनीचे नाव | मॉडेल | निविदा किंमत | वाटाघाटी नंतरचे दर | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Compact, New Delhi | -- | रु.३,८६,१००/- | रु.३,८६,१००/- | वॉरंटी ३ वर्षे<br>४५० टेस्ट पॅक फ्री |
| ०२ | Analytical, Mumbai | ABL ५ | रु.४,३४,०००/- | ५ टक्के सुट<br>३ महिन्यांचे केमिकल्स | २ वर्षे वॉरंटी |
| | | ABL ५५५ | रु.७,२०,०००/- | | |
| ०३ | Cyronics, Mumbai | RMA Model | रु.२,९५,०००/- | रु.२,५०,०००/- | all inclusive |
| ०४ | Rosh, Mumbai | - AVL Compact ३ | रु.६,१८,७५०/- | - | - |
| | | - Omni-C | रु.७,८७,०००/- | रु.६,००,०००/- अधिक कर | २ महिन्यांचे केमिकल्स मोफत |

यासाठी ४ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तांत्रिकदृष्टया रोश,मुंबई कंपनीची मशिन सर्वोत्तम आढळली, त्यांनी रु.७,८७,५००/- रुपयांची निविदा आपणाला आवश्यक असलेल्या मोठया अद्यावत् मशिनसाठी दिली होती. वाटाघाटी नंतर त्याची किंमत रु.६,००,०००/- अधिक व्हॅट टॅक्स १२.५% असा ठरला. दोन महिन्याचा Chemicals चा पुरवठाही मोफत दिला जाईल असे कबूल केले आहे. ज्याच्या १ पॅकची किंमत अंदाजे रु.२८,०००/- असेल अशी १ मशिन सध्या घ्यावी असा निर्णय झाला.

४) **Aortic Baloon Pump** -

| अ.नं | कंपनीचे नाव | मॉडेल | निविदा किंमत | वाटाघाटी नंतरचे दर | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Advanced, Mumbai | Data Scope CS-१०० | रु.२१,७७,६६४/- | रु.१९,३५,०००/- + कर | २ बलुन जास्तीचे मोफत |
| ०२ | Inter Medics | Autocat - २ | रु.१७,१०,०००/- | रु.१६,७०,०००/- + कर + Exise+ Clearing | २ बलून ज्यादा |

वरीलपैकी तांत्रिक क्षमतेत जेष्ठ असलेले Data Scope CS-१०० मॉडेल रु.१९,३५,०००/- अधिक व्हॅट कर १२.५% अशा अटीवर व शिवाय अधिकचे २ बलून (ज्यांची किंमत अंदाजे रु.३४,०००/- प्रत्येकी ) मोफत पुरवठा करण्याच्या अटीवर १ मशिन खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

५) **Heart Lung Machine** - यासाठी खालील २ निविदा धारकांसोबत वाटाघाटी करण्यात आल्या त्याचा तक्ता खालील प्रमाणे

| अ.नं. | कंपनीचे नाव | मॉडेल | निविदा किंमत | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | मॅके, मुंबई | Jostra HL ५ Pump | युरो रु.८८,०००/-<br>रु.४९,२८,०००/- | युरो रु.८३,६००/-<br>रु.४३,८९,०००/- + Clearance |
| ०२ | कार्डिओ प्रॉडक्टस्, मुंबई | स्टॉकर्ट ५ पंप | रु.३३,२५,०००/- | रु.३१,३२,०००/- + ६.२ टक्के Duty Clearance |

तांत्रिक क्षमतेत वरील २ कंपन्यापैकी मॅके कंपनी उच्चतम असल्यामुळे जास्त किंमत असूनही मॅके कंपनीचे ५ पंप असलेले Jostra HL Model रु.४३,८९,०००/- रुपयांस १ मशिन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

६) **X-ray Film Autoprocessor & Dryer** -

यासाठी निविदा उपलब्ध झाल्या नाहीत.

७) **Gastroscope** -

| अ.न. | कंपनीचे नांव | मॉडेल | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|
| अ) | ग्लोबल, नाशिक | SMOIK | रु.३,८०,०००/- | रु.३,८०,०००/- | |
| ब) | साऊथ इंडिया सर्जिकल, चैन्नई | ---- | रु.१३,२६,०००/- | रु.१०,५०,०००/- | all Inclusive |

वरीलपैकी तांत्रिक क्षमतेत **'ब'** श्रेष्ठ असल्याने किंमत जास्त असूनही साऊथ इंडिया सर्जिकलच्या १ सेटची निवड करण्यात आली आहे. त्याच्या खरेदीस मान्यता देण्यात आली. त्याची किंमत FOR Shirdi रु.१०,५०,०००/- मान्य करण्यात आली.

**८) <u>Pulm. Function Test Machine</u> -**

या विषयात ४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्या खालील प्रमाणे

| अ.नं. | कंपनीचे नांव | मॉडेल | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|
| i) | नासान, पुणे | | रु.८५,०००/- | रु.८५,०००/- | अनुपस्थित |
| ii) | Esbee, मुंबई | मास्टर स्कोप पी.सी. मॉडेल | रु.५,३४,०००/- | रु.४,८५,०००/- | P.C. मोफत |
| iii) | ग्लोबल, नाशिक | डी टी स्पायरो | रु.७०,०००/- | रु.६५,०००/- | - |
| iv) | देवी सर्जिकल, अहमदनगर | ------ | रु.५५,०००/- | रु.५४,०००/- | - |

तांत्रिक क्षमतेत Esbee, मुंबई यांची मशिन उत्कृष्ट दर्जाची असल्यामुळे किंमत जास्त असूनही तिचा १ नग रु.४,८५,०००/- रुपयांस खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

**९) <u>A - ऑपरेशन थिएटर लाईटस्</u>** - यासाठी एकंदर ७ कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्या खालील प्रमाणे -

| अ.नं. | कंपनीचे नाव | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | जनक, मुंबई (AXL ५५०१) | रु.५,६९,०००/- | रु.५,५०,०००/- |
| ०२ | हॉस्पिटेक, मुंबई | रु.२,६५,०००/- | १० टक्के सवलत |
| ०३ | मिनिटेक, मुंबई मॉडेल १ | रु.२,८८,२५०/- | रु.२,३७,८०६/- |
| | मॉडेल २ | रु.३,६०,०००/- | रु.२,९७,०००/- |
| ०४ | HL, Mumbai<br>Sola -७००-५००-५०० | रु.१४,९२,५९३/- | रु.१०,००,०००/- + व्हॅट कर १२.५% |
| ०५ | वैभव, पुणे | रु.२,४८,०००/- | अनुपस्थित |
| ०६ | क्वॉलीसर्ज, पुणे | रु.९२,०००/- | रु.९२,०००/- |
| ०७ | Esbee, Mumbai | रु.२४,००,०००/- | रु.२१,०१,०३२/-<br>अधिक कस्टम डयुटी |

तांत्रिकदृष्टया Esbee, मुंबई यांचे लाईटस् फारच वरच्या दर्जाचे असून २ डोमच्या खरेदीवर तिसरा डोम मोफत पुरविण्याचे कबूल केले आहे. अत्यावश्यक अशा दिय शस्त्रक्रिया विभागासाठी २ नगांची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली व इतर नगासाठी पुणे येथे तयार होत असलेल्या जोशी कंपनीचे लाईटस्ची पाहणी करुन घेण्यात यावेत असे ठरले.

**९) B - यासाठीही ६ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्या खालील प्रमाणे -**

| अ.नं | कंपनीचे नाव | निविदा दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१ | जनक, मुंबई | रु.३,३४,०००/- | रु.३,३०,०००/- |
| ०२ | हॉस्पिटेक, मुंबई | रु.६४,०००/- | १० टक्के कमी |
| ०३ | Esbee, मुंबई | रु.९,७०,०२४/- | |
| ०४ | | रु.२,६५,४७४/- | |
| ०५ | मिनिटेक, मुंबई मॉडेल १ | रु.७४,०००/- | १७.५० टक्के कमी |
| | मॉडेल २ | रु.३०,०००/- | |
| ०६ | वैभव, पुणे | रु.६५,०००/- | अनुपस्थित |
| ०७ | क्वालीसर्ज, पुणे | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- |

डॉ.सरनोत ज्यांना आपण तज्ञ म्हणून पाचारण केले होते, त्यांच्या मतानुसार हे सामान्य उपयोगासाठी येणारे लाईटस् पुणे येथे श्री जोशी हे तयार करतात. त्यांच्या मालाची पाहणी करुन आवश्यक तेवढे नग त्यांचेकडून घेता आल्यास संस्थानसाठी ते लाभदायक ठरेल. त्यामुळे वरील विषयात निर्णय होऊ शकला नाही. (कार्यवाही - वरिष्ठ प्रशासक, रग्णालये )

**विषय नं.०६. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे स्टरलायझर्स, ऑटोक्लेव्ह इ. उपकरणे खरेदीसाठी प्राप्त झालेले कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३९४.** या खरेदी संबंधी नमुन्यासह निविदा धारकांना बोलावण्यात आले होते. परंतु नमुन्यासह फक्त खालील निविदाधारक उपस्थित होते.

१) Qualisurge, Pune

२) Maureen, Aurangabad

यांच्या नमुन्यांची पाहणी करण्यात आली. नुकत्याच झालेल्या पावसामुळे इतर निविदाधारकांची अडचण लक्षात घेऊन यासंबंधी या समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य मालाची निवड करुन वाटाघाटी कराव्यात असे ठरविण्यात आले.

(कार्यवाही - वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये )

**विषय नं.०७. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता खरेदी करावयाचे हॉस्पिटल फर्निचर व मॅट्रेसेस साठी प्राप्त झालेले कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३९५.** रुग्णालयासाठी लागणाऱ्या फर्निचर, गाद्या इत्यादीचे नमूने आणावे, फक्त २ नमुन्यासहित हजर होते.

१) Quqlisurge, Pune

२) Satpuda, Nashik

यातील गाद्यांसाठी वरील व्यतिरिक्त खालील २ हजर होते.

३) Auto Foam, Aurangabad

४) Yashodeep, Pune

वरील निविदाधारकांनी आणलेल्या नमुन्यांची नोंद घेण्यात आली.

इतर निविदाधारक पावसामुळे नमूने आणू शकले नाहीत, तरी त्यांचे नमुन्यांची समितीतर्फे जागेवर पाहणी करुन वाटाघाटीव्दारे पसंत पडलेल्या मालाचे खरेदीचा निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही - वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०८. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता कार्यालयीन फर्निचरसाठी प्राप्त झालेले कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३९६.** कार्यालयीन फर्निचरसाठी १० निविदा धारकांना नमुने आणण्यास सांगण्यात आले होते. यातील कोणीही नमूने आणू शकले नाहीत. त्यांच्या मालाची लवकरात लवकर जागेवर पाहणी करुन उत्तम मालासंबंधी वाटाघाटी कराव्यात असा निर्णय झाला. यातील वस्तू योग्य दर्जाच्या न आढळल्यास थेट नावाजलेल्या गोदरेज, ऑलविन इत्यादी.कंपनी बरोबरही वाटाघाटी करता येतील असे ठरले.

(कार्यवाही - वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.०९. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे नावाबाबत.**

**निर्णय क्र.३९७.** दि.२३/०८/२००४ रोजी नवीन मा.व्यवस्थापन समितीचे कार्य सुरु झाले. कार्यभार सांभाळल्यानंतर त्यांच्या नजरेसमोर रुग्णालयाची नूतनीकरण केलेली भव्य इमारत होती. यामध्ये काहीतरी नाविन्यपूर्ण लोकोपयोगी कार्य करावे हा उद्देश समोर ठेऊन या नव्या इमारतीत उच्च श्रेणीच्या सेवा देता याव्यात व या सोबत चांगल्या प्रतीच्या सामान्य सेवा सशुल्क देता याव्यात असा विचार सुचला व जूने रुग्णालय सध्याच्या स्थितीत धर्मादाय उपचारासाठी सुरुच ठेवावे असे नियोजन ठरविले गेले. ज्यायोगे धर्मादाय १८० पलंगांचे रुग्णालय व सामान्य सेवेसहित उच्च श्रेणीच्या सेवा देणारे २०० पलंगांचे रुग्णालय नव्या इमारतीत असावे, या सशुल्क रुग्णालयातून मिळणा-या लाभातून धर्मादाय रुग्णालयाचा खर्च निभावता यावा म्हणजे दोन्ही रुग्णालये मिळून ते एक स्वतंत्र, आर्थिकदृष्टया स्वयंचलित एकक निर्माण व्हावे ज्यामुळे पुढील काळात या रुग्णालयांना धर्मार्थ पेटी उत्पन्नावर कमीतकमी अवलंबून राहावे लागेल. यात पलंगांची संख्या वाढून निरनिराळया थरातील रुग्णांची सेवा शक्य होऊ शकेल व जनतेला वाढीव सोयींचा व सेवांचा लाभ घेता येईल. धर्मादाय रुग्णालयाचे नाव पूर्वीपासूनच श्री साईनाथ रुग्णालय असे आहे. नव्या रुग्णालयाच्या नावासंबंधी विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील नावांचा किंवा आणखी नव्या सुचविल्या जातील अशा नावांचा विचार होणे गरजेचे आहे,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| |
|---|
| १) श्री साईनाथ वरिष्ठ सुविधा रुग्णालय |
| २) श्री साईनाथ उच्च सेवा रुग्णालय व संशोधन केंद्र |
| ३) Shri Sai Medical Centre |
| ४) Shri Sai Super Speciality Centre |
| ५) श्री साईनाथ उच्च श्रेणी सेवा रुग्णालय |
| ६) श्री साईनाथ उच्च वैद्यक प्रतिष्ठान |
| ७) श्री साईनाथ नूतन सेवा रुग्णालय |
| ८) श्री साईनाथ सुपर हॉस्पीटल |
| ९) श्री साई वैद्यक नव सेवा केंद्र |
| १०) श्री साईनाथ ग्रामीण वैद्यक प्रतिष्ठान |
| ११) श्री साईनाथ वैद्यकीय उच्च सेवा प्रतिष्ठान |
| १२) श्री साईनाथ उच्च चिकित्सा केंद्र |
| १३) श्री साई विशेष सेवा रुग्णालय |
| १४) श्री साईनाथ वरिष्ठ सेवा रुग्णालय |

| |
|---|
| १५) श्री साई नव चिकित्सालय |
| १६) Shri Sainath Memorial Medical Institute (For Super Services) |
| १७) श्री साईनाथ वैद्यकीय निदान व उपचार प्रतिष्ठान |
| १८) श्री साई नर्सिंग होम |
| १९) श्री साई सुश्रूषा केंद्र |
| २०) श्री साईनाथ वैद्यक सेवा व संशोधन संस्था |
| २१) श्री साई उच्च वैद्यकीय केंद्र व संशोधन संस्था |
| २२) श्री साईनाथ वरिष्ठ चिकित्सा संस्था |
| २३) Shri Sainath MultiSpeciality Hospital |
| २४) श्री साईनाथ बहुविध सेवा रुग्णालय |

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलला, **"साई मेमोरिअल हॉस्पिटल "** असे नांव देण्यात यावे असें ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.१०.** **सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील प्रस्तावित कर्मचारी आकृतीबंध मान्यतेबाबत.**

**निर्णय क्र.३९८.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७.१२.२००४ चे सभेतील निर्णय क्र. १९२ अन्वये सध्याचे नवीन बांधकाम केलेल्या इमारतीत सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरु करणेबाबत व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.०२.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६८ अन्वये सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलसाठी सर्व पदांचा सेवक आकृतीबंध तयार करण्याचे काम लवकर हाती घेण्यात यावे असा निर्णय पारित झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी दिनांक ०५.०४.२००५ रोजी सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये खाटांचे विषयी माहिती व त्याकामी लागणारा वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी आकृतीबंध प्रारुप स्वरुपात तयार केलेला आहे .

संदर्भ सेवा (सुपरस्पेशालिटी ) रुग्णालयातील खाटांचा आराखडा खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| ०१. | स्वतंत्र कक्ष ए.सी.सहित - २२ /रहित ११ | ३३ कक्ष ( प्रत्येकी एक पलंग ) |
| ०२. | अतिदक्षता विभाग / बाल अतिदक्षता विभाग | १४+ ०६ = २० |
| ०३. | हृदय शस्त्रक्रिया विभाग | २० |
| ०४. | डायलेसिस कक्ष | ०५ |
| ०५. | अपघात विभाग कक्ष | १० |
| ०६. | सामान्य वार्ड खाटा | ९६ |
| ०७. | अर्ध स्वतंत्र कक्ष खाटा | १६ |
| | एकूण खाटा | २०० |

उपरोक्त रुग्णालयात उपचार श्रेष्ठतेच्या दृष्टीने वर्गीकरण केले असून ती माहिती खालीलप्रमाणे -

| अ.नं | तपशील | संख्या |
|---|---|---|
| ०१. | अतिदक्षता सेवा आवश्यक असणाऱ्या खाटा (हृदय रोग, अतिदक्षता, बालअतिदक्षता, व डायलेसीस ) | ४६ |
| ०२. | अपघात विभाग खाटा | १० |
| ०३. | इतर सामान्य उपचाराच्या खाटा (स्वतंत्र कक्षासहित ) | १४४ |
| ०४. | शस्त्रक्रिया गृहातील टेबलची संख्या | ०८ |
| ०५. | रुग्ण तपासणी कक्षाची संख्या | २० |

उपरोक्त रुग्णालयासाठी लागणारा सेवक आकृतीबंधाचा तक्ता सर्व सदस्यांना पुरविणेत आला होता तो सोबत परिशिष्ट "अ " म्हणून ठेवण्यात आला होता.

आकृतीबंधात पदांची संख्या, वेतनश्रेणी एकूण मिळणारा पगार व त्यावरुन वार्षिक संभाव्य वित्तीय भार दाखविण्यात आलेला आहे. इतर मानद शिफारस केलेली पदे स्वतंत्र तक्त्यात दर्शविलेली आहेत. परिचारीकांची संख्या इंडियन नर्सिंग कौन्सीलने २१ नोव्हेंबर १९८६ रोजी पारित केलेल्या शिफारस पत्रानुसार करण्यात आलेली आहे. ही संख्या खाटांच्या संख्येनुसार अतिदक्षता विभागाच्या संख्येनुसार व शस्त्रक्रिया टेबलांच्या संख्येनुसार असून येणाऱ्या संख्येवर शेकडा ३० इतकी लिव्ह रिझर्व्ह संख्या मिळविण्यात आली आहे. इतर कर्मचारी वर्ग संख्या खाटांच्या व प्रशासकीय आवश्यकतेनुसार दर्शविलेली आहे.

प्रशासकीय पदे किमान आवश्यक तेवढीच घेतलेली आहेत. जी पदे सामान्यत: १०० खाटांचे रुग्णालयासाठी शिफारस केलेली असतात तीच दोनशे खाटांसाठी दर्शविलेली आहेत.

वेतनात मूळ पगार अधिक वार्षिक वेतनवाढी अधिक वेळोवेळीचा महागाई भत्ता अधिक व्यवसाय अवरोध भत्ता इत्यादी बाबी दर्शविलेल्या आहेत. या आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांच्या वार्षिक

पगारावर रुपये ५,४१,६९,३८८/- ( रुपये पाच कोटी एक्केचाळीस लाख एकोणसत्तर हजार तीनशे अठ्ठयाऐंशी मात्र ) खर्च अपेक्षित आहे.

तसेच मानद पदावर एकूण ११ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केल्यास वार्षिक खर्च रुपये १,९८,०००/- मात्र अपेक्षित आहे.

कर्मचारी नेमणूकीसंदर्भात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम नं.१३ (४) मध्ये तरतूद खालीलप्रमाणे आहे.

" ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त केली जाणार नाही "

उपरोक्त तरतूदीच्या अधिन राहून सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावा लागेल तरी त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केल्याप्रमाणे साई मेमोरियल रुग्णालयासाठी तयार करण्यांत आलेल्या कर्मचारी आकृतीबंधास व त्याकामी येणारे वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचा कर्मचारी आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा असें ठरले.

याचवेळी व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०७.२००४ चे सभेतील निर्णय क्र. ३६९ अन्वये खालीलप्रमाणे कामे मा.श्री. सुधाकर जोशी, सेवानिवृत्त आय.ए.एस. अधिकारी, पुणे यांचेकडे सोपविण्यात आलेली आहेत.

✧ **टप्पा १) ... अ.क्र. १ ते ७**

१) अधिनियम दुरुस्ती.
२) नियमावली दुरुस्ती.
३) सभा कामकाज नियमावली.
४) सल्लागार समिती नियमावली.
५) छाननी समिती नियमावली.
६) भक्त मंडळ सभा विनियम.
७) भक्त मंडळ सदस्यत्वाच्या अटी/शर्ती.

✧ **टप्पा २) ... अ.क्र. ८ ते १०.**

८) बांधकामे व भांडार खरेदी नियमावली.
९)कर्मचारी सेवा नियम.
१०) अधिकारी /कर्मचारी आकृतिबंध.

अधिनियम २००४ नुसार मा. व्यवस्थापन समितीचे कामकाज सुरु होऊन एक वर्ष पूर्ण झाले असून नियमानुसार विनियम दुरुस्ती करणेसाठी फक्त एकच वर्षाचा कालावधी उरला असल्याने व वेळेत दुरुस्तीकरिता पाठविणे आवश्यक असल्याने उपरोक्त टप्पा क्र.०१ चीच कामे फक्त श्री सुधाकर जोशी यांचेकडे सोपविण्यात यावीत तसेच टप्पा क्र.०२ ची कामे मा. श्री जाधव साहेब, निवृत्त कामगार आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सोपविण्यात यावीत. ही कामे तीन महिन्यात पूर्ण करुन याबाबत अहवाल मा. व्यवस्थापन समितीस सादर करणेबाबत कळविण्यात यावे. श्री जाधव यांची फी ठरविण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

तसेच या रुग्णालयासाठी अत्यावश्यक वैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा कायमस्वरुपी घेण्यात यावी. इतर कर्मचाऱ्यांची सेवा कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावी असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग/वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**विषय नं.११. मुदतबाह्य औषधे नष्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९९.** श्री साईनाथ रुग्णालयाचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दिनांक ०१.०४.२००४ ते दिनांक ३१.०३.२००५ या कालावधीमध्ये एकूण रुपये ९०४७.९३ ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | औषध भांडारामध्ये एकूण | ६,८६०.६१ |
| ०२. | विविध वॉर्डमधून जमा झालेले एकूण | २,१८७.३२ |
| | एकूण | ९,०४७.९३ |

उपरोक्तपैकी अ.नं.२ वॉर्डमधील औषधांमध्ये ०१.०४.२००४ ते दिनांक ३१.०३.२००५ या कालावधीत मुदतबाह्य झालेली आहेत. त्या औषधांची एकूण रक्कम रुपये १,७९४.३२ आहे. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये फेब्रुवारी,२००५ अखेर रुपये ८८,९७,४५९.०० ची औषधे खरेदी करण्यात आली त्याचे अ.नं.१ व २ करिता टक्केवारी मुदतबाह्य औषधांचे प्रमाण ०.००१ इतके आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व औषध भांडारातील औषधे, औषधसाठा रजिस्टरमधून कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१२. गुंतवणूक माहे ऑगष्ट - २००५.**

**निर्णय क्र.४००. ब)** माहे ऑगस्ट,२००५ मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बँकेचे नांव | दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | एच.डी.एफ.सी. लि.,नाशिक | ०२/०८/२००५ | ९१,९३,८५१.०० |
| ०२. | एच.डी.एफ.सी. लि., नाशिक | ०२/०८/२००५ | ९०,९३९.०० |
| ०३. | युटीआय बँक, नाशिक | ०३/०८/२००५ | ३८,६१,०५६.०० |
| ०४. | युटीआय बँक, नाशिक | ०४/०८/२००५ | १,७४,४४,८१७.०० |
| ०५. | माहे ऑगस्ट, २००५ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १,५०,००,०००.०० |
| ०६. | आर.बी.आय. गोल्ड बॉन्डसचे गुंतवणूकीतून मिळणारे सहामाही व्याज | | ३,२५,००,०००.०० |
| | एकूण | | **७,८०,९०,६६३.००** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बँक ऑफ इंडिया, कोपरगांव यांचेकडे रुपये ५ कोटीची गुंतवणूक करण्यात यावी. तसेच उर्वरित रक्कम, प्रस्तावित जमीन खरेदीसाठी लागलीच आवश्यक रक्कम बाजूला ठेऊन, संस्थानला सेवा देणाऱ्या व जास्तीत जास्त व्याज दर देणाऱ्या बँकामध्ये गुंतविण्यात यावी, असें ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१३. सन २००४-०५ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (Statutory Audit report) व लेखापरिक्षीत लेख्यांची (Audited Accounts) ची नोंद घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४०१.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.१४. भारतीय जीवन विमा महामंडळाची "एम्प्लॉईज डिपॉझीट लिंक्ड इंशुरन्स (EDLI) स्किम" स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.४०२. (अ)** पेमेंट ऑफ ग्रॅच्युईटी ॲक्ट, १९७२ मधील तरतुदीन्वये सेवा समाप्तीनंतर कर्मचा-यांना अथवा त्यांच्या वारसांना ग्रॅच्युईटी (उपदान) ची रक्कम अदा करणे प्रत्येक संस्थेचे पर्यायाने संस्थानचे वैधानिक कर्तव्य असल्याने, उपदानाची रक्कम संस्थानमार्फत आदा करण्यात येत असे. परंतु सेवेत असतांना, आजारपण, अपघात अथवा अन्य काही कारणांमुळे एखादा कर्मचारी मयत झाल्यास, त्याच्या कुटूंबास अतिरिक्त आर्थिक लाभ मिळण्याच्यादृष्टीने भारतीय जीवन विमा महामंडळाची, समूह उपदान योजना (Group Gratuity Scheme) लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा.विश्वस्त मंडळाच्या दि.२२/२३ सप्टेंबर, २००१ रोजीच्या सभेसमोर ठेवण्यात आला होता. त्यास निर्णय क्र.४१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.०१ ऑक्टोबर, २००१ पासून संस्थान कर्मचा-यांसाठी, ही योजना लागू करण्यात आलेली असून, मागील चार वर्षात या योजनेचा लाभ एकूण १४ कर्मचा-यांना मिळालेला आहे. ही योजना लागू केल्याने, नियमाप्रमाणे आदा करावयाच्या उपदान रकमेपेक्षा रुपये ६,१८,४८३/- मात्र एवढी जादा रक्कम या कर्मचा-यांच्या वारसांना अतिरिक्त लाभ म्हणून मिळालेली आहे. त्यामुळे ही योजना कर्मचारी व संस्थानचेदृष्टीने निश्चितच फायदेशीर ठरलेली आहे.

**(ब)** उपरोक्त योजनेप्रमाणेच, भारतीय जीवन विमा महामंडळाने,एम्प्लॉईज डिपॉझिट लिंक्ड इन्शुरंस स्किम (EDLI) ही योजना संस्थान कर्मचा-यांना लागू करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. सध्या संस्थान, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा,१९५२ मधील तरतुदीनुसार एकूण वेतनाच्या ०.५० टक्के एवढी रक्कम 'भविष्य निर्वाह निधी कार्यालय, नाशिक' यांचेकडे दरमहा भरणा करीत आहे. कर्मचा-यांचे सेवेत असतांना कोणत्याही कारणांमुळे निधन झाल्यास या योजनेचा लाभ कर्मचा-यांच्या वारसांना मिळू शकतो. त्यास अनुसरुनच भारतीय जीवन विमा महामंडळाने, कर्मचाऱ्यांना जादा आर्थिक लाभ मिळू शकेल अशाप्रकारची योजना अंमलात आणलेली आहे. भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडील योजना व भारतीय जीवन विमा महामंडळाकडील या योजनांची वैशिष्टये पुढीलप्रमाणे

| **अ.नं.** | **भविष्य निर्वाह निधीकडील योजना** | **भारतीय जीवन विमा महामंडळाकडील योजना** |
|---|---|---|
| ०१ | सदरची योजना मालकास बंधनकारक असून, कायदयानुसार भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीसोबतच ही वर्गणी आदा करावी लागते. | ही योजना केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त यांचे मान्यतेने पर्यायी योजना म्हणून जाहीर करण्यात आलेली आहे. |
| ०२ | या योजनेंतर्गत मालकाला कर्मचा-याच्या एकूण मासिक वेतनाच्या ०.५० टक्के एवढी वर्गणी चलन क्र.२१ अन्वये भरणे बंधनकारक आहे. | या योजनेंतर्गत मालकाला कर्मचा-यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ०.३ टक्के ते ०.५ टक्के एवढी वर्गणी भरावी लागते. त्यात कमाल ४० टक्के एवढी बचत होऊ शकते. |
| ०३. | कर्मचा-यांच्या एकूण मासिक वेतनाच्या ०.०१ टक्के एवढी रक्कम प्रशासकीय शुल्क म्हणून चलन नं.२२ अन्वये आदा | कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय शुल्क आकारले जात नाही. |

| | | |
|---|---|---|
| | करावी लागते. | |
| ०४. | या योजनेंतर्गत, एखादा कर्मचारी मयत झाल्यास, वारसाला मिळणारी रक्कम निश्चित नसून, ती कर्मचा-याच्या जमा रकमेवर अवलंबून असते. | एखादा कर्मचारी मयत झाल्यास, या योजनेंतर्गत मिळणारी रक्कम निश्चीत असून, ती परस्पर वारसास मिळते. |
| ०५. | जमा रक्कम रु.३५,०००/- पेक्षा अधिक असल्यास मिळणारी रक्कम रु.३५,०००/- अधिक शिल्लक रकमेच्या २५ टक्के एवढी असते. यासाठी कमाल मर्यादा रु.६०,०००/- एवढी आहे. | या योजनेंतर्गत रु.६२,०००/- एवढी निश्चित रक्कम कर्मचा-यास मिळू शकते. |
| ०६. | जर कर्मचा-याने प्रॉ.फंडातील रक्कम काढली किंवा कर्ज काढल्यामुळे कमी झालेल्या शिल्लक रकमेच्या प्रमाणातच या रकमेचा लाभ मिळतो. | या योजनेत मात्र, कोणत्याही प्रकारची रक्कम कमी होत नसून कमाल मर्यादेपर्यंत रकमेचा लाभ मिळू शकतो. |
| ०७. | कर्मचा-याचे अपघाती निधन झाल्यास कुठलाही अतिरिक्त लाभ मिळत नाही. | कर्मचा-याचे अपघाती निधन झाल्यास व मालकाने या योजनेत रुपये ०.७५ प्रतिहजारी एवढी अल्पशी जादा वर्गणी भरल्यास, मिळणा-या रकमेत दुपटीने वाढ होते. म्हणजेच रक्कम रु.१,२४,०००/- मिळू शकते. यासाठी संस्थानवर साधारणतः रु.५२,०००/- पर्यंत प्रतिवर्षी अतिरिक्त आर्थिक भार येईल. |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार करता, भविष्य निर्वाह निधीकडील योजनेपेक्षा भारतीय जीवन विमा महामंडळाची एम्प्लॉईज डिपॉझिट लिंक्ड इन्शुरंस (EDLI) ही योजना कर्मचा-यांच्या दृष्टीने निश्चितच अधिक फायदेशीर आहे. तसेच संस्थानवरही या योजनेचा फारसा आर्थिक बोजा पडत नाही.

भारतीय जीवन विमा महामंडळाची उपरोक्त योजना लागू करण्यासाठी, क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी आयुक्त, नाशिक यांचेकडे, भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२, कलम १७(२ए) मधील तरतुदीनुसार उपरोक्त योजनेच्या नियम व अटींसह अर्ज सादर करावा लागेल. भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून त्यांचेकडील योजना बंद करुन ही योजना लागू करण्यास मान्यता मिळालेनंतर सदरील योजना अंमलात आणता येईल.

तरी दि.०१ ऑक्टोबर, २००१ पासून संस्थान कर्मचा-यांसाठी, ज्याप्रमाणे भारतीय जीवन विमा महामंडळाची समूह उपदान योजना (Group Gratuity Scheme) सुरु करण्यात आलेली आहे. त्या बरोबरीनेच एम्प्लॉईज डिपॉझिट लिंक्ड इन्शुरंस (EDLI) ही योजनाही लागू करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखधिकारी)

**विषय नं.१५.** **अंतर्गत लेखा परिक्षणासाठी सक्षम संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०३** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७ एप्रिल, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये, संस्थानच्या आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा मनुष्यबळाअभावी सक्षम संस्थेची नियुक्ती होणे आवश्यक असल्याने, मा.सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शनानुसार अशा सक्षम संस्थेची नेमणूक तातडीने करण्यात यावी, असे ठरले होते.

सध्या संस्थानच्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागामध्ये मार्यादित दृष्टीकोनातून एक स्वतंत्र कार्यगट स्थापन करण्यात आलेला असून, त्यामार्फत सादील व चल मालमत्ता पडताळणीचे कामकाज नियमतीतपणे करण्यात येत आहे. परंतु संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे.रेडीज ॲण्ड कंपनी, मुंबई यांचेशी गेल्या तीन वर्षात वेळोवेळी झालेल्या चर्चेदरम्यान, त्यांनी सदरील कामकाजाचे महत्त्व पटवून देऊन, या कामकाजासाठी सध्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागात उपलब्ध असलेले मनुष्यबळ हे खूपच कमी असून, आणखी काही अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करुन देऊन, सदरील विभाग पुरेसा सक्षम करावा अशी सूचना केलेली आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक कर्मचा-यांची नियुक्ती होणे वा उपरोक्तप्रमाणे बाहेरील संस्थेकडून काम करवून घेणे असे दोन पर्याय आहेत.

त्या अनुषंगाने अंतर्गत लेखापरिक्षणासाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९ जुलै, २००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय क्र.२५२ घेण्यात आलेला आहे. "श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेकरीता नेमावयाच्या अंतर्गत लेखापरिक्षकासाठी मा.विश्वस्तांनी त्यांचे माहितीतील सक्षम व अनुभवी संस्थांची नावे मा.कार्यकारी अधिकारी यांना कळवावीत व त्या संस्थांना चर्चेसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरलें."

त्यास अनुसरुन आज अखेर मा.सदस्यांकडून संस्थांचे प्राप्त अर्जांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. नं. | संस्थेचे नांव | अर्जाची तारीख | शिफारस केलेल्या मा.विश्वस्ताचे नांव | मानधनसाठी कळविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. मोहन देशमुख ॲण्ड कं. चार्टर्ड अकौंटंट, पुणे | ०२ जून, २००५ | मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील | रु.६०,०००/- मात्र प्रतिमहा, त्याशिवाय त्यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च व या सर्वावरील टॅक्स |
| ०२. | श्री.शरद एस. गायकवाड ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, मुंबई | -- | -- | -- |
| ०३. | मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, पुणे | १६ जुलै, २००५ | मा.अध्यक्ष साहेब | संस्थाननियमानुसार |
| ०४. | श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंट, कोपरगांव | १४ जुलै, २००५ | ०१. मा.डॉ.एकनाथ बी.गोंदकर<br>०२. मा.श्री.अशोक बी. खांबेकर | एकत्रित दरमहा रु.५०,०००/- (सर्व्हिस टॅक्स व इतर अंतर्भूत) मानधनासाठी वाटा-घाटीस तयारी आहे. |
| ०५. | श्री.पी.आर.भंडारी ॲण्ड असोसिएट्स, कोपरगांव | १८ जुलै, २००५ | मा.श्री.अशोक बी. खांबेकर | रुपये ३५,०००/- दरमहा |

उपरोक्तप्रमाणे एकूण पाच संस्थांचे अर्ज प्राप्त झालेले असून, अ.नं.०३ या संस्थेच्या प्रतिनिधींनी दि.२१ रोजी शिरडी येथे भेट देऊन, विशेषतः रुग्णालय विभागाकडील चालणा-या दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली आहे. तत्पुर्वी मा.अध्यक्ष साहेब यांचे निर्देशान्वये दोन्ही रुग्णालयांची लेखा व आर्थिक कार्यपध्दती अधिक कार्यक्षम व निकोप होण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल तयार करण्याची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व संस्थांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून त्यांचेशी कामकाजासंबंधी कार्यकक्षा ठरविणे आवश्यक आहे. तसेच त्या कार्यकक्षेअंतर्गत त्यांचे कामाचे स्वरुप- संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण करुन तृटींची पूर्तता करण्यासाठी/निकोप सुरक्षित व कार्यक्षम कार्यपध्दती तयार करणे आणि प्रशासनाच्या व संबंधित विभागाच्या सहकार्याने ती कार्यपध्दती राबविण्यास, तसेच संस्थानच्या विविध वैधानिक पूर्तता (वैधानिक लेखापरिक्षकाच्या पूर्तता अहवालासह) करण्यास सक्रिय सहाय्य करणे अशा स्वरुपाचे असावे, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त संस्थांपैकी योग्य त्या संस्थेची अंतर्गत लेखापरिक्षणासाठी नियुक्ती होणेस, तसेच त्यांचा कालावधी, मानधन व कार्यकक्षेविषयी निर्णय होणेसाठी, मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, इतर संस्थांचा समावेश-तशा मा.सदस्यांच्या शिफारशी + मा. विखे पाटील यांनी केलेली प्रस्तावना, उपस्थित संस्थांचे संचालकांनी मांडलेले विचार (एका संस्थेस शक्य नाही..एकापेक्षा अधिक..Managment Audit etc.) याबाबत मसुदा तयार करावा व पुनश्च तपासणीसाठी द्यावा.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१६. घनकचरा विल्हेवाट करणे प्रकल्पाबाबत.**

**निर्णय क्र.४०४** पेंटा कॅड इंजि.प्रा.लि., मुंबई ( Penta Cad Engg. Co. Pvt. Ltd.) यांनी दि. २५/०५/२००५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, इंजिनियरींग क्षेत्रात विविध प्रकल्पांसाठी सल्ला देण्याचे काम त्यांची कंपनी करते. पर्यावरणाविषयी सल्ला, घनकचरा व्यवस्थापन, वेस्ट पासून उर्जा इत्यादी साठी प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाची व्यवहार्यता इत्यादी कामी सल्ला देण्याचे काम त्यांचेमार्फत करण्यात येते , असे कळविले आहे.

अ) पेंटा कॅड इंजि. यांनी संस्थानला घनकचरा विल्हेवाट लावणेसाठी त्यांचा तज्ञ सल्ला देऊ केला आहे. त्यासाठी त्यांचे कामामध्ये (Scope of work ) खालील बाबींचा अंतर्भाव असेल -

१. वेस्ट मटेरियलबाबत प्रत्यक्ष सर्व्हे करुन त्याचा प्रकार स्वरुप व आकारमान ठरविणे.
२. विल्हेवाट व व्यवस्थापनासाठी निरनिराळ्या उपलब्ध तंत्रज्ञानाचा आढावा घेणे.
३. प्रकल्पाची व्यवहार्यता व अंदाजे खर्चाचा अहवाल तयार करणे.
४. प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी आराखडा व तांत्रिक माहिती देणे.
५. अशा प्रकारची कामे करणा-या एजन्सीची यादी देणे.

ब) वरील कामांसाठी पेंटा कॅड इंजि. यांनी ३% फीची ( सर्व कर वगळून- excluding all kinds of taxes & levies as applicable ) मागणी केली आहे. याकरीता कार्यादेशासोबत ५०% रक्कम ॲडव्हान्स व ५०% रक्कम प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर तसेच विनामुल्य

रहाण्याची, जेवणाची व स्थानिक प्रवासासाठी वहानाची व्यवस्था इत्यादी सुविधा मिळणेबाबत त्यांनी नमूद केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. सध्या संस्थानतर्फे सुलभ शौचालय येथे मानवी विष्ठेवर बायोगॅस निर्मिती व बायो गॅसवर वीज निर्मिती, धर्मशाळा येथे सांडपाण्यावर प्रक्रिया व पूनर्वापर , प्रसादालयातून निघणारे खरकटे अन्न व व्हेजिटेबल / फूड वेस्ट मटेरियल तसेच मंदिरातून निघणारे निर्माल्य ( फुलांचे हार इत्यादी ) पासून गांडूळ खत प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले आहेत.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन संस्थान व शिर्डी शहरासाठी घनकचरा व्यवस्थापन, सांडपाण्यावर प्रक्रिया, वेस्ट पासून एनर्जी तयार करणेकामी प्रथम प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. याकामी इतर नांमाकीत सल्लागारांची माहिती मागविणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. त्यानंतर या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी सल्लागारांची नेमणूक करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१७. शिर्डी, सिन्नर, नगर, राहूरी, बाभळेश्वर, नेवासा फाटा येथे साईभक्तांचे स्वागतासाठी स्वागत कमानी उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४०५.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी सर्व देशभरातून तसेच विदेशातून मोठ्या प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे येतात. शिर्डी येथे पोहचण्यासाठी मुख्यतः नाशिक-शिर्डी, नगर-शिर्डी, मनमाड-शिर्डी , औरंगाबाद-शिर्डी, नेवासा-शिर्डी हे प्रमुख मार्ग आहेत. या मार्गावरुन येतांना साईभक्तांना रस्त्याचा बोध व्हावा तसेच आपण शिर्डी गावाचे जवळ आलो आहोत याची जाणीव व्हावी . याकरिता सदर मार्गांवर साईभक्तांचे स्वागतासाठी विविध ठिकाणी आकर्षक व सुशोभित अशा कमानी उभारणे प्रस्तावीत आहेत. याकामी अंदाजे खालीलप्रमाणे खर्चाचा अहवाल आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी सादर केला आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | सिन्नर येथे नाशिक पुणे रस्त्यावरुन शिर्डीकडे वळणा-या रस्त्यावर | १०,९४,१४०.०० |
| ०२ | नगर- मनमाड रस्त्यावर अहमदनगर येथे | १०,९४,१४०.०० |
| ०३ | नगर- मनमाड रस्त्यावर राहुरी येथे | १०,९४,१४०.०० |
| ०४ | नगर- मनमाड रस्त्यावर बाभळेश्वर येथे | १०,९४,१४०.०० |
| ०५ | औरंगाबाद- शिर्डी रस्त्यावर नेवासा फाटा येथे | १०,९४,१४०.०० |
| ०६ | नगर-मनमाड रस्त्यावर शिर्डी गावाचे दक्षिण बाजूस | १९,३४,७२८.०० |
| ०७ | नगर-मनमाड रस्त्यावर शिर्डी गावाचे उत्तर बाजूस | १९,३४,७२८.०० |
| | एकूण रक्कम रुपये - | **९३,४०,१५६.००** |

वरील पैकी सिन्नर येथील स्वागत कमान उभारणी बाबत मा. व्यवस्थापन समितीचे मुंबई येथील दि.०३/०५/२००५ रोजीचे सभेत ठरले आहे. सदर स्वागत कमान उभारणीकरीता कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, नाशिक यांची मान्यता घेणेकामी कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील ठिकाणी RCC बांधकामात सुशोभित कमान उभारण्यात येईल. त्यासाठी आर्कीटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांनी तयार केलेले डीझाईन सोबत सादर केले आहे. सदर डिझाईनला मान्यता मिळाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन ) यांची मान्यता घेवून निविदा मागविणे बाबत कार्यवाही करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरिल प्रमाणे १ ते ७ तसेच नगर (विळदघाट )जवळके, पोहेगांव, येसगांव, कोपरगांव (साईबाबा कॉर्नर ) येथेही स्वागत कमानी उभारण्यास तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१८. नगरपंचायत/दुकान केंद्र समोर सुशोभित कारंजा उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४०६.** शिरडी येथील नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम संस्थानतर्फे करण्यात येत आहे. सदर रस्त्याचे सुशोभिकरणाचे कामही हाती घेण्याचा संस्थानचा मानस आहे.सदर रस्त्यालगत पश्चिमबाजूस शिरडी नगरपंचायत यांचे दुकानकेंद्र आहे.हा भाग मध्यवर्ती असून दर्शनी आहे.हा भाग सुशोभित व्हावा यासाठी तेथे आकर्षक स्वरुपाचा कारंजा करण्यात यावा अशी सूचना मा.अध्यक्ष यांनी केलेली आहे.

सदर ठिकाणी कारंजा व सभोवती छोटा बगीचा अशा स्वरुपाचे काम करण्यासाठी आर्किटेक्ट मे.निकम पा.असो.श्रीरामपुर यांचेकडून तयार करुन घेण्यात आलेल्या प्राथमिक स्वरुपाच्या ढोबळ अंदाजपत्रकानुसार रु.६.२५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.तथापि नियोजीत कारंजाचा आकार व स्वरुप यावर सदर खर्च अवलंबून आहे.

वरील कारंजाचे कामासाठी अपेक्षीत निधीचा विनियोग हा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे या सदरात मोडतो. या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग करणेसाठी प्रथम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोट कलम (२) अन्वये निर्दीष्ट केलेली पूर्तता होणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे कारंजाचे कामासाठी आर्किटेक्ट मे. निकम पाटील असो.श्रीरामपूर यांची नेमणूक होणेस व कामासाठी तत्वतः मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन सदरहू प्रस्तावास तसेच याकामी निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९.** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील स्मशानभूमीमध्ये सोयी-सुविधा निर्माण करुन विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०७.** श्री साईबाबा संस्थानतर्फे शिरडी नगरपंचायत हद्दीमध्ये व्यापक स्वरुपात रस्त्यांची विकास कामे हाती घेण्यात आलेली आहेत. शिरडी शहराच्या उत्तर दिशेला नगर- मनमाड रोडजवळ ओढ्याशेजारी शिर्डी गावाची स्मशान भुमी आहे. या स्मशानमभूमी मध्ये पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध नाहीत.

संस्थानतर्फे या स्मशानभूमीमध्ये अद्यावत सोयी-सुविधा निर्माण करणेत याव्यात अशी सूचना मा. अध्यक्ष महोदय यांनी केलेली आहे. सदर ठिकाणी खालील विकासकामे करणे आवश्यक आहे.

०१) पक्की कम्पाउंडभिंत.

०२) विद्युत अथवा वायू दाहिनी छतासह.

०३) अंघोळीसाठी बाथरुम व हातपाय धुण्याची व्यवस्था

०४) एक स्टोअररुम.

याप्रमाणे कामे करण्यासाठी आर्किटेक्ट निकम पा. असो. श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन व एस्टिमेट तयार करता येतील. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.
वरील कामासाठी अपेक्षित निधीचा विनियोग हा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे या सदरात मोडतो. या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग करणेसाठी प्रथम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ पोट-कलम (२) अन्वये निर्दीष्ट केलेली पूर्तता होणे आवश्यक आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नगरपंचायत हद्दीत करावयाच्या विकास कामासाठी एकत्रित प्रस्ताव तयार करुन प्राधान्याने करावयाच्या कामाची सूची शिर्डी नगरपंचायतीकडून घ्यावी व सभेपूढे सादर करावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०.** **जुना पिंपळवाडी रस्ता कास्ट आयर्न रेलिंगसह सुशोभिकरण, जीवन विमा निगम यांचे निधीतून करणेबाबत**

**निर्णय क्र.४०८.** शिर्डी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता व जूना पिंपळवाडी रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर अतिक्रमण होवू नये, याकरिता फूटपाथचे कडेने व मध्यभागी दुभाजकासाठी आकर्षक डिझाईनचे कास्ट आयर्न रेलिंग बसविणेस तसेच आवश्यकतेनुसार मुतारी, टॉयलेट, ठिकठिकाणी बेंचेस इत्यादी बाबींसह खालीलप्रमाणे अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समिती बैठक दि. १३/०३/२००५ निर्णय क्र. १०६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१. नगर-मनमाड रस्ता रु. २५० लक्ष.

२. जूना पिंपळवाडी रस्ता रु.७२ लक्ष.

सदर रस्त्याचे कामासाठी व्यवस्थापन समितीच्या बैठकीत वरील निर्णयाप्रमाणे रस्त्याचे कामासाठी कन्सल्टंट मे. निकम पा. असोशिएटस, श्रीरामपूर यांची नेमणूक करण्यात आली आहे.

सुशोभिकरणासाठी डिटेल प्लॅन व एस्टीमेट तयार करुन निविदा मागविण्याची कार्यवाही करुन सदर काम करता येईल. याकामी प्रथम खर्च संस्थान मार्फत करावा लागेल व काही काम अथवा पूर्ण काम खाजगी सहभागातून करता येईल. भारतीय जीवन बिमा निगम यांनी रुपये ५० लाख रकमेपर्यंत काही भागासाठी प्रायोजोकत्व स्विकारण्याची तयारी झालेल्या चर्चेदरम्यान दर्शविली आहे. त्यानुसार भारतीय जीवन विमा निगम यांना खर्चाचे एस्टिमेट पाठविण्यात आले होते. तसेच शिर्डी येथील हॉटेल श्रद्धा पार्क व हॉटेल सन ॲण्ड सॅण्ड या हॉटेल व्यावसायिकांनीही काही भागासाठी यासाठीचा खर्च करण्यासाठी तयारी दाखविली आहे.

भारतीय जीवन बीमा निगमचेशाखा प्रबंधक श्री गवळी यांनी दि.२३/०७/२००५ चे पत्रान्वये जूना पिंपळवाडी रोडकरीता कास्ट आर्यन रेलींगसह संपूर्ण सुशोभिकरणासाठी जीवन बीमा निगम

कंपनीची जाहिरात लावण्यास संस्थानने परवानगी दिल्यास त्यांचे कंपनीची या कामाकरीता प्रायोजोकत्व स्विकारण्याची तयारी असल्याचे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या पिंपळवाडी रस्त्याचे सुशोभिकरण, कास्ट आयर्न रेलींग, रस्ता दुभाजक, स्ट्रीट लाईट, शोभेची झाडे झुडपे इत्यादींसह भारतीय जीवन विमा निगम यांना प्रायोजकत्व देण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सत्वर सुशोभिकरण करणेबाबत त्यांना कळविण्यात यावे व त्यासाठी आवश्यक करारनामा करुन घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२१. श्री साईसत्‌चरित्र गुजराती ऑडिओ स्वरुपात प्रसिध्द करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०९.** श्री.भरतभाई व्यास,लंडन यांनी दि.१७.०६.२००५ चे पत्राद्वारे श्री साईचरित्राच्या १६ गुजराथी ऑडिओ सीडीज च्या मास्टर कॉपीज संस्थानद्वारा प्रकाशित करण्यास सुचित केले आहे.उपरोक्त सीडीज संस्थानद्वारा प्रसिध्द केल्यास त्याचा गुजराथी भक्तांना चांगला उपयोग होवून, सदरच्या सीडीजचा सर्व गुजराथी जानकार भक्तांना ऐकण्यासाठी चांगला उपयोग होवून त्यामुळे बाबांवरच्या श्रध्देत व विश्वासात वाढ होईल असे कळविले आहे. तसेच गुजराथी साईचरित्र ऑडिओ सीडीज संस्थानद्वारा प्रकाशित करणेमागे त्यांची काहीएक हरकत नसल्याचे कळवून संस्थानला योग्य वाटेल तसे सीडीजची विक्री करून प्रचार व प्रसार करावा असे स्पष्ट नमूद केले आहे.

श्री.भरतभाई व्यास,लंडन यांनी संस्थानकडे जमा केलेल्या श्री साई चरित्राच्या १६ गुजराथी ऑडिओ सिडीजच्या मास्टर कॉपीज ह्या संस्थानद्वारा प्रकाशित करणेकामी योग्य आहे किंवा नाही याबाबत संबंधित तज्ञ व्यक्तीचा अभिप्राय घेणेकामी श्री.जयसिंह ब.निंबाळकर,बडोदे यांचेकडे जा. न. एसएसएस / वशी/प्रकाशने/३९५०/२००५ दि.१८.०४.२००५ द्वारा सदर सीडीजचे अवलोकन करून अभिप्राय सादर करणेविषयी कळविण्यात आले होते.

श्री.जयसिंह ब.निंबाळकर,बडोदे यांनी त्यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेल्या १६ गुजराथी सीडीजचा आपला अभिप्राय दि.१६.०७.२००५ चे पत्राद्वारा खालील तपशिला प्रमाणे कळविला आहे.

१) संस्थानने उपरोक्त सीडीज प्रकाशित केल्यास त्याचा फायदा हा ज्या लोकांना पारायण करण्याची इच्छा आहे, परंतु काही शारिरीक व्याधीमुळे यात जास्त वेळ मांडी घालून बसू न शकणे, डोळ्यांना कमी दिसणे किंवा भाषा वाचनाचे तेवढे ज्ञान नसणे असे भक्त सीडीज श्रवण करून आपली इच्छा पूर्ण करू शकतील. हा संस्थानचा उद्देश सिडीजच्या पहिल्या भागात उल्लेखित व्हावा.

२) प्रत्येक सीडीत समाविष्ट केलेला मंत्र बरोबर आहे. तथापी ; तो फक्त पहिल्या अध्यायाच्या सुरूवातीलाच असावा प्रत्येक सीडी मध्ये नसावा.

३) गुजराथी साईचरित्रातील अध्यायांच्या क्रमानुसार सीडीज बनविल्यास त्या सोयिस्कर होतील

४) सीडीजमध्ये श्री बाबांच्या आरतीचा नुसता भावार्थच सांगितला आहे,त्याबरोबर आरती सुद्धा गायिलेली असल्यास त्याचा ऐकणा-यास भावार्थ समजू शकेल.

५) गुजराथी साईचरित्रामध्ये बाबांच्या गुरूंनी त्यांना विहीरीत उलटे टांगले आहे त्या कथेचा मूळ भावार्थ जो महत्वाचा आहे तोच सांगितलेला नाही.

६) एकंदरीत सर्व सीडीज बरोबर आहेत.

एकंदरीत वर दर्शविलेल्या तपशिलानुसार गुजराथी साईभक्तांसाठी संस्थानद्वारा प्रकाशित करणेकामी संस्थानकडे जमा केलेल्या श्री साईचरित्राच्या १६ गुजराथी ऑडिओ सीडीज ह्या संस्थानद्वारा प्रकाशित करण्यास योग्य असल्याबाबत संबंधीत तज्ञ श्री.जयसिंह ब.निंबाळकर,बडोदे यांनी त्यांचेद्वारा अभिप्राय पत्रात कळविले आहे. तरी सदर सीडीजचे प्रथम प्रकाशन असल्याने प्रत्येकी १६ सीडीजचा १ संच याप्रमाणे ५,००० संच प्रत्येक संचास रुपये १६०/ प्रमाणे एकूण रुपये ८ लाख खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.जयसिंग ब.निबांळकर,बडोदे यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करुन श्रीसाईसतचरित्र ; गुजराथी ऑडिओ स्वरुपात संस्थानतर्फे प्रकाशित करण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८,००,०००/- (अक्षरी रूपये आठ लाख) चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२२. सन २००६ सालाकरीता श्री साईलीला व्दैमासिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाईकामाचे कोटेशन उघडणे व निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४१०.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५चे सभेतील निर्णयानुसार "श्री साईलीला" द्वैमासिक २००५-२००६ छपाईबाबत प्रकाशने विभागाकडील दि. १६.०७.२००५ ची मंजूर प्राप्त टिपणी अन्वये "श्री साईलीला" नियतकालीकाच्या मराठी व हिंदी-इंग्रजी या आवृत्तींच्या वार्षिक छपाईकामी मुंबई येथील १३ प्रेसधारकांकडून व्दिमासिकाचे अंक डमी नमून्यांसह कोटेशन्स इकडील पत्र जा.नं.एसएसएस/

वशी/प्रकाशने/७६१९/२००५ दि.१९.०७.२००५ अन्वये माहे सप्टेबर-ऑक्टोबर २००५ ते माहे मे-जून २००६ या कालावधीसाठी अंकाची छपाई करणेसाठी खालील तपशिलाप्रमाणे छपाई कोटेशन्स मागविण्यात आली होती.

| अ.नं | तपशील | अंदाजे छपाई संख्या |
|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२+४ पाने =३६ पाने | १५,००० नग |
| ०२ | साईलीला अंक हिंदी / इंग्रजी ३२+४ पाने =३६ पाने | १५,००० नग |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४+४ =६८ पाने | १५,००० नग |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी - इंग्रजी ६४+४ =६८ पाने | १५,००० नग |

छपाई कामाचे कोटेशन्स हे मुंबई येथील खाली दर्शविल्याप्रमाणे १३ प्रेसधारकांना पाठविण्यात येवून ते पूर्णपणे भरून दि.२९.०७.२००५ अखेर पाठविण्याची अंतिम मुदत संबंधीत प्रेसधारकांना कळविण्यातआली होती. तथापि प्रकाशने विभागाकडील दि.२८.०७.२००५ चे संबंधीत आशयाचे प्रस्तावावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार मुंबईतील सध्या अतिवृष्टीमुळे दळणवळणात झालेली अडचण लक्षात घेता संबंधित प्रेसधारकांना दि.०१.०८.२००५ अखेर कोटेशन भरून पाठविण्याचे दूरध्वनीद्वारा कळविण्यात आले होते.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.अमल ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे.रविक आर्टस ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा मुंबई |
| ०३ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स,मुंबई |
| ०४ | मे.सुमंगल आरटेक,मुंबई |
| ०५ | मे.मॅग्ना ग्रॉफिक्स,मुंबई |
| ०६ | मे.प्रिंटोग्राफि फोर्ट, मुंबई |
| ०७ | मे.प्रिंटमन्न लोअर परळ,मुंबई |
| ०८ | मौज प्रिटींग ब्युरो, गिरगांव मुंबई |
| ०९ | मे.चिराग प्रिंटर्स,मुंबई |
| १० | मे.सेफ ऑफसेट प्रिंटींग प्रेस, मुंबई |
| ११ | मे.उचिता ग्राफिक प्रिंटर्स प्रा.लि.,मुंबई |
| १२ | मे.ओम क्रिएशन्स,मुंबई |
| १३ | मे.इमेजस,मुंबई. |

उपरोक्तपैकी खालील पाच प्रेसधारकांनी आपली कोटेशन्स सादर केलेली होती. तसेच मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस, प्रा.लि.मुंबई यांना कोटेशन पाठविले नसतांनाही त्यांनी कोटेशन दाखल केलेले आहे. तथापि, सदरचे प्रेसधारक हे मुंबई येथील असल्याने त्यांचे कोटेशन्स विचारात घेण्यात यावे असें ठरले.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.रविक आर्टस ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा मुंबई |
| ०२ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स,मुंबई |
| ०३ | मे.मॅग्ना ग्रॉफिक्स,मुंबई |
| ०४ | मौज प्रिटींग ब्युरो, गिरगांव मुंबई |
| ०५ | मे.सेफ ऑफसेट प्रिंटींग प्रेस, मुंबई |
| ०६. | मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस्, प्रा.लि. मुंबई |

प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | तपशील | मे.रविक आर्टस ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा मुंबई | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स,मुंबई | मे.मॅग्ना ग्रॉफिक्स,मुंबई | मौज प्रिटींग ब्युरो, गिरगांव मुंबई | मे.सेफ ऑफसेट प्रिंटींग प्रेस, मुंबई | मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस्, प्रा.लि. मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ३२ पृष्ठांचा सर्वसाधारण मराठी अंक (एकूण १५००० प्रती) | | | | | | |
| | प्रती अंक छपाई दर | १५.०० | ५.९७ (१) | ११.७४ (४) | ११.७५ (२) | १०.०० | ११.६८ (३) |
| | अंकात ४ पानाची वाढ / घट झाल्यास प्रती अंक दर | १.२७ | ०.४२ | १.३८ | १.४५ | १.०० | १.३७ |
| | एकूण प्रती दर | १६.२७ | ६.३९ | १३.१२ | १३.२० | ११.०० | १३.०५ |
| ०२. | ३२ पृष्ठांचा सर्वसाधारण हिंदी-इंग्रजी अंक | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (एकूण १५००० प्रती) | | | | | | |
| | प्रती अंक छपाई दर | १५.०० | ५.९७ (१) | ११.७४(४) | ११.७५ | १०.०० (३) | ११.६८ (३) |
| | अंकात ४ पानाची वाढ / घट झाल्यास प्रती अंक दर | १.२७ | ०.४२ | १.३८ | १.४५ | १.०० | १.३७ |
| | एकूण प्रती दर | १६.२७ | ६.३९ | १३.१२ | १३.२० | ११.०० | १३.०५ |
| ०३. | ६४ पृष्ठांचा मराठी विशेष अंक (एकूण १५००० प्रती) | | | | | | |
| | प्रती अंक छपाई दर | २५.०० | ९.६५ (१) | २०.०९ (४) | २३.५० | १६.०० (२) | २०.०३ (३) |
| | अंकात ४ पानाची वाढ / घट झाल्यास प्रती अंक दर | १.२७ | ०.४२ | १.३८ | २.९० | १.०० | १.३७ |
| | एकूण प्रती दर | २६.२७ | १०.०७ | २१.४७ | २६.४० | १७.०० | २१.४० |
| ड) | ६४ पृष्ठांचा हिंदी-इंग्रजी विशेष अंक (एकूण १५००० प्रती) | | | | | | |
| | प्रती अंक छपाई दर | २५.०० | ९.६५ (१) | २०.०९ (४) | २३.५० | १६.०० (२) | २०.०३ (३) |
| | अंकात ४ पानाची वाढ / घट झाल्यास प्रती अंक दर | १.२७ | ०.४२ | १.३८ | २.९० | १.०० | १.३७ |
| | एकूण प्रती दर | २६.२७ | १०.०७ | २१.४७ | २६.४० | १७.०० | २१.४० |

(०१) श्री साईलीला व्दिमासिकाचे कव्हरसाठी १७० जीएसएम व आतील पानंसाठी ७० जीएसएम एलडब्लूसी युपीएम अल्ट्रा कंपनीचा पेपर वापरावयाचा आहे (लाईट वेट कोटेड पेपर)

(०२) उपरोक्त कोटेशन्स बघता मे.कमर्शिअल बुक बायडिंग वर्क मुंबई यांनी दिलेले दर निम्नतम आहेत. मे.सेफ ऑफसेट प्रिंटींग प्रेस मुंबई यांचे दर व्दितीय निम्नतम आहेत. मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस प्रा.लि. मुंबई यांचे दर तृतीय निम्नतम तर मॅग्ना ग्राफिक्स मुंबई यांचे दर चतूर्थ निम्नतम आहेत.

(०३) श्री साईलीला द्विमासिकासाठी युपीएम कंपनीचा कागद वापरणे आहे. त्यासाठी कंपनीचे मुंबईतील अधिकृत डिलर श्री राजकुमार जैन यांचेकडून त्यांचे कागदाचा सर्टिफाईड नमुना त्यांचे पत्रासोबत मागविणेत आलेला आहे.

उपरोक्त १ ते ४ प्रेसनी पाठविलेल्या डमी अंकाची सदर नमुन्यांशी तुलना केली असता निम्नतम दर दिलेले मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई व्दितीय निम्नतम दर दिलेले मे.सेफ ऑफसेट प्रिंटींग प्रेस, मुंबई यांचे नमूने (कंपनीचे नमुन्याशी जुळत नाहीत ) त्यामुळे श्रीसाईलीला द्विमासिक (विषेशांकासह) छपाईकाम मे.परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस्, मुंबई यांना देण्याचा निर्णय घेणेत यावा असा प्रस्ताव मा.मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२३. श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका -२००६ छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.४११.** सालाबादाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका-२००६ साठी छपाई करावयाची आहे.

**अ)** श्री साईबाबा दैनंदिनी -२००५ साठी निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचेकडून ८५,२६० नग छपाई दर प्रती नगास रू.२९.७० पैसे प्रमाणे रू. २५,३२,२२२/-एवढी रक्कम दैनंदिनी छपाईकामी खर्च झाली आहे. छपाई करण्यात आलेल्या एकूण ८५,२६० नग दैनंदिनी वितरण तपशील-

| | | |
|---|---|---|
| १) | संस्थान विश्वस्त,सन्माननीय पाहुणे, विभाग प्रमुख, पर्यवेक्षक यांना भेट म्हणून वाटप नग (शिर्डी कार्यालयामार्फत २४८४+ मुंबई कार्यालय ११० नग याप्रमाणे) | २५९४ |
| २) | दैनंदिनी विक्री -शिर्डी कार्यालय ७५३३५+ मुंबई कार्यालय ७,१६० एकूण विक्री | ८२४९५ |
| ३) | पोस्टाद्वारे | १७१ |
| | **एकूण-** | **८५,२६०** |

वरील दर्शविलेल्या तपशिलानुसार प्रत्यक्ष व पोस्टाद्वारा मिळून एकूण ८२,६६६ नगांची प्रती नगास रुपये ३०/- या सवलतीचे दराने विक्री करुन रुपये २४,७९,९८०/- इतकी रक्कम जमा झाली आहे.त्यातून विक्री दर रू. ३०/- यांतून छपाई दर रू. २९.७० पैसे वजा जाता रु.००.३० पै.प्रमाणे अधिक दराने विक्री करून रू. २४,८००/- एवढी जादा रक्कम जमा झाली आहे.

**ब) )** श्री साईबाबा दिनदर्शिका -२००५ साठी अजय ऑफसेट, पुणे यांचेकडू २,१०,८७५ नग छपाई दर प्रती नगास रू.०३.७९ पैसे प्रमाणे रू. ७,९९,२१६/- एवढी रक्कम दिनदर्शिका छपाईकामी खर्च झाला आहे. छपाई करण्यात आलेल्या एकूण २,१०,८७५ नग दिनदर्शिका वितरण तपशील-

| | | |
|---|---|---|
| १) | संस्थान विश्वस्त,सन्माननीय पाहुणे, विभाग प्रमुख, पर्यवेक्षक यांना भेट म्हणून वाटप नग (शिर्डी कार्यालयामार्फत २७४२+ मुंबई कार्यालय ५६ नग याप्रमाणे) | २७९८ |
| २) | दिनदर्शिका विक्री-शिर्डी कार्यालय २,००,६०५+ मुंबई कार्यालय ६,९४४ एकूण विक्री | २,०७,५४९ |
| ३) | पोस्टाद्वारे | ५२८ |
| | **एकूण-** | **२,१०,८७५** |

दर्शविलेल्या तपशिलानुसार प्रत्यक्ष व पोस्टाद्वारा मिळून एकूण २,०८,०७७ नगांची विक्री प्रती नगास रुपये ५/- या सवलतीचे दराने विक्री करुन रुपये १०,४०,३८५/- इतकी रक्कम जमा झाली आहे. विक्री दर रुपये ०५/- यांतून छपाई दर रू. ०३.७९ पैसे वजा जाता रु.१.२१ पै.प्रमाणे अधिक दराने विक्री करून रूपये २,५१,७७३/- एवढी जादा रक्कम जमा झाली आहे.

आता सन २००६ ची श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका ( ०१ जानेवारी २००६ ते ३१ डिसेंबर २००६ अखेर ) छपाई करुन घ्यावी लागेल . श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका-२००६ ही दोन्ही माहे ऑक्टोबर २००५ मध्ये विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

दि.२९-३१/०३/२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्रं.१३८ नुसार मे.मॅग्ना ग्रॉफिक्स,मुंबई यांचेसह निवडक प्रेसधारकांकडून संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो,श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईची कामे ही त्यांचेकडून कोटेशन मागविण्यात येवून छपाई कामाची कार्यवाही करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधीत निवडक प्रेसधारकांकडून श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ छपाई कामाचे कोटेशन्स बोलावून छपाई कामाची कार्यवाही करुन घेता येईल.

श्री साईबाबा दैनंदिनी २००६ व दिनदर्शिका २००६ खालील दर्शविलेल्या तपशिलानुसार छपाई करुन घेण्याचे प्रयोजन आहे. साईभक्तांना सवलतीचे दरात व मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांना अद्यावत एक्झीक्युटीव्ह दैनंदिनी/दिनदर्शिका उपलब्ध करुन देणे आहेत. दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मॅग्ना ग्रॉफिक्स,मुंबई यांचे मार्गदर्शन घेण्यात आले असून त्यांनी सुचविलेनुसार -

**(अ) <u>दैनंदिनी</u>**

०१. कव्हरसाठी १५० जीएसएम बिल्ट ग्रॉसी आर्ट पेपर त्यावर चार रंगात छपाई करुन मॅट लॅमिनेशन आणि स्पॉट यु.व्ही आणि १.८ एमएम काप्पा बोर्डवर चिकटविणे आहे.

०२. फोटो छपाईसाठी चार रंगात छपाई करणे असून त्यासाठी १०० जीएसएम बिल्ड ग्लॉसी पेपर वापरणे आहे.

**(ब) <u>दिनदर्शिका-</u>**

०१. दिनदर्शिका-

साईज- १४" x १९"
सिट- ६ सिटर
कलर- वॉरनीशसह ५ रंगांत छपाई
कागद - १०० जीएसएम बिल्ट ग्लॉसी आर्ट पेपर
फिनिशिंग - काळ्या रंगाची १४" मेटलपट्टी

**क) <u>दिनदर्शिका -</u>**

साईज - १७" x २२"
कलर - वॉरवीश सह ५ रंगात छपाई
कागद - १०० जीएसएम बिल्ट ग्लॉसी आर्ट पेपर
उपरोक्त तपशील दिलेप्रमाणे

०३) आतील पेपर - दैनंदिनीसाठी आतील बाजूस दोन रंगात तसेच ७० एसएसएम सन शाईन सुपर प्रिंटींग पेपर वापरणे आहे.

०४)आसपास दैनंदिनीचे मुखपृष्टाची आतील बाजूने मलपृष्ठाचे आतील बाजूसाठी दोन रंगात छपाई तसेच १२० जीएसएम सुपरसन शाईन प्रिंटींग पेपर वापरावयाचा आहे.

**(अ)** श्री साईबाबा दैनंदिनी २००६ ची ५०,००० नग छपाई दर रुपये ५०.०० प्रमाणे एकूण रुपये २५,००,०००/- **(ब)** श्री साईबाबा दिनदर्शिका २००६चे (कॅलेंडर) ६ सीट तारखेसह(प्रत्येक सीटवर २ महिने)७५,००० नग छपाई दर रुपये १०.०० प्रमाणे रुपये ७,५०,०००/-**(क)** दिनदर्शिका २००६ (कॅलेंडर) सिंगल सीट बिगर तारखेचे २०,००० नग छपाई दर रुपये ५.०० प्रमाणे रू. १,००,०००/- याप्रमाणे **''अ,ब, व क''** यासाठी एकूण अंदाजे रु.३३,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका -२००६ छपाईकामी नामांकित प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात यावीत. त्याचबरोबर मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे व मे.निर्मल ऑफसेट, नासिक या प्रेसधारकांकडूनही कोटेशन्स मागविण्यात यावीत असे ठरले.

(कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२४. श्री साईचरित्राचा गद्य रुपातील अनुवाद प्रसिध्द करण्यास परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४१२.** सौ.ज्योती जोशी, ठाणे यांचे दिनांक ११ जून २००५ रोजी दाखल झालेले पत्राद्वारा श्री साईचरित्राचा गद्य रुपातील अनुवाद प्रसिध्द करण्यास परवानगी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२५. ओरीया भाषेतून "संक्षिप्त श्री साईसतचरित्र " प्रकाशित करण्यास परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४१३** डॉ.कमलाकांत दास, चरम्पा (ओरिसा) यांचे दि.११.०७.२००५ रोजीचे विषयांकित संदर्भिय पत्रान्वये त्यांनी स्वतः " ओरिया भाषेतून संक्षिप्त श्री साईसत्चरित्र" लिहीले असून, सदरची हस्तलिखीत प्रत प्रकाशित करणेबाबत संस्थानची परवानगी मागितली आहे.उपरोक्त पत्राद्वारा सदरचे पुस्तक हे वाचकांना कमी वेळेत वाचता येईल या हेतूने दिवसातून सलग ७ अध्याय ३० ते ४५ मिनिटात पारायण करता येईल अशा पध्दतीने लिहिले असल्याचे कळविले असून, सदरचे पुस्तक प्रकाशित झाल्यास त्याचा भक्तांना चांगलाच उपयोग होईल असे कळविले आहे.

सदर पुस्तक प्रकाशनाबाबत ओरिया भाषेतील तज्ञ श्री.गिरिशचंद्र नायक यांचे शिफारस पत्र त्यांनी सोबत सादर केले आहे.

डॉ.कमलाकांत दास, चरम्पा (ओरिसा) यांनी ओरिया भाषेतील चरित्र कोणत्या पुस्तकावरून भाषांतरीत केले आहे, याचा उल्लेख नाही. तथापि, संस्थान प्रकाशित पुस्तकावरून सदरचे भाषांतर केले असेल तर श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच मूळ संहितेत बदल न करता ना नफा ना तोटा तत्वावर पुस्तक प्रकाशन करण्याचे अटीवर त्यांना परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुणे, विद्यापीठाचे कुलगुरुस पत्र पाठवून ओरिया भाषेचे प्राध्यापकाकडून डॉ.कमलाकांत दास, चरम्पा (ओरिसा) यांनी लिहिलेले श्री साईसत्चरित्राची तपासणी करुन घेण्यात यावी व त्यांचा अनुकूल अभिप्राय असल्यास ते संस्थानतर्फे प्रकाशित करावे.

तसेच विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष मा.डॉ. अरुण निगवेकर यांचेकडून वेगवेगळया भाषेत श्री साईसच्चरित्र भाषांतरीत करणारे तज्ञ मिळविणेसाठीही चर्चा करावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२६. साईप्रसाद नं.०२ करिता लगेज रॅक बनविणेबाबत.**

**निर्णय क्र.४१४.** चौकशी व निवासस्थान विभागाकडील साईप्रसाद नं.०२ या इमारतीमध्ये एकूण ७८ रुम्स असून सदरच्या रुम साईभक्तांचे निवासाकरीता चालू करण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये साईभक्तांना सामान ठेवणे करीता कुठल्याही प्रकारची सुविधा करण्यात आलेली नाही. तसेच भक्तांना रुममध्येही सामानासाठी सोय नाही. याकरीता ४X२X२ या साईजच्या ७८ नग लगेज रॅक बनविणे आवश्यक असल्याने त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | मागणी | दर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | एम.एस.स्क्वेअर पाईप २५X२५X३ | ३००० फुट | रुपये १४.०० प्र.फुट | ४२,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद नं.०२ करीता लगेज रॅक खरेदीकामी आवश्यक असणारे मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४२,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहू काम विभागाअंतर्गत करुन घेण्यात यावे असें ठरले.

(कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभाप्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२७. साईबाबा भक्तनिवासस्थानकडे असलेल्या कापूस गाद्यांचे नूतनीकरण करणे व सोलापूर चादरी खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१५.** अ)श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे खोल्यांमध्ये सध्या असलेल्या कॉट व्यतिरिक्त प्रत्येक जादा व्यक्तीकरीता सेवा आकार घेऊन त्यास प्रति माणसी एक गादी पुरविण्यात येते. तसेच तळमाळ्यातील खोल्या व जनरल हॉल या ठिकाणी भक्तांसाठी गादीचा वापर करण्यात येतो. याकरीता सध्या भक्तनिवासस्थान विभागाकडे २३१० गाद्या आहेत. सदरच्या गाद्या दिनांक ३०.०३.१९९८ व त्यापूर्वी त्या चौकशी व निवासस्थान विभागाकडे बनविण्यात आलेल्या आहेत. त्यातील गाद्यांचे कापड खराब झालेले आहे. त्यापैकी १००० गाद्यांचा कापूस सैल झाला असून त्या गाद्या गोळा झालेल्या आहेत. अशा गाद्यांकरीता नवीन गादी पाटाचे कापड घेऊन त्या गाद्या उसवून कापूस पिंजून नवीन गाद्या भरता येतील. तसेच ज्या गाद्या करीता गादी पाटाचे कापड आवश्यक आहे तसेच गाद्या उसविल्यानंतर कापूस पिंजून पूर्वीप्रमाणेच प्रति नग सात किलो प्रमाणे एक कापसाची गादी भरण्यात येईल त्यात झीज होण्याची शक्यता आहे.

तसेच नुतनीकरण होणाऱ्या गाद्यांकरीता कव्हरसाठी (खोळीसाठी ) कापड खरेदी करणे आवश्यक आहे.

ब) सोलापूर चादर या दिनांक १४.१२.१९९५ रोजी ३००० नग खरेदी करण्यात आलेल्या होत्या त्याचा वापर होऊन जवळ जवळ १० वर्षे झालेले आहेत. त्या फिकट रंगाच्या व काही चादरी जीर्ण झालेल्या आहेत त्याकरीता नवीन ३००० नग सोलापूर चादरी खरेदी करणे आवश्यक आहेत.

उपरोक्त बाबींकरीता खालीलप्रमाणे एकूण रुपये ११,९९,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ)

| अ.नं | कपड्याचा प्रकार | एकूण नग | प्रति नग कापड | एकूण कापड | दर प्रति मिटर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | गादी पाट कापड - पट्टा ६० इंच पन्ह्याचे | १००० | २.५० मिटर | २५०० मिटर | ७०.०० | १,७५,०००.०० |
| ०२. | गादीकव्हर (खोळ) करीता प्रिंटेड कापड ७२ इंच पन्ह्याचे | २००० | २.५०मिटर | ५००० मिटर | ७०.०० | ३,५०,००००.०० |
| ०३. | सोलापूर चादर ६०"x ९०" वजन अंदाजे १.५०० ते १.७०० कि.ग्रॅम | ३००० | --- | --- | २०० प्र.नग | ६,००,०००.०० |
| | | | | | एकूण रुपये | ११,२५,०००.०० |

गादीपाट, खोळी इत्यादी तयार करणेकामी खालीलप्रमाणे शिलाई, मजूरी खर्च अपेक्षित आहे.

ब)

| अ.नं. | तपशील | तयार करावयाचे एकूण नग | कामाचा तपशील | मजूरी दर प्रति नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | गादी पाट (गाद्यांचे नुतनीकरण) | १००० | शिलाई, भराई (जूनी गादी उसवून कापूस पिंजणेसह) | ५०.०० | ५०,०००.०० |
| ०२. | गादी खोळ | २००० | कापड कापणे शिलाई करणे | १२.०० | २४,०००.०० |
| | | | | एकूण रुपये | ७४,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गादीपाट कापड, गादीकव्हर, सोलापूर चादरी खरेदीकामी ३- ४ विश्वस्तांनी समक्ष सोलापूर येथे जाऊन प्रत्यक्ष नमूना पाहून उच्च प्रतीच्या व दर्जात्मक चादरी खरेदी करण्यात याव्यात. तसेच खरेदी केलेल्या प्रत्येक चादरीवर श्री साईबाबा संस्थान, भक्तनिवासस्थान, शिरडी असे नांव एकाच रंगात छापण्यात यावे. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ११,२५,०००/- चे खर्चास तसेच जुन्या गाद्या उसवणे, त्यातील कापूस पिंजणे, गादीपाट कापड कटींग करुन शिवणे, गादी भराई इत्यादी व गादीकरीता कव्हर (खोळी) शिलाई करणे या कामासाठी परिसरांतील काम करणा-या व्यक्तींकडून दरपत्रके मागवून सदरचे काम करुन घेण्यात यावे असें ठरलें. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ७४,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच चादरी, गादी व बेडशिट हे जास्तीत जास्त तीन वर्षाचे धरण्यात यावे व दर तीन वर्षांनी गादी, चादर व बेडशिट बदलण्यात यावेत. (कार्यवाही-भक्तनिवास्थान प्रमुख)

**विषय नं.२८. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तत्वत: मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र.४१६.** सदरहू विषयाबाबत वर निर्णय क्र.४०४ मध्ये चर्चा झालेली आहे.

**विषय नं.२९. सक्शन पाईप खरेदीस मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र.४१७.** कनकुरी साठवण तलाव येथे सम पंपरुम मध्ये २५ H.P.ची कप्पलसट मोटार व ३० H.P.च्या दोन पाणबुडी मोटारी बसविण्यात आलेल्या असून त्यांचा वापर शुध्द झालेले पाणी ओव्हर हेड टँक मध्ये सोडणेसाठी करण्यात येतो. पैकी २५ H.P.कप्पलसट मोटार ही पाणी पुरवठा योजना तयार झाली त्यावेळी बसविण्यात आलेली आहे. सदर योजनेस १५ ते १८ वर्षे पूर्ण झालेली असून कप्पलसट मोटारचे सक्शन पाईप कनेक्शन हे पाण्यातील केमिकल मुळे गंजलेले आहे. ते केंव्हाही लिकेज होण्याची शक्यता निर्माण झालेली असून सक्शन पाईप बदलविणे आवश्यक आहे. त्यासाठी ८" व्यासाचा सी क्लास ४० फुट पाईप आवश्यक आहे. शिवाय कनेक्शनसाठी जी.आय बेंड ८"-०१ नग तसेच एम.एस.फ्लँज ८"-०६ नग इत्यादी मटेरियलची आवश्यकता आहे. याबाबत मार्केट मध्ये चौकशी केली असता त्यासाठी खालील प्रमाणे तपशीलवार अंदाजे खर्च अपेक्षीत असलेला खर्चाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | मटेरियल तपशील | साईज | कंपनी | नग/फुट | प्रती नग/फुट अंदाजे दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | G.I. पाईप-६mm जाडीचा,सी क्लास | ०८"व्यास | प्रकाश-सुर्या | ४० फुट | ६,४३/- | २५,७२०/- |
| ०२ | M.S.फ्लँज -१०mm जाडीची | ०८"व्यास | हेवी | ०६ नग | ५,६०/- | ३,३६०/- |
| ०३ | G.I. बेंड -हेवी | ०८"व्यास | प्रकाश-सुर्या | ०१ नग | १,५००/- | १,५००/- |
| | | | | | एकूण अंदाजे किंमत- | **३०,५८०.००** |
| | | | | | व्हॅट-४%- | **१२२३.२०** |
| | | | | | एकूण अंदाजे किंमत- | **३१,८०३.२०** |
| | | | | | पूर्णांकित रुपये | **३१,८०३.००** |

वरील प्रमाणे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३०. नवीन प्रसादालय बांधकामासाठी पाणीपुरवठा करणेकामी पाईप लाईन करणेचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४१८.** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रसादालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम सुरू होणार आहे. बांधकाम चालू झालेनंतर बांधकामासाठी पाणी पुरवठा करावा लागणार आहे. सदरची नियोजित इमारत ही मौजे निमगांव-को-हाळे गट नंबर ८०व ८५ मधील जमिनीमध्ये होणार आहे. तेथे पाणी पुरवठा करणेसाठी आपले ओव्हर हेड टाकीपासून मंदिर परिसराकडे आलेल्या पाईपलाईनला ओढयाचे कडेला ३" पाईपलाईन जोडून पूढे श्री शेळके यांचे बांधाचे कडेने नेवून पाणी पुरवठा करावा लागणार आहे. त्याकरीता ३"पाईप व इतर मटेरियल खरेदी करून विभागांतर्गत काम पूर्ण करता येईल. पाईपलाईनसाठी खालीलप्रमाणे मटेरियल खरेदी करणे बाबतचा व याकामी अंदाजे रक्कम रुपये १,५४,२७१.०० खर्चाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | कंपनी | साईज | एकुण आवश्यकता | अंदाजे दर प्रती फुट/नग | अंदाजे एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जी.आय.पाईप - सी क्लास | प्रकाश सूर्या | ३" | १००० फुट | १३५/- | १,३५,०००/- |
| ०२ | जी.आय.सॉकेट | हेवी | ३" | ५० नग | ११५/- | ५,७५०/- |
| ०३ | गेटव्हॉल - क्लास - १ | लिडर कंपनी | ३" | ०२ नग | २,०००/- | ४,०००/- |
| ०४ | जी.आय.बेंड | | ३" | ०८ नग | २००/- | १,६००/- |
| ०५ | होलटाईट | इंडियन हेड | | ०१ किलो | १,०००/- | १,०००/- |
| ०६ | वॉटर फ्लो मिटर- | के.सी.कंपनी | ३" | ०१ नग | ६,९२१/- | ६,९२१/- |
| (अक्षरी रुपये एक लाख चोपन्न हजार दोनशे एकाहत्तर मात्र) | | | | | एकुण | **१,५४,२७१/-** |

यावर सविस्तर चर्चा होऊन नियोजित प्रसादालय बांधकामासाठी पाणीपुरवठा करणेकामी पाईप लाईन करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५४,७७१/- चे खर्चास मान्यता देणेत आली.

तसेच प्रसादालय चालू झालेनंतर पाणी पिण्यासाठी व भक्तांचे वापरासाठी थेट ओव्हरहेड टँक वरुन पाणी आणणेकामी ६" जी.आय.पाईपलाईन समावेश नियोजित प्रसादालय बांधकाम टेंडरमध्ये करण्यात यावा असें ठरलें.

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३१. धरणातून बंद नलिकेद्वारे पाणी आणणेबाबत.**

**निर्णय क्र.४१९.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी), पिंपळवाडी, कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजना सन १९८९ पासून चालू होवून १५ वर्षापासून कार्यान्वीत आहे. सदर योजना पूर्वी लहान स्वरुपात होती. साईभक्तांची गर्दी तसेच पिंपळवाडी, कनकुरी गावाची त्यावेळची लोकसंख्या विचारात घेतली होती. दिवसें-दिवस पाण्याचा वापर वाढत आहे. त्यामुळे २ तलाव जीवन प्राधिकरणामार्फत तयार करणेत आलेले आहेत. त्यांचाही वापर सध्या चालू आहे. एकूण योजनेची क्षमता ३३२ द.ल.लिटर्स आहे. सदरची क्षमता नाशिक इरिगेशनने ९० दिवसांची ठरविली आहे. तलावाची क्षमता वाढवूनही साईभक्तांची वाढती गर्दी, बगीचा बांधकामे इत्यादी कारणाने तलाव क्षमता लक्षात घेता त्यातील पाणीसाठा फक्त ४५ दिवस पुरतो आहे. पाणी पुरविण्यासाठी असलेली पाईपलाईन ही जमिनीखालून असल्याने तसेच ब-याच ठिकाणी लिकेजेस् आहे. पाण्याचे होणारे बाष्पीभवन व कमी पावसामुळे आजूबाजूस मोठया प्रमाणावर होणारे पर्क्युलेशन इत्यादीमुळे पाण्याचे लॉसेस जास्त आहे. तशात नाशिक इरिगेशनचे रोटेशनमध्ये फरक पडल्यास पाण्याचे नियोजन करुन पाणी पुरवठयामध्ये मोठया प्रमाणावर कपात करावी लागते त्यामुळे पाणी पुरवठयावर परिणाम होतो आहे. ही पाणी पुरवठा योजनेची सद्यस्थिती आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) पिंपळवाडी कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजनेसाठी व प्रदुषण रहित पाणी मिळणेसाठी निळवंडे धरणातील पाणी थेट पाईप लाईनद्वारे शिर्डी येथे उपलब्ध करणे करीता माहिती घेणे बाबत मा. अध्यक्षसाहेब यांनी तोंडी निर्देश दिलेले होते. त्यानूसार जा.नं.एसएसएस/वशी/पा.पु./८९७८/२००४ दि.०९/०९/२००४ अन्वये,मा.कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग संगमनेर यांचे कडून माहिती मागविली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/१०/२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्रं.२४ निर्णय क्रं.५६ अन्वये सविस्तर चर्चा होवून निळवंडे धरणातून थेट पाईप लाईनद्वारे संस्थानला पाणी आणणे कामी मा.श्री.जयंतरावजी ससाणे अध्यक्ष, मा.श्री.शंकररावजी कोल्हे उपाध्यक्ष, व मा. श्री.राधाकृष्णजी विखे पा. या त्रिसदस्यीय

समितीने चर्चा करुन आपला अहवाल सादर करावयाचा असे ठरले आहे. संबंधीचा अहवाल अद्याप येणे आहे.

यापूर्वी मागील मा.व्यवस्थापन मंडळापुढे सदरचा विषय ठेवणेत आलेला होता. तसेच नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक यांचे बरोबर चर्चा केली होती. तत्कालीन पाटबंधारे मंत्री मा.श्री पद्मसिंह पाटील हे दिनांक ०६/०६/२००३ रोजी शिर्डी येथे दर्शनासाठी आले असता हा विषय त्यांचे पुढे मांडण्यात आलेला होता. त्यावेळी त्यांनी पाईपलाईन टाकणेस तत्वतः मान्यता दिली होती.

त्यावेळी पाटबंधारे विभाग नाशिक यांनी जा.क्रं./सिंचन/९-४६४३/२००३ दि.०३/०७/२००३ चे पत्राने कडवा, कश्यपी, अगर वालदेवी धरणातून थेट पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा करता येईल असे म्हटले होते. तथापि ही जलाशयें बाराही महिने पाणी पुरवू शकतील का ? याबाबत शंका आहे त्यापेक्षा शिर्डी संस्थानने थेट दारणा धरणातून पाईप लाईन टाकल्यास त्यास शासनाची मान्यता देता येईल. असे त्यावेळेचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर श्री.गुंजाळ साहेब यांनी सुचविले.

संस्थानचा पाणी वापर भविष्यात फारच वाढणार आहे. शिवाय शेती महामंडळाच्या जमिनी मध्ये वेगवेगळे प्रोजेक्ट राबविणे तसेच नवीन प्रसादालय, हॉस्पिटल, शैक्षणिक संकुल, भक्तांची वाढती गर्दी, बागेसाठी पाण्याचा वापर वाढत आहे. त्यासाठी थेट जलाशयातून बंद नलिकेतून पाणी आणलेस पाणी स्वच्छ व भरपूर मिळेल तसेच शुध्दीकरणाचा खर्च कमी होईल. शिवाय दारणा धरणाची क्षमता मोठी आहे. व त्या पाण्याची शाश्वती आहे. यासाठी साईभक्तांना जाहीर अवाहन करुन त्यांचा सहभाग घेवून योजना राबविता येईल. म्हणजे यासाठी साईभक्तांचा सहभाग मिळाल्यास खर्चाचे प्रमाण विभागले जावून योजना पूर्ण करता येईल.

सदरची पाईप लाईन करणेसाठी जीवन प्राधिकरण किंवा एल.ॲन्ड टी. कंपनी, टाटा कंपनी अशा मोठया कंपन्यांकडून सर्व्हे करुन घेणेस तत्वतः मान्यता मिळाल्यास पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. तरी सर्व्हे करणेस व एस्टीमेट करणेस तत्वतः मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रथम निळवंडे व दारणा धरणातून पाईपलाईन करणेकामी प्राथमिक एस्टीमेट तयार करुन ते व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावे असे ठरलें. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३२. कनकुरी साठवण तलावासाठी कम्पाऊंड तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२०.** संस्थानची पाणी पुरवठा योजनेचा साठवण तलाव हा कनकुरी शिवारात असून, तो उघडया जागेत आहे. त्यास चारही बाजूंनी भरावा असून त्या भराव्यावरुन जाणे-येणे शक्य आहे. तेथे पिण्याचे पाणी साठविले जाते. तसेच नारळांचे झाडांची जोपासना केलेली असून त्यांचे संरक्षणासाठी तेथे कंपाऊंड असणे आवश्यक आहे. तसेच कनकुरी साठवण तलावात मत्स्यबीज सोडून मत्स्यपालन केले जाते. ते चोरी जातात. त्याचा बंदोबस्त होणेसाठी कंपाऊंड आवश्यक आहे. शिवाय- कोपरगांव पोलीस अधिक्षक यांनी पत्राद्वारे पाणी साठवण तलाव सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाय-योजना कराव्यात असे लेखी कळविले आहे. त्यासाठी सदर तलावासाठी अँगल रोऊन त्यास चैनलिंक जाळी वापरुन साधारणतः ८ फूट उंचीचे कंपाऊंड तयार केल्यास बाहेरील व्यक्ती, जनावरे इत्यादींपासून होणारा उपद्रव व धोका टाळता येईल.

याकरिता ढोबळमानाने खर्च काढला असता याकामी एकूण अंदाजे रुपये २५,००,०००/- मात्र पर्यंत खर्च येईल. परंतू सदरची उपाय-योजना ही कायमस्वरुपाची होईल. सदर कंपाऊंडसाठी खालील प्रमाणे मटेरीयल खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशिल | क्वॉन्टीटी | युनिट | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | खोदाई<br>१.१/२ x १.१/२ x २फूट | १२८.०० | एम- ३ | ४३.०० | ५,५०४.०० |
| ०२ | १: २ : ४ कॉक्रीट | १२८.०० | एम- ३ | १,४७४.०० | १,८८,६७२.०० |
| ०३ | अँगल ५०x५०x५ mm | १३,६३४.०० | किलो | ३०.०० | ४,०९,०२०.०० |
| ०४ | चैनलिंक जाळी<br>१.१/२"x १.१/२"x४mm | १,८२९.०० | रनिंग मी. | ६८२.०० | १२,४७,३७८.०० |
| ०५ | सपोर्ट गज ४ mm | ४५०.०० | किलो | ३०.०० | १३,५००.०० |
| ०६ | हुक | ८,०००.०० | नग | २.०० | १६,०००.०० |
| ०७ | काटेरी तार | ६० बंडल | ३० किलो<br>(१ बंडल) | ४२.००<br>(१२६० रु) | ७५,६००.०० |
| ०८ | कलर | ९६० किलो | किलो | ६०.०० | ५७,६००.०० |
| ०९ | थिनर | ३० किलो | किलो | ६०.०० | १,८००.०० |
| १० | फॅब्रिकेशन मजूरी<br>अ.नं. ३ + ४= | - | - | ३० % | ४,०८,४५९.०० |
| | | **एकूण-** | | | **२४,२३,५३३.००** |

तरी उपरोक्तप्रमाणे मटेरीयल व मजुरी वापरुन व ऐनवेळी येणारा खर्च ग्राहय धरुन कनकुरी साठवण तलावास कंपाऊंड करणेसाठी अंदाजे **रुपये २५,००,०००/-**मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३३.** **अपारंपारिक उर्जेअंतर्गत हायब्रीड सिस्टम (सोलर + विन्ड) उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.४२१.** मे.एक्साईड या कंपनीचे अधिकृत डिलर मे.मनीद्वार ; औरंगाबाद यांनी अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत हायब्रीड सिस्टिम ( सोलर + विन्ड ) यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. ही हायब्रीड सिस्टिम ( सोलर + विन्ड ) पवन ऊर्जेव्दारे ऊर्जानिर्मिती करते. व ही उर्जा बॅटरीजमध्ये साठविली जाते. व या बॅटरीजमध्ये साठविलेली डी.सी. टाईपची एनर्जी ( वीज ) ही कन्व्हर्टरद्वारे ए.सी. त रूपांतरीत केली जाते. व ही ए.सी.टाईपमध्ये रुपांतरीत वीज आपल्या यंत्रणेत वापरली जाते. ज्यावेळी पवनउर्जा उपलब्ध नसेल, त्यावेळी ही सिस्टिम सोलरवर सूर्यप्रकाशावर चालते.

या प्रोजेक्ट्द्वारे एकूण १० किलोवॅट इतकी वीजनिर्मिती होणार असुन याद्वारे श्री समाधी मंदिरातील ४० ट्युबलाईट व ४० फॅनला ०८ तास वीजपुरवठा होऊ शकेल. साधारणतः ७-८ वर्षात या प्रकल्पाच्या किंमतीची परतफेड मिळू शकेल.

या प्रकारचे व क्षमतेचे प्रकल्प (०१) वेस्ट बंगाल रिन्युव्युबेल एनर्जी डेव्हलपमेंट, मृत्यूंजय नगर , सागर आयलंड, पश्चिम बंगाल , (०२) सायन्स ॲड टेक्नॉलॉजी डिपार्टमेंट, बीओपी आऊटपोस्ट, त्रिपुरा (०३) वेस्ट बंगाल रिन्युव्यूबेल एनर्जी डेव्हलपमेंट, रुद्रानगर हॉस्पिटल , सागर आयलंड, पश्चिम बंगाल , (०४) मेडा, पुणे - पुणे एनर्जी पार्क, पुणे, (०४) मेडा, पुणे - कोल्हापूर जिल्हा परिषद , कोल्हापूर या ठिकाणी ऊभारल्याचे मे.मनीद्वार , औरंगाबाद यांनी कळविले आहे.

या प्रस्तावासाठी खालीलप्रमाणे खर्च येईल असे मे.मनीद्वार,औरंगाबाद यांनी कळविले आहे.:-

( अ ) १० किलोवॅट हायब्रीड सिस्टिम ( विन्ड + सोलर ) साठी येणारा खर्च :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१) | मशिनरी व अनुषंगिक खर्च | :- | रु. | २५,४५,१००.०० |
| ०२) | उभारणी खर्च | :- | रु. | ००,८०,०००.०० |
| ०३) | ट्रान्स्पोर्ट व विमा | :- | रु. | ००,४०,०००.०० |
| ०४) | सिव्हिल वर्क | :- | रु. | ०१,००,०००.०० |
| | | | रु. | २७,६५,१००.०० + टॅक्सेस |

सदरचे सिस्टिम साठी मिळणारी शासनाची सबसिडी व इतर खर्च यांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| | | | |
|---|---|---|---|
| मशिनरी व अनुषंगिक खर्च | :- | रु. | २५,४५,१००.०० |
| ऊपरोक्त खर्चाची विगतवारी पुढीलप्रमाणे :- | एकूण येणाऱ्या | रु.२४,४५,१००.०० पैकी | |
| संस्थानने करावयाचा मशिनरी मधील खर्च | २५% | रु. | ०६,३६,२७५.०० |
| शासनामार्फत करण्यात येणारा खर्च | ७५% | रु. | १९,०८,८२५.०० |
| | | रु. | २५,४५,१००.०० |

**<u>संस्थानने मे.मनिद्वार, औरंगाबाद यांना आदा करावयाची रक्कम पुढीलप्रमाणे :-</u>**

| | | |
|---|---|---|
| संस्थानने करावयाचा मशिनरी मधील खर्च | :- रु. | ०६,३६,२७५.०० |
| मेडा चार्जेस | :- रु. | ००,४०,०००.०० |
| उभारणी, सिव्हिल खर्च वगैरे | :- रु. | ०२,२०,०००.०० |
| | रु. | ०८,९६,२७५.००+ टॅक्स |

उपरोक्त किंमतीत टॅक्सेसचा समावेश नाही. होणारे टॅक्स अतिरिक्त ( जादा ) आदा करावे लागतील.

या प्रोजेक्ट्साठी संस्थानला फक्त रु. ०८,९६,२७५.०० + टॅक्स इतकी रक्कम खर्च करावी लागेल., असे मे.मनीद्वार , औरंगाबाद यांनी कळविले आहे.

याबाबतीत मेडाशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. तसेच फोनवरूनही संपर्क साधण्यात आला होता. दिनांक २४-०६-२००५ व दिनांक ३०-०६-२००५ रोजी मेडाशी फोनवरून संपर्क साधला असता श्री. उदय लव्हाटे हे हायब्रिड सिस्टिमचे प्रोजेक्ट पाहणारे अधिकारी फोनवरून बोलले. तसेच दिनांक ०२-०७-२००५ रोजी श्री. श्रीकांत सराफ, प्रोजेक्ट ऑफीसर ,मेडा, पुणे हे शिरडी येथे स्वतः

आले होते. त्यांनी स्वत: या प्रोजेक्ट्संबंधीच्या कागदपत्रांची पाहणी केली व याबाबतीत संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचेशी चर्चा केली.

श्री लव्हाटे, प्रोजेक्ट मॅनेजर, हायब्रिड सिस्टिम यांनी दिनांक ३०-०६-२००५ रोजी दूरध्वनीवरून तसेच श्री. श्रीकांत सराफ, प्रोजेक्ट ऑफीसर यांनी दिनांक ०२-०७-२००५ रोजी समक्ष अशी माहिती दिली की,

"मे.एक्साईड ही उत्पादक कंपनी मेडाच्या लिस्टवर असून मे.मनीद्वार, औरंगाबाद हे या कंपनीचे डिलर आहेत, संस्थानने मे.मनीद्वार, औरंगाबाद यांना काम देतेवेळी सबसिडी मेडाकडून मिळविणेबाबत संपूर्ण जबाबदारी मे.मनीद्वार, औरंगाबाद यांच्यावर सोपवावी व तसे करारनाम्यात नमूद करावे व त्याची लेखी माहिती मेडाला कळवावी. तसेच पेमेंट करताना सबसिडीची ७५ % रक्कम वजा करूनच फक्त राहिलेल्या २५ % रकमेचेच पेमेंट करावे. "

दिनांक २३-०६-२००५ रोजी मे.मनीद्वार , औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री. अभिजित एन.पटेल हे शिर्डी येथे स्वत: आले होते, त्यावेळी त्यांची याबाबतीत मा. अध्यक्षसाहेब यांचेशी समक्ष चर्चा झाली.

यावेळी, श्री. अभिजित एन.पटेल यांनी मे.एक्साईड ही उत्पादक कंपनी मेडाचे हायब्रिड सिस्टिमचे उत्पादकांचे अधिकृत यादीत असून अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांचेकडून हायब्रिड सिस्टिमचे सप्लायसाठी मान्यता मिळालेली एजन्सी आहे . तसेच संस्थानने सबसिडीची रक्कम (७५%) वजा करून बाकीचे पेमेंट ( २५% ) केले तरी हरकत नाही, मेडाकडून राहिलेली ७५ % सबसिडीची रक्कम मिळविण्यासाठी मे.मनीद्वार , औरंगाबाद हे स्वत: जबाबदार असतील असे समक्ष सांगितलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारिक उर्जेअंतर्गत हायब्रीड सिस्टम उभारणेकामी नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागविण्यात यावीत असे ठरले.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३४. साईनिवास अतिथीगृहाचे पॅसेजमध्ये लावण्यासाठी वॉल फॅन खरेदीकरणेबाबत.**

**निर्णय क्र.४२२.** साईनिवास अतिथीगृह पहिला माळा मिटींग हॉल समोरील पॅसेजमध्ये इमारतीचे नवीन बांधकाम करतेवेळी फॅनसाठी पॉईंट व फॅन बसविलेले नाही. त्यामुळे पॅसेजमध्ये फारच गरम होत आहे.

तरी त्याठिकाणी वॉल फॅन बसविणे गरजेचे आहे व त्याठिकाणी स्वतंत्र केसींग कॅपींग वायरींग करावी लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २३,२७५.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | वॉल फॅन, क्रॉम्प्टन मेक ४५० एम.एम.क्लासिक | ०८ नग | रू.२,५००/- (प्रति नग) | २०,०००.०० |
| ०२) | कॉपर वायर २.५ स्क्वेअर एम.एम. | ०४ बंडल | रू.०,६००/- (प्रति बंडल) | ०२,४००.०० |
| ०३) | केसींग कॅपींग पट्टी. मोदी मेक | ३०० फुट | रू.०,००३/- (प्रति फुट) | ००,९००.०० |
| ०४) | स्क्वेअर बॉक्स टू वे मोदी मेक | १० नग | रू.०,००५/- (प्रति नग) | ००,०५०.०० |
| ०५) | स्क्वेअर बॉक्स. मोदी मेक | ०५ नग | रू.०,००५/- (प्रति नग) | ००,०२५.०० |
| | | | एकूण रक्कम रूपये :- | २३,३७५.०० |

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३५. श्रींच्या मूर्तीवरील सोन्याचा मुलामा दिलेल्या छत्रीबाबत.**

**निर्णय क्र.४२३.** श्रींचे मूर्तीवर सध्या चांदीची छत्री वजन १०,५०० ग्रॅम व वरुन सोन्याचा मुलामा दिलेली अशी आहे. साईभक्त श्री रायपती सांबाशिव राव, गुटूंर ( आंध्र प्रदेश) यांनी दि. २५.०५.२००३ चे पत्रान्वये श्रींना सोन्याची छत्री ( वजन ५ किलो असलेली) देणगी म्हणून देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली. त्यानुसार व्यवस्थापन मंडळाचे दि. १२.०७.२००३ च्या सभेतील निर्णय क्र. २६१ अन्वये व दि.२३.११.२००३ चे व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्रं. ५४८ प्रमाणे श्रींच्या मूर्तीवर ५ किलो वजनाची सोन्याची छत्री श्री रायपती सांबाशिवराव यांचेकडून देणगी म्हणून स्विकारणेस मान्यता देण्यात आली.

छत्रीचे वजन किती असावे या बाबत श्री गोरक्षकर, निवृत्त संचालक प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझीयम, मुंबई यांचे मत मागविण्यात आले होते त्यांनी दि. ०८.०५.२००३ च्या पत्रान्वये आपला

अहवाल सादर केला असून त्यामध्ये नवीन छत्राचे वजन १० किलो ग्रॅम पेक्षा जास्त असू नये असे स्पष्ट म्हटले आहे.

या बाबत जा.नं. एसएसएस/वशी-मंदीर/११०८७/४ दि. २७/१०/२००४ चे पत्राने श्री रायपती सांबाशिव राव यांना छत्रीचे वजन (तांब्यासह) ०८ किलो पेक्षा जास्त नसावे असे कळविले आहे. श्री राव यांनी दि. १९.०५.२००५ रोजी श्रींना अर्पण केलेली छत्री तांब्याची असून त्यावर सोन्याचा मुलामा दिलेला आहे. या बाबतची तपासणी श्री टकले ज्वेलर्स, नाशिक यांचे प्रतिनीधी श्री सुनिल आहिरे यांनी केली असून सदर छत्रीस अंदाजे ८०० ते ८३० ग्रॅम सोन्याचा मुलामा असल्याचे त्यांनी आपले अहवालात नमूद केले आहे. सदर छत्रीचे वजन प्रत्यक्ष केले असता १२२५० ग्रॅम इतके भरले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी यांनी सुचित केलेप्रमाणे व प्रशासकीय अधिकारी यांचेशी चर्चा केलेप्रमाणे श्री गोरक्षकर यांना समक्ष छत्री दाखवून त्यांचे मत घेण्यात आले. त्यांनी आपल्या अहवालात खालील प्रमाणे नमूद केले आहे.

‘‘ गुटूंर चे श्री रायपती सांबाशिवराव यांनी देऊ केलेली नवीन छत्री आज पाहिली. ही नवीन छत्री १२ किलो वजनाची असून तांब्याच्या छत्रीवर सोन्याचा मुलामा असलेली ३६’’ इंच व्यासाची छत्री आहे. मे २००३ मध्ये या विषयाची चर्चा करतांना मी असं म्हटल होत की, नवीन छत्री सध्याच्या छत्री इतकी म्हणजे ०८ किलो वजनाची असावी अन् अगदीच Outer- Limit म्हणून १० किलो पर्यंतच असावी. नवीन छत्री करण्याच दुसरं कारण होत की, ती छत्री सोन्याची असावी. नवीन आलेली छत्री सोन्याची नाहीच पण तिचं वजन सुद्धा ०२ किलो जास्त आहे. या संदर्भात श्री टकले बंधू, नाशिक यांचही दि. १९.०५.०५ चे मत लक्षात घ्यायला हवं.

हे दोन्ही प्रश्न विचारांत घेता ही नवीन छत्री लावू नये या विचाराचा मी आहे. या पुढे सुद्धा विचार कधी करायचा झाल्यास वजनाचा विचार निश्चितपणे करावा लागेल आणि ०८ किलो वजन Standard मानावं लागेल ’’.

१) साईभक्त श्री रायपती सांबाशिवराव,गुंटूर यांनी श्रींचे छत्रीसाठी ५ किलो सोने वापरण्यात येईल असे लेखी दिलेले असून सुद्धा प्रत्यक्षात ८०० ते ८३० ग्रॅम सोने मुलाम्यासाठी वापरल्याचे निर्दशनास आले आहे.या बाबत श्री टकले बंधू ज्वेलर्स, नाशिक यांचे प्रतिनिधीने आपला अभिप्राय लेखी स्वरुपात दिलेला आहे.

२) छत्रीचे वजन ८ ते १० किलो दरम्यान असावे अशी सूचना देऊनही प्रत्यक्षात छत्रीचे वजन १२,२५० ग्रॅम इतके आहे.

३) श्री गोरक्षकर यांनी त्यांचे अभिप्रायामध्ये छत्रीचे वजन ८ किलो पेक्षा जास्त असू नये असे स्पष्ट केलेले आहे त्यामुळे सदर छत्री मूर्तीवर लावणेबाबत जोखमीचे वाटते.

४) श्री रायपती सांबाशिव राव यांनी दिलेल्या छत्रीस ८०० ते ८३० ग्रॅम एवढेच सोने मुलाम्यासाठी वापरलेले असून बाकी सर्व तांब्याचा पत्रा असल्याने देणगी पावती करतांना श्री टकले बंधू,नाशिक यांचे मार्गदर्शना नुसार पावती करणे उचित होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री रायपती सांबाशिव राव यांनी दिलेली छत्री नित्याचे वापरास योग्य नसल्याने सदरहू छत्रीची जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी असें ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

**विषय नं.३६. जुनी वापरात नसलेली मेल्ट्रॉन ईपीएबीएक्स टेलिफोन सिस्टम विक्री करणेकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.४२४.** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग व इतर परिसर एकमेंकाशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे जोडणेकामी सन १९९२ मध्ये मेल्ट्रॉन या कंपनीची २५६ पोर्ट क्षमता असलेली सी डॉट तंत्रज्ञानावर आधारीत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा (EPABX SYSTEM),महाराष्ट्र शासनाची अंगीकृत कंपनी मे.महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई (MELTRON ) यांचेकडून उपलब्ध करविण्यात आलेली होती. तद्नंतर, संस्थानचा वाढता व्याप व परिसर विकास, तसेच तंत्रज्ञानात झालेले मोठया प्रमाणावरील फेरबदल लक्षांत घेऊन, मा.विश्वस्त मंडळाच्या दिनांक २९-३१ मार्च, २००४ चे सभेतील निर्णयानुसार, थेट उत्पादक कंपन्यांकडून स्पर्धात्मक निविदा मागवून, निम्नतम दरानुसार मे. सिमेन्स इंडिया लि., मुंबई यांचेकडून २००० एक्सटेंन्शनच्या क्षमतेची डिजीटल तंत्रज्ञान आधारीत व अद्ययावत अशी अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा माहे ऑगष्ट,२००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

आता, उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेली मेल्ट्रॉन कंपनी सी-डॉट या तंत्रज्ञानावर आधारीत ईपीएबीएक्स सिस्टिम सध्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे विनावापर पडून आहे. या जुन्या यंत्रणेची

विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने, तीची पुनर्खरेदी करणेविषयी संदर्भ क्रमांक २ नुसार ०७ विविध दूरध्वनी यंत्रणा विक्रेत्यांना पत्र पाठवून पुनर्खरेदी किंमत देणेविषयी सुचविणेत आलेले होते. परंतु यापैकी फक्त दोन संस्थांनीच पुनर्खरेदीबाबत उत्सुकता दर्शविली व त्यानुसार त्यांनी सादर केलेले प्रस्ताव अत्यंत अल्प किंमतीचे असल्याने, उपरोक्त यंत्रणा एखाद्या शैक्षणिक संस्थेस नाममात्र शुल्क आकारुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २९ जानेवारी, २००५ चे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता.

या प्रस्तावावर संदर्भ क्रमांक ३ नुसार असा निर्णय घेण्यात आला की, सदर यंत्रणेच्या विक्रीसाठी मेल्ट्रॉन कंपनीच्या वितरकांकडे पुन:श्च विचारणा करावी व त्यांचेकडून पुन्हा दरपत्रके मागवून, सदर यंत्रणा विक्री करणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करणेत यावा.

या निर्णयानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागाकडील, रजिष्टर पोस्टाने पाठविण्यांत आलेले पत्र जा.क्र. एसएसएस/वशी/आयटी/ ३१८३/ ०५, दिनांक २९ मार्च,२००५ नुसार मेल्ट्रॉन कंपनीच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयांसह, मेल्ट्रॉन कंपनीचे अधिकृत विक्रेते व इतर, अशा एकूण १४ विक्रेत्यांना, उपरोक्त दूरध्वनी यंत्रणा पुन:र्खरेदीची किंमत दिनांक १५ एप्रिल, २००५ अखेर बंद पाकिटात लेखी स्वरुपात देण्यांस कळविण्यात आले होते.

उपरोक्त परिच्छेदातील, संदर्भ क्रमांक ०४ चे पत्रानुसार पाठविण्यांत आलेल्या १४ रजिष्टर्ड पत्रांपैकी मे.मेल्ट्रॉन कंपनी, मुंबई कार्यालयाचे पत्र ( Left असा पोष्टाचा अभिप्राय असलेले ) व याच कंपनीचे औरंगाबाद कार्यालयाचे पत्र (Co. Closed असा पोष्टाचा अभिप्राय असलेले) या कार्यालयांस परत मिळालेले आहे.

याव्यतिरिक्त, फक्त पुढील दोन विक्रेत्यांकडून मेल्ट्रॉन दूरध्वनी यंत्रणा पुर्न:खरेदीकामी पत्रे प्राप्त झालेली आहेत, त्याचा तपशील :

**०१. Prelude Netcomms, Mumbai**

(आवक क्रमांक ८०८५ दि.०८/०४/२००५ आवक विभागाकडून उघडून मिळालेले आहे.)

**०२. Doorsandesh Seva Kendra, Aurangabad**

(आवक क्रमांक ८५२१ दि.१३/०४/२००५ बंद पाकिट.)

यांशिवाय संदर्भासाठी पुर्वीच्या दरपत्रकांचा तपशील पुनश्च पुढीलप्रमाणे-

०१. Hi-Tech Enterprises, Aurangabad रक्कम रुपये १०,०००/-
( दिनांक २५ नोव्हेंबर,२००४ चे पत्रानुसार )

०२. Prelude Netcomms, Mumbai रक्कम रुपये १६,०००/-
( दिनांक २९ डिसेंबर,२००४ चे पत्रानुसार )

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले अ.नं.२ चे बंद पाकिट मा.व्यवस्थापन समितीपुढे उघडणेस व निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानकडे जुनी वापरात नसलेली मेल्ट्रॉन ईपीएबीएक्स टेलिफोन सिस्टम दुरुस्त करुन जंगली महाराज आश्रम, कोकमठाण यांना देणगी म्हणून देण्यात यावी असें ठरले.

(कार्यवाही - आय.टी.विभागप्रमुख/अधिक्षक, दप्तर विभाग)

**विषय नं.३७.** **अद्ययावत सी. सी. टी. व्ही. सिक्युरिटी सिस्टीम खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२५.** अद्ययावत सी.सी.टि.व्ही.-सिक्युरिटी (सिस्टीम मध्ये टेलीआय युनिट, रेकॉर्डीग, स्मोक व P.I.R. डिटेक्टर, मॉनिटरींग इ. सोयी असलेल्या) सिस्टीमसाठी प्रस्ताव अहवाल देणेबाबत संस्थानने १. डि-राम इंटरप्रायजेस, मुंबई २. Futurz ,मुंबई ३. अल्फा सिक्युरिटी, मुंबई या तिघांना कळविले होते. त्यापैकी (१) डि-राम इंटरप्रायजेस, मुंबई यांनी सविस्तर प्रोजेक्ट रिपोर्ट दिलेला असून त्यानंतर दि. २८ जून, २००५ रोजी कोटेशनही दिलेले आहे. (२) Futurz ,मुंबई यांचा प्रस्ताव व अहवाल सविस्तर नसल्यामुळे त्यांचे सिस्टीमबाबत विचार करता येत नाही. (३) अल्फा सिक्युरिटी,मुंबई चे मालक श्री संजय पटेल यांनी ई-मेल द्वारे कळविले होते की मी स्वत: जूलैच्या पहिल्या आठवडयात येवून प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन देईल परंतू अद्यापपर्यंत ते आले नसता त्यांचे संबंधीतांशी फोनवर ३ वेळेस चर्चा केल्यानंतर ते परदेशात असल्यामुळे आलेले नाहीत असे सांगितले.

त्यामुळे आपण डि-राम इंटरप्रायजेस, मुंबई यांचे सिस्टीमचा विचार करीत आहोत. याशिवाय त्यांनी दि. १६ जून ते २३ जून, २००५ अखेर शिर्डी संस्थानमध्ये टेलीआय युनिट, स्मोक व P.I.R. डिटेक्टर फिट करुन संरक्षण विभागात प्रात्यक्षिक दिलेले आहे.

संरक्षणाच्या दृष्टीने ( सर्व मंदिर, दर्शन लाइन, संस्थान परीसर, या ठिकाणी ) अद्ययावत सी.सी.टि.व्ही. सिस्टीम टप्प्याटप्प्याने करावी असे वाटते. पहिला टप्पा समाधी मंदिर, द्वारकामाई,

चावडी, व गुरुस्थान या मंदिरांत एकूण १६ कॅमे-यांची सिस्टीम कशी बसवावी याबाबत दि. २६ जुलै, २००५ रोजी मा.प्र.अ. श्री जगताप सो. यांचे केबीनमध्ये मिटींग झाली. या मिटींगसाठी मा. प्र.अ.श्री. जगताप सो., मा.प्र.अ.श्री देशपांडे सो., मा. मुख्यलेखाधिकारी श्री कोते सो., संरक्षण अधिकारी श्री. ढिकले, आय.टी. विभागप्रमुख श्री औटी, डि-राम इंटरप्रायजेसचे मालक श्री देशपांडे व श्री रत्नपारखी यांचेसह ध्वनिक्षेपण-सी.सी.टि.व्ही. विभागप्रमुख श्री. श.अं. कुलकर्णी हजर होते. सदर मिटींगमध्ये खालीलप्रमाणे प्रस्ताव ठरविण्यात आला.

संरक्षणच्या दृष्टीने समाधी मंदिरात एकुण १०, चावडीत ०२, द्वारकामाई ०३, व गुरुस्थानमध्ये ०१ असे एकुण १६ कॅमेरे फिट करण्याचे ठरले आहे. त्यासाठी लागणारे डिटेक्टर, इतर मटेरियल व केबल फिटींगच्या खर्चासह सोबत डि-राम इंटरप्रायजेस यांचे टेंडर डॉक्युमेंट जोडलेले आहे. त्याप्रमाणे एकुण रू. ११,३७,७९१/- खर्च अपेक्षित आहे. मात्र सोबतच्या एकुण मटेरियलमधील १६ कॅमेरे व २९ इंची ५ टि.व्ही. पैकी संस्थानकडे ४ कॅमेरे उपलब्ध आहे, २९ इंची टि.व्ही. उपलब्ध नाहीत. उपलब्ध ४ कॅमे-यांची एकुण किंमत रू. ४२,०००/- कमी होता रू. १०,९५,७९१ एवढा खर्च अपेक्षित आहे तसेच केबल रनिंग फुटाप्रमाणे जी रक्कम कमी होईल ती रक्कम डि-राम यांनी दिलेल्या एकूण रकमेतून वजा करता येईल. तसेच प्रासंगिक खर्च रु. ५०,०००/- असे एकूण रुपये ११,४५,७९१/- खर्चास मान्यता असावी.

सदरच्या सिस्टीमचे मॉनिटरींग व कंट्रोल केबीन संरक्षण विभागात ठेवून तेथील कर्मचारी कंट्रोल पॅनलबोर्ड ऑपरेट करतील याशिवाय आय.टी. विभागामार्फत सॉफ्टवेअर- हार्डवेअर मेन्टेनन्स् बाबत लक्ष ठेवणे गरजेचे आहे. सी.सी.टि.व्ही. सिस्टीमबाबतचे मेन्टेनन्स् ध्वनिक्षेपण-सी.सी.टि.व्ही. विभागामार्फत करण्यात येईल.

तरी डि-राम यांचे टेंडर डॉक्युमेंटप्रमाणे खालील पुरवठादारांकडून कोटेशन मागवून सिस्टम खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये ११,१५,०००/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

१). डि-राम इंटरप्रायजेस,मुंबई.
२). फायरसेफ इंजिनिअरींग प्रा. लि., अंधेरी - मुंबई
३). सोलूसन्स् अनलिमिटेड, पुणे.
४). रुपाली टेडर्स ॲन्ड इलेक्टर, कोपरगांव.
५). अल्फा सिक्युरिटी प्रा. लि. ,मुंबई.
६). इलेक्ट्रॉनिक्स् इंडिया लि., मुंबई.

( कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभागप्रमुख)

**विषय नं.३८. माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तंत्रज्ञ या पदावर करण्यात आलेल्या मानधन तत्वावरील तात्पुरत्या स्वरुपाच्या नेमणूकीस मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६.** **(अ)** मा.विश्वस्त मंडळाचे दिनांक २० ऑगष्ट,२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४२० अन्वये, ई-टेम्पल अंतर्गत कार्यालयाचे आर्थिक व्यवहारासंबंधी कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी, आयआयएमव्ही,पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेल्या संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात वेळोवेळी अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी (adjustments), व्यवस्थापनाच्या बदलत्या व वाढत्या गरजांनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व विस्तारासाठी (Enhancement) सदरील आज्ञावलींची दुरुस्ती-देखभाल करणेकामी, तीन कुशल तंत्रज्ञांची नेमणूक एकत्रित वित्तलब्धी-तथा-कंत्राटी तत्वावर, करण्यात यावी. ह्या नेमणूका पुढील एक वर्षासाठी कंत्राटी तत्वावर प्रत्येकी रुपये १२,५००/- मात्र, पर्यन्त, उचित मासिक एकत्रित वित्तलब्धीवर करण्यात याव्यात, असा निर्णय घेणेत आला होता.

**(ब)** उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, संदर्भ क्रमांक ०२ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णय क्रमांक १४५ (अ) नुसार व संदर्भ क्रमांक ०३ चे मंजूर टिपणीनुसार, प्रशासन शाखा जावक क्रमांक एसएसएस/वशी १/६८६३/२००५ दिनांक ०१ जुलै, २००५ च्या नेमणूक आदेशानुसार श्री. प्रसाद नारायण जोशी, आयआयएमव्ही, पुणे यांची तंत्रज्ञ म्हणून अगदी तात्पुरत्या स्वरुपात म्हणजे कामावर हजर होतील त्या दिवसापासून दिनांक ३१ ऑगष्ट,२००५ अखेर नेमणूक करणेत आलेली आहे. श्री.जोशी हे तंत्रज्ञ म्हणून सध्या लेखाशाखेतील संगणक कार्यप्रणाली, आयआयएमव्ही,पुणे मार्फत कार्यन्वीत करण्यांत आलेल्या इतर सर्व संगणक कार्यप्रणालीत आवश्यकतेनुसार अनुषंगिक फेरफार व बदल करणे, त्यांचा विस्तार करणे इत्यादी कामकाज पाहत आहेत. तसेच सध्या ते संस्थान कर्मचाऱ्यांचे परिपूर्ण पगारबील व वैयक्तिक माहितीची संगणक कार्यप्रणाली कार्यरत करणेसाठी स्वतंत्ररित्या जादा वेळ देऊन पगारबील ही अत्यंत महत्वाची संगणकीय कार्यप्रणाली तयार करीत आहेत.

ई-टेम्पल अंतर्गत कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी, तयार करण्यात आलेल्या विविध संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी

(adjustments), गरजेनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व आज्ञावलींच्या विस्तारासाठी (Enhancement) तसेच संगणकीय जाळयाचे देखभाल दुरुस्तीसाठी (Network Maintaince) आपणांस या क्षेत्रातील अनुभवी तंत्रज्ञाची अत्यंत आवश्यकता आहे. सध्या आपणकडे या क्षेत्रातील परिपूर्ण असा तंत्रज्ञ उपलब्ध नाही. श्री.जोशी सध्या हे कामकाज चांगल्याप्रकारे सांभाळीत आहेत. यासाठी त्यांची मुदत दिनांक ०१ सप्टेंबर, २००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी सध्या आहे त्याच एकत्रितरित्या रुपये ७०००/- (अक्षरी रुपये सात हजार मात्र) या मानधनावर तातपुरत्या स्वरुपात "तंत्रज्ञ" म्हणून नेमणूक देणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- आय.टी.प्रमुख /अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.३९. मुक बधीर विद्यालय, शिर्डी यांचेकडील विद्यार्थ्यांना मोफत प्रसाद भोजन देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२७.** श्री साईश्रध्दा ग्रामीण मूक-बधीर विद्यालय ,शिरडी या संस्थेमार्फत परिसरातील मूक-बधीर मुलांसाठी विद्यालय चालवित आहे. सदर विद्यालय सुरु करतांना शासकीय अनुदान मिळत नसल्याने त्यांचेकडील विद्यार्थ्यांना संस्थानकडून दोन वेळेस मोफत भोजन मिळणेबाबत दि. १३/६/१९९६ चे विनंती अर्जानुसार तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने दि. ६/१०/१९९६ चे सभेतील निर्णय क्र. २०४ अन्वये सदर विद्यालयास शासकीय अनुदान मंजूर होई पावेतो विद्यार्थ्यांना मोफत भोजन देणेस मान्यता दिलेली होती.

सदर विद्यालयास मा.आयुक्त अपंग कल्याण , महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील क्र. अकआ/नअसुप/पदमंजूरी /२००४ - ०५ /२००२ दि. २०/९/०४ नूसार ४० निवासी विद्यार्थ्यांसाठी अनुदान मंजूर झाल्याचे पत्र क्रं. १५०/२००४ दि. २०/११/०४ ने संस्थेकडून कळविणेत आलेले होते व एकूण ७५ विद्यार्थी निवासी असून शासन मान्य ४० विद्यार्थ्यांना कमीत कमी मासिक दरात भोजन पास मिळावा व उर्वरीत ३५ विद्यार्थ्यांना पूर्वी प्रमाणे मोफत भोजन मिळावे अशी विनंती केली होती.

संस्थेच्या वरील पत्रावर विचार होउन मा.व्यवस्थापन समिती दि. ८/२/२००५ चे सभेतील निर्णय क्रं. ८२ ने ४० विद्यार्थ्यांना रु. १३५/- प्रमाणे मासिक सवलतीचे दराने व उर्वरीत ३५ विद्यार्थ्यांना दोन वेळ मोफत भोजन देणेस मान्यता दिलेली होती. त्यानुसार सदर संस्थेने दि. २०/११/०४ ते २०/४/२००५ अखेर ५ महिन्याची (४० विद्यार्थ्यांची ) रक्कम रु. २७,०००/- संस्थानकडे चेक नं. ९८५०५० दि. २४/४/०५ ने जमा केली आहे. दि. १५/४/२००५ ते ६/६/२००५ पर्यंत शाळेला सुटया लागलेल्या होत्या.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मूक-बधीर विद्यालय , शिरडी यांनी दि. १/६/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की- आमचे विद्यालयाचे एकूण ७५ विद्यार्थी संख्येस शासन अनुदानीत मान्यता प्राप्त झालेली आहे व अनुदान मान्यता मंजुरीचे पत्र सोबत जोडले आहे. दि. १/६/०५ चे पत्रान्वये विनंती केली आहे की - पूर्वी मंजूर झालेल्या ४० विद्यार्थ्यांप्रमाणे उर्वरीत ३५ विद्यार्थ्यांना रु. १३५/- प्रति महिना प्रमाणे आकार भरुन (सशुल्क भोजन) भोजन मिळावे व सदर पत्रामध्ये ७५ विद्यार्थ्यापेक्षा जादा निवासी विद्यार्थी वाढल्यास त्यांना पूर्वीप्रमाणे विनामूल्य भोजन मिळावे अशी विनंती केलेली आहे.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुक-बधीर विद्यालय , शिरडी यांनी दि. २४/६/२००५ चे पत्रामध्ये नमूद केले आहे की एकूण ७५ पैकी ४० विद्यार्थ्यांना मान्यता पूर्वीच मिळालेली आहे. आता उर्वरीत ३५ विद्यार्थ्यांचे बाबतीत कार्यालयीन आदेश ७ जानेवारी २००५ रोजी निघालेला आहे. ७ जानेवारी २००५ पासून ३५ विद्यार्थ्यांचा भोजन आकार रु. १३५/- दरमहा प्रमाणे भरण्यास तयार असलेबाबत संस्थेने कळविलेले आहे. त्यानुसार ७ जानेवारी ०५ पासून ३५ विद्यार्थ्यांचा भोजन आकार वसूल करता येईल.

तरी श्री साईश्रध्दा ग्रामीण मूक-बधीर विद्यालय, शिरडी या संस्थेच्या (४०+३५) ७५ विद्यार्थ्यांना सवलतीचे दरात रु. १३५/- प्रमाणे सशुल्क भोजन देणेबाबत व ७५ पेक्षा जादा विद्यार्थी वाढल्यास त्या वाढीव विद्यार्थ्यांना अनुदान मंजूर होईपावेतो विनामूल्य भोजन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकरी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी०५/प्रसादालय प्रमुख)

**विषय नं.४०. संस्थानच्या वतीने न्यायालयीन कामे पाहणेसाठी ॲड. भवर, ॲड. वाघ ॲड.ठोळे, ॲड.होन व ॲड. रघुवंशी यांची ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२८.** श्री साईबाबा संस्थान,विश्वस्तव्यवस्था(शिर्डी ) चे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी, फौजदारी, तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. न्यायालयांमध्ये संस्थानचे वतीने दाव्यांचे काम पहाणे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील ॲडव्होकेटस्च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नांव | न्यायालयाचे ठिकाण |
|---|---|---|
| (०१) | श्री. पी.डी. गुजराथी | कोपरगांव |
| (०२) | श्री. डी. डी. कुलकर्णी | कोपरगांव |
| (०३) | श्री. डी. व्ही. वझे | कोपरगांव |

(०४) श्री. जे. के. गोंदकर — कोपरगांव
(०५) श्री. अशोक पाटील — अहमदनगर
(०६) श्री. एन. जी. तांबोळी — अहमदनगर
(०७) श्री. आर.एन.धोर्डे — औरंगाबाद हायकोर्ट (बेंच मुंबई )
(०८) श्री. अनिल बजाज — औरंगाबाद हायकोर्ट (बेंच मुबई)

आता,वरील प्रमाणेच संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेकामी खालील ॲडव्होकेट यांनी इच्छा प्रदर्शित केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | ॲडव्होकेटचे नांव | न्यायालयाचे नांव |
|---|---|---|
| (०१) | श्री विनायक होन | औरंगाबाद हायकोर्ट |
| (०२) | श्री राजेंद्र रघुवंशी | औरंगाबाद हायकोर्ट |
| (०३) | श्री. नितीन भवर | औरंगाबाद हायकोर्ट |
| (०४) | श्री. बाबासाहेब वाघ | औरंगाबाद हायकोर्ट |
| (०५) | श्री ए.आर.गाडेकर | जिल्हा न्यायालय अहमदनगर |
| (०६) | श्री. रमेशचंद्र ठोळे | कोपरगांव कोर्ट |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे ०१ ते ०६ ॲडव्होकेट यांना संस्थानचे पॅनेलवर नेमणूक देण्यात यावी. तसेच या नावांमध्ये ॲड.एस.एम.वाघ, ज्युनिअर डिव्हीजन, राहाता, कोपरगांव तसेच सिनिअर डिव्हीजन व डिस्ट्रीक्ट कोर्ट कोपरगांव, हायकोर्ट यांचेही नावांचा समावेश करण्यात यावा असें ठरलें.

( कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना )

**विषय नं.४१. वैद्यकीय अधिकारी, वरिष्ठ लेखापाल,अधिक्षक, तंत्रज्ञ, लिपीक-टंकलेखक, वर्ग-४ चे कर्मचारी यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.४२९.अ)** ०१.डॉ.संतोष पांडुरंग गोंदकर,यांची वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) या पदावर श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीत तसेच

०२)डॉ.मृणालिनी सं.गोंदकर,(भूलतज्ञ),डॉ.हर्षदा म.शिरसाठ व डॉ.विष्णुकांत रा. राठी (जनरल डयुटी) तसेच श्री वसंत भा.लबडे,एक्स-रे टेक्नीकल ऑफीसर या पदांवर रु.८०००-१३,५०० या वेतनश्रेणीत

०३)सर्वश्री भाऊसाहेब दा.साबळे,प्रभाकर भि.बोरावके,दिलीप त्रि.उगले,नारायण के.कुलकर्णी लक्ष्मण स.चव्हाण,उत्तम पं.गोंदकर,व अशोक ना.झुरंगे यांच्या अधिक्षक या पदावर व चांगदेव सं.साबळे,वसंत ना.जेजूरकर,कैलास सो.खराडे यांच्या वरिष्ठ लेखापाल तसेच राजेश र.वाकडे,मेडीको इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर यांची रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत,

०४)श्री बाळासाहेब म.तुंबारे,सिटी स्कॅन टेक्नीशियन,यांची रु.५०००-८०००० या वेतनश्रेणीत,

०५)सर्वश्री रमेश चां.पुजारी व अनिल के.शिंदे यांच्या तांत्रिक सहाय्यक या पदावर रु.४०००-६००० या वेतनश्रेणीत,

०६)श्री दिपक ए.कुलकर्णी यांची लिपीक टंकलेखक या पदावर रु.३०५०-४५९० या वेतनश्रेणीत,

एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.त्यांचेबाबतचा सर्वसाधारण तपशील खालील प्रमाणे

| अनं. | कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ.संतोष पां.गोंदकर<br>वै.अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) | एम.बी.बी.एस.एम.एस | ०१/०७/२००४ | ३०/०६/२००५ |
| ०२. | डॉ.मृणालिनी सं.गोंदकर<br>वै.अधिकारी (भुलतज्ञ) | एम.बी.बी.एस.डी.ए. | ०१/०७/२००४ | ३०/०६/२००५ |
| ०३. | डॉ.हर्षदा म.शिरसाठ<br>वै.अधिकारी (जनरल डयुटी) | एम.बी.बी.एस<br>डी.जी.ओ | ०९/०६/२००४ | ०८/०६/२००५ |
| ०४. | डॉ.विष्णुकांत रामेश्वर राठी<br>वै.अधिकारी,(जनरल डयुटी) | एम.बी. बी.एस. | ०९/०८/२००४ | ०८/०८/२००५ |
| ०५. | श्री वसंत भा.लबडे,<br>एक्स रे टेक्नीकल ऑफीसर | बी.एस्सी क्ष-किरण शास्त्र | ३०/०६/२००४ | २९/०६/२००५ |
| ०६ | श्री बाळासाो.म.तुंबारे<br>सिटी-स्कॅन टेक्नीशियन | बी.एस्सी क्ष-किरण तंत्रज्ञ | ०५/०७/२००४ | ०४/०७/२००५ |
| ०७ | श्री राजेश र.वाकडे<br>मेडीको इले.इंजिनियर | बी.ई. इले. | ०७/०७/२००४ | ०६/०७/२००५ |
| ०८ | श्री प्रभाकर भिकोबा बोरावके, अधिक्षक<br>(खरेदी विभाग) | बी.ए. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०९. | श्री भाऊसाहेब दाजीबा साबळे,अधिक्षक (आस्थापना) | बी.ए. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १० | श्री दिलीप त्रिंबक उगले अधिक्षक,रुग्णालय | एम.कॉम. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| ११ | श्री नारायण केशव कुलकर्णी, अधिक्षक ( रेकॉर्ड विभाग ) | बी.कॉम.<br>डी.पी.एम<br>जी.डी.सी & ए | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १२ | श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर, अधिक्षक,(भांडार विभाग) | बी.ए. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १३ | श्री अशोक नामदेव झुरंगे अधिक्षक,मिटींग विभाग | एम.ए. | ०३/०८/२००४ | ०२/०८/२००५ |
| १४ | श्री चांगदेव संतु साबळे, वरिष्ठ लेखापाल,लेखाशाखा | बी.कॉम | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १५ | श्री कैलास सोनाजी खराडे वरिष्ठ लेखापाल,लेखाशाखा | एम.कॉम | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १६ | श्री रमेश चांगदेव पुजारी तांत्रिक सहाय्यक . माहिती तंत्रज्ञान विभाग | बी.सी.एस<br>एम.एस.<br>सी.आयटी. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १७ | श्री अनिल केशवराव शिंदे तांत्रिक सहाय्यक माहिती तंत्रज्ञान विभाग | बी.सी.एस<br>एम.एस.<br>सी.आयटी. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| १८. | श्री दिपक ए.कुलकर्णी, लिपीक टंकलेखक लेखाशाखा | एम.कॉम.<br>सी.ए. इन्टरमिजीएट | २३/०८/२००४ | २२/०८/२००५ |
| १९ | श्री लक्ष्मण सदाशिव चव्हाण, अधिक्षक (लेखाशाखा विभाग) | एम.ए. | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |
| २० | श्री वसंत नाना जेजूरकर वरिष्ठ लेखापाल,लेखाशाखा | बी.कॉम | ०२/०८/२००४ | ०१/०८/२००५ |

उपरोक्त अ.नं.०१ ते १८ वरील वैद्यकीय अधिकारी / तंत्रज्ञ / अधिक्षक/वरिष्ठ लेखापाल / तांत्रिक सहाय्यक / लिपीक टंकलेखक यांचे काम,वर्तणूक समाधानकारक असून,त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञ यांचेबाबत वैद्यकीय अधिक्षिका, अधिक्षक/वरिष्ठ लेखापाल / तांत्रिक सहाय्यक व लिपीक टंकलेखक यांचेबाबत मुख्यलेखाधिकारी व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

ब) अ.नं.१९ वरील श्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (प्रत्यक्ष काम रोखपाल लेखाशाखा) यांचेबाबत," कामाविषयी positive attitude असावा अशी समज देऊन परिवीक्षाधीन कालावधी समाप्त करुन नियमीत करण्यास हरकत नाही."

....तसेच ....

अ.नं.२० वरील श्री वसंत ना.जेजूरकर वरिष्ठ लेखापाल,लेखाशाखा यांचेबाबत "वरिष्ठ पदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर कार्यालयीन जबाबदाऱ्यांविषयी संकुचीत दृष्टीकोण ठेऊन,प्रसंगी असहकार्याची भूमिका घेऊन वरिष्ठांना अडचणीत आणण्याची वृत्ती असू नये अशी लेखी समज देऊन विहीत परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात आणण्यास व सेवेत कायम करण्यास हरकत नाही." असे अभिप्राय मुख्यलेखाधिकारी व संबंधीत प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

क) श्री.प्रशांत गजाबा पारखे,यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/१३७७/२००३ दि.१३/०६/२००३ अन्वये मदतनीस (वर्ग-४) चे कर्मचारी या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी सर्व मिळून दरमहा रु.२०००/- (रु. दोन हजार मात्र) चे नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे.ते दि.१४/०६/२००३ रोजी कामावर हजर झालेले असून सध्या त्यांना दि.१४/०६/२००४ पासून दरमहा रु.२५००/- (रु.दोन हजार पाचशे मात्र) एकत्रित नियत वेतन देण्यात येत आहे. त्यांची परिवीक्षाधीन कालावधीची मूदत दि.१३/ ०६/२००५ रोजी संपुष्ठात येत आहे.त्यांचा तपशील खालील प्रमाणे

| अनं. | कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपणेची तारीख | वेद्यकीय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री प्रशांत गजाबा पारखे, मदतनीस | १२ वी पास | १४/०६/२००३ | १३/०६/२००५ | दि.१८/१०/२००३ चे दाखल्यानुसार पात्र |

श्री प्रशांत गजाबा पारखे,मदतनीस,यांचे काम व वर्तणूक चांगली असून ते प्रामाणिक आहेत.त्यांचे काम समाधानकारक आहे.त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय यांनी दिलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

०१)	उपरोक्त अ मध्ये नमूद केलेल्या अ.नं.०१ ते १८ कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे. अ.नं. १९ व अ.नं. २० सर्वश्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (मुख्य रोखपाल) व वसंत ना.जेजूकर,वरिष्ठ लेखापाल यांचे कामाबाबतचे मुख्यलेखाधिकारी व लेखाविभागाचे प्रशासकीय अधिकारी यांचे प्रतिकूल अभिप्राय विचारात घेऊन त्यांचा परिविक्षाधीन कालावधी सहा महिन्यांनी वाढविण्यात यावा.

०२)	उपरोक्त क मध्ये नमूद केलेले श्री प्रशांत गजाबा पारखे, मदतनीस यांना वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय यांचे अभिप्राय विचारात घेता, दि.१४/०६/२००५ पासून रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० ही वेतनश्रेणी देऊन,संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.

(अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४२.	संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेले कै.राजाराम कर्पे व कै मधुकर दाभाडे यांचे प्रत्येकी एका वारसास अनुकंपा तत्वावर नेमणूक द्यावयाचे अर्जाबाबत विचार करणे.**

**निर्णय क्र.४३०.** श्रीमती सुनिता राजाराम कर्पे (कै.राजाराम माधव कर्पे यांची पत्नी) यांनी, त्यांचे पतीचे संस्थान सेवेत असताना दिनांक ०६/०२/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचे कुटूंबावर मोठें आर्थिक संकट कोसळले असून, उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्ने अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत त्यांना घेणेबाबत विनंती केली आहे.

श्रीमती सुनिता राजाराम कर्पे, यांची जन्मतारीख दि.१४/०१/१९७२ आहे व त्यांचे वय ३३ वर्षे ०४ महिने असून शिक्षण इ.६वी पास असें आहे.

तसेच श्रीमती अनिता मधुकर दाभाडे (कै.मधुकर बाबूराव दाभाडे यांची पत्नी) यांनी, त्यांचे पतीचे संस्थान सेवेत असताना दिनांक २२/०४/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचे कुटूबावर मोठें आर्थिक संकट कोसळले असून, उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्ने अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत त्यांना घेणेबाबत विनंती केली आहे.

श्रीमती अनिता मधुकर दाभाडे, यांची जन्मतारीख दि.०६/०५/१९६८ आहे व त्यांचे वय ३७ वर्षे असून शिक्षण इ.२री पास असें आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ, मंत्रालय, मुंबई-३२, दि.२८/०३/२००१ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याच्या एका पात्र नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेमध्ये घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याचे नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थानच्या नोकरीत घेण्यात येते.

या सर्व परिस्थितीचा विचार करता, श्रीमती सुनिता राजाराम कर्पे (कै.राजाराम माधव कर्पे यांची पत्नी) व श्रीमती अनिता मधुकर दाभाडे (कै.मधुकर बाबूराव दाभाडे यांची पत्नी) यांना, वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून, प्रस्थापित अटींनुसार (पहिल्या वर्षासाठी दरमहा रुपये २,०००/- एकत्रित नियत वेतनावर) संस्थान सेवेत घेण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही- आस्थापना प्रमुख)

**विषय नं.४३.	वाहन चालकांना शासन निर्णयानुसार अतिकालीक भत्ता देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३१.** संस्थानकडे सध्या खालील प्रमाणे वाहने आहेत.

| अ.नं. | वाहनांचा तपशील | संख्यां |
|---|---|---|
| ०१ | स्कूल बसेस | ०५ |
| ०२. | भक्तांसाठीच्या बसेस | ०३ |
| ०३. | ॲम्बॅसॅडर कार | ०४ |
| ०४ | टाटा सुमो | ०२ |
| ०५ | रुग्णवाहिका | ०३ |
| ०६ | मुंबई कार्यालय | ०१ |
| ०७ | मालवाहू वाहन | ०९ |
| ०८ | शववाहिनी | ०१ |
| ०९ | बोलेरो | ०१ |
| | एकूण | २९ |

संस्थानकडे सध्या १८ कायम व २३ कंत्राटी असे एकूण ४१ वाहन चालक आहेत.संस्थान सेवेत असलेल्या ज्या वाहन चालकांची रात्री अपरात्री कामासाठी गरज पडते व ज्यांना सेवांतर्गत कर्तव्य म्हणून अनेकदा बाहेरगांवी जावे लागते अशा वाहन चालकांना मा.व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने विशेष वेतन देण्यात येत आहे.सदरचे विशेष वेतनात मा.व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

दि.१३/०५/२००० रोजीच्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.१५५ नुसार, ॲम्बॅसॅडर कार,टाटासुमो,मुंबई कार्यालयातील कार,रुग्णवाहीका,मालवाहू वाहन, शववाहिनी बोलेरो या वाहनांवर काम करणाऱ्या एकूण १८ कायम वाहनचालकांना प्रत्येकी दरमहा रु.८००/- विशेष वेतन देण्यात येत आहे.

साईबाबा संस्थानसाठी शासनाने दि.२३ ऑगष्ट २००४ रोजी सन.२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ संमत केलेला असून संस्थानचा कारभार विधी व न्याय खात्याच्या अखत्यारीत चालू आहे.त्यामुळे संस्थानकडील वाहन चालकांना लमसम पध्दतीने अतिकालीक भत्ता देणेएवजी शासन नियमाप्रमाणे देण्यात यावा अस प्रस्ताव संस्थानचे वाहन विभाग प्रमुख व त्या विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांनी सादर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन,वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक दि.१६/०८/२००४ नुसार वाहन चालकांना अतिकालीक भत्ता देण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

०१) वाहनचालक दौऱ्यावर असतांना कामाच्या नियमीत वेळेपेक्षा जास्त केलेल्या कामाबद्दल अतिकालीन भत्ता मंजूर करतांना फक्त ज्या कालखंडात वाहन चालकाने प्रत्यक्ष गाडी चालविण्याचे काम केले असेल.(Steering Duty) तेवढाच कर्तव्यकाल प्रत्येक तासास रु.२०/-प्रमाणे भत्ता देण्यास पात्र धरण्यात येईल.(त्यावेळी डी.ए.साठीच्या रक्कमेची गणना करु नये.मुक्कामाच्या वेळी Steering Duty व्यतिरीक्त कालावधीसाठी फक्त D.A.च्या रक्कमेची गणना करावी.)

०२) कामाच्या दिवशी (भोजन समय धरुन) ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास आणि रविवार सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास तासाला रु.२०/- असा अतिकालीक भत्त्याचा दर राहील.(अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल.)

०३) वाहन चालकाला एका महिन्यांत मिळणारी अतिकालीक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगाराच्या (Salary) ५० % पेक्षा जास्त असू नये.

०४) वाहन चालकांना सुधारीत दराप्रमाणे अतिकालीक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना राहतील.

०५) अतिकालीक वेतनाचा खर्च संबंधीत विभागाच्या / कार्यालयाच्या त्या त्या लेखा शिर्षकाखाली मंजूर अनुदानातून लागू करण्यात यावा.

तरी संस्थान सेवेतील कायम वाहन चालकांना सध्या देण्यात येत असलेल्या दरमहा रु.८००/- अतिकालीक भत्याएवजी शासन निर्णयातील उपरोक्त तरतूदीप्रमाणे अतिकालीक भत्ता देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

सदर आदेशाची कार्यवाही दिनांक १/९/२००५ पासून करण्यात यावी.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.४४. श्री.रामराव शेळके व इतर यांना पदनाम व वेतनश्रेणी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४३२.** श्री रामराव रंभाजी शेळके व इतर यांनी त्यांचे दिनांक ११.०७.२००५ चे पत्रान्वये मा.गत व्यवस्थापन मंडळाने ऑगस्ट, २००४ मध्ये ४०००-६००० या वेतनश्रेणीतील काही वरिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांना ५५००-९००० या वेतनश्रेणीत अधिक्षक, पदावर नेमणूक दिलेली आहे. तसेच श्री गमे, कामगार अधिकारी व श्री गर्कल, विधी अधिकारी यांनाही याच वेतनश्रेणीत पदोन्नती दिलेली आहे. तथापि सदरचे पदोन्नतीसाठी त्यांचा विचार झालेला नाही. तरी अधिक्षक या पदाची रुपये ५५००-९००० ही वेतनश्रेणी मंजूर व्हावी अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेचा आकृतीबंध लवकरच तयार करण्यात येत आहे. या आकृतीबंधानुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४५. श्री जगन्नाथ डांगे, डायलेसीस तंत्रज्ञ यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.४३३.** श्री साईनाथ रुग्णालयाकरीता डायलेसिस मशिन खरेदी करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्यामुळे येणारी मशिनरी तपासून तीचे इन्स्टॉलेशन करणे याकामी अनुभवी डायलेसिस तंत्रज्ञ उपस्थित असणे आवश्यक असल्याने रुग्णालयाची तातडीची गरज व कामाची निकड लक्षात घेऊन श्री जगन्नाथ देवराम डांगे,यांची मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३१/०७/२००४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रथम सहा महिन्यांसाठी दरमहा रु.५०००/- एकत्रीत मानधनावर डायलेसिस तंत्रज्ञ या पदावर तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती.त्यानुसार सदरची मुदत संपल्यानंतर वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय यांचे अभिप्राय व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री डांगे यांची डायलेसिस तंत्रज्ञ या पदाची मुदत

दि.१६/०२/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेली असून ती दि.१५/०८/२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री जगन्नाथ देवराम डांगे, हे सध्या कार्यरत असलेल्या प्रयोगशाळेमध्ये तंत्रज्ञ म्हणून काम करीत आहेत.साईनाथ रुग्णालयाचे जुन्या इमारतीचे नुतनीकरण होऊन तेथे लवकरच सुपर स्पेशालिटी सेवाअंतर्गत रुग्णांना सिटी स्कॅन, कलर डॉपलर,डायलेसिस युनीट यांसारख्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत.सदर डायलेसिस युनिट करता एका डायलेसिस तंत्रज्ञाची आवश्यकता आहे.श्री डांगे यांची मुदत दि.१५/०८/२००५ अखेर संपुष्टात येत आहे.त्यामुळे सदर युनिट सुरु झाल्यानंतर डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून श्री डांगे यांची मुदत दि.१६/०८/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविणेबाबत वैद्यकीय अधिक्षिका रुग्णालय यांनी अभिप्राय दिलेले आहेत.

वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन श्री डांगे डायलेसिस तंत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.१६/०८/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी किंवा वर्तमानपत्रात जाहीरात देऊन या पदावर नवीन नेमणूक होईपर्यंत या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत प्रतिमहा रु.५०००/- एकत्रीत मानधनावर वाढविणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.४६. डॉ राजन पटणी, युरोलॉजीस्ट यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.४३४.** व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २७-२९.०७.१९९९ चे सभेतील निर्णय क्र. ३२४ अन्वये डॉ.राजन पटणी यांची दिनांक ०१.०१.२००० पासून दिनांक ३१.०३.२००० अखेर तीन महिन्यांसाठी मानद युरोलॅजिस्ट म्हणून तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरची मुदत संपलेनंतर त्यांच्या मानद सेवेची मुदत वेळोवेळी खालीलप्रमाणे वाढविण्यात आलेली आहे.

| अ.नं. | दिनांक | कालावधी | प्रति व्हिजीट मानधन/एकूण वित्तलब्धी रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०१.०४.२००० ते दि.३०.०९.२००० | ०६ महिने | २,०००.०० |
| ०२. | दि.०१.१०.२००० ते दि.३०.०९.२००१ | ०१ वर्ष | २,०००.०० |
| ०३. | दि.०१.१०.२००१ ते दि.३०.०९.२००२ | ०१ वर्ष | २,०००.०० |
| ०४. | दि.०१.१०.२००२ ते दि.३०.०९.२००३ | ०१ वर्ष | ३,०००.०० |
| ०५ | दि.०१/१०/२००३ ते दिनांक ३०.०९.२००४ | ०१ वर्षे | ३,०००.०० |

व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३१/०७ व ०१.०८.२००४ चे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार डॉ.पटणी यांची मानदसेवेची मुदत दिनांक ०१.१०.२००४ पासून पुढे एक वर्षासाठी वाढविण्यात आलेली आहे. सदरची वाढीव मुदत दिनांक ३०.०९.२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

डॉ.राजन पटणी यांनी दिनांक १८.०६.२००५ रोजी पत्र सादर करुन त्यात त्यांच्या मानद सेवेची मुदत दोन वर्षासाठी वाढविण्याबाबतची विनंती केलेली आहे. सदरचे पत्रावर डॉ.राजन पटणी हे युरोलॉजीस्ट असून सुपर स्पेशालिस्ट आहेत. त्यांची तज्ञ सेवा आपल्या रुग्णालयासाठी आवश्यक आहे. मागील वर्षभराच्या काळात बऱ्याच रुग्णांनी त्यांचे सेवेचा लाभ घेतला आहे. मागील वर्षामध्ये त्यांनी एकूण ६१ महत्वाच्या शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. डॉ.राजन पटणी यांना आणखी पाच वर्षाकरीता मुदतवाढ मिळावी अशी शिफारस वैद्यकीय अधिक्षिका व वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,डॉ.राजन पटणी यांचे मानद सेवेची मुदत दि.३०.०९.२००५ पासून पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी पूर्वीचेच शर्ती,अटी व मानधनावर वाढविण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-आस्थापना विभाग प्रमुख)

**विषय नं.४७. सन २००४-०५ चे वार्षिक प्रशासनीक अहवाल (Annual Administrative Report) ची नोंद घेऊन राज्य शासनाकडे सादर करणे बाबत.**

**निर्णय क्र.४३५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४८. Request for allotment of land for constructing a Spiritual Arty Gallery-cum-Meditation Centre संदर्भात वर्ल्ड रिन्युअल स्पिरिचुअल ट्रस्ट १२१ महात्मा गांधी रोड, बँक ऑफ बरोडा, एफ.यु.ब्रँच मुंबई-२३ यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.४३६.** वर्ल्ड रिन्युअल स्पिरीचुअल ट्रस्ट धर्मादाय ट्रस्ट असून त्याचा कारभार बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार चालविला जातो. त्याचप्रमाणे त्या ट्रस्ट मार्फत १९६८ पासून शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. सदर ट्रस्टचे भारतभर विविध ठिकाणी ६०० एज्यूकेशनल सेंटर चालविले जातात. सदर ट्रस्ट मार्फत चालविले जाणारे एज्युकेशन उपक्रम हे कोणत्याही प्रकारची फी न आकारता राबविले जातात. सदर

संस्थेव्दारे चालविल्या जाणा-या शैक्षणिक उपक्रमासाठी ट्रेन्ड टिचरव्दारे प्रशिक्षण दिले जाते. मुख्य हेडक्वार्टर माऊंट अबू ( राजस्थान ) येथे आहे.

सदर उपक्रमासाठी विविध राज्याचे सरकारने व कार्पोरेशन तसेच इतर संस्था यांनी जमीन उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच सोई सवलती सदर शैक्षणिक उपक्रमासाठी दिलेल्या आहेत. तिरुपती देवस्थान, तिरुपती यांनी जमीन तिरुमाला या ठिकाणी उपलब्ध करून दिलेली असून त्याप्रमाणे संस्थानने जमीन योग्य ठिकाणी विनामोबदला किंवा लिज बेसिस किंवा किमान दर घेऊन दयावी अशी त्यांनी दिनांक १७ जून,२००५ चे पत्राने केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४९. शैक्षणिक संकुलाशेजारील श्री कोते यांची जमीन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.४३७.** श्री.प्रभाकर गोविंदराव कोते व इतर व श्री.अशोक विठ्ठल गोंदकर व इतर स.नं १०७ पै मालक अशा नावाने दि. २६/०७/०५ रोजीचा अर्ज श्री.प्रभाकर गोविंद कोते, रा.शिरडी यांचेकडून इकडेस प्राप्त झाला आहे श्री साईबाबा संस्थानचा विकासाच्या दृष्टीने व योग्य मोबदला मिळाल्यास ते संस्थानला त्यांची जमीन दयावयास तयार आहेत. सदरची जागा संस्थानच्या आय.टी.आय. जवळ असून नगर मनमाड रोडच्या श्री. बच्छानी यांच्या स.नं १०८ जवळ आहे, हा स नं. २५/१०/०१ साली रहिवासी विभागात समाविष्ट झाला असून सदरची जमीन संस्थानच्या लगत आहे. भविष्यात संस्थानला चांगल्या प्रकारे उपयोग होवू शकतो हा परिसर अद्यावत व पूर्ण विकसीत झाला आहे.त्याच्या शेजारून २४ मी.चा बायपास रोड आहे. असे अर्जात नमूद केले आहे.

मागील व्यवस्थापन मंडळाने बच्छानीची जमीन स. नं १०८ भू संपादन करताना ४० आर जमिनीची किंमत १ कोटी केली होती. परंतु संस्थान काही कारणांमुळे घेवू शकले नाही. असे अर्जात त्यांनी पुढे म्हटले असून जमिनीला योग्य मोबदला मिळाल्यास जमीन दयावयास तयार आहोत. जमिनीची अपेक्षित किंमत २ लाख रुपये प्रती गुंठा असावी अशी त्यांनी आशा व्यक्त केली आहे.

सध्या जमिनीचा ले आऊट मंजूर असून बिगर शेती ( N.A प्रक्रीया ) चालू आहे. जमिनीत एक बोअर असून जमिनीचा व्यवहार झाल्यास बोअर पाण्याचा हक्क मूळ मालकांकडे दयावा व संस्थानचे इनकम टॅक्स सर्टिफिकेट दयावे १०७ स.नं जमिनीस साईबाबा संस्थानने १५ फुटाचा ले आऊट प्रमाणे रस्ता मंजूर केला आहे. सदर जमिनीचे रजिस्टर दप्तरी शेतीचे बाजार मूल्य दिलेले आहे असेही प्रस्तुत अर्जात सांगितले आहे.

खालील नमूद केलेल्या खातेदारांच्या त्यांच्या नावांपुढे दाखविलेल्या जमिनी सर्वे नं.१०७ मध्ये समाविष्ट असल्याचे दिसुन येते.

| अ.नं | नांव | स.नं | क्षेत्र<br>हेक्टर आर |
|---|---|---|---|
| ०१ | सौ.सुमित्रा कैलास कोते | १०७/४<br>१०७/१० | ०.२७<br>०.५९ |
| ०२ | श्री.कैलास गोविंदराव कोते | १०७/११ | ०.७२ |
| ०३ | श्री.प्रभाकर गोंविंदराव कोते | १०७/१४ | ०.६१ |
| ०४ | श्री.अशोक विठ्ठल गोंदकर | १०७/१९ | ०.३१ |
| | | एकूण | २.५० |

अर्जदारांची जमीन बच्छानी यांचे जमिनी शेजारी आहे. बच्छानी यांचे जमिनीचा उल्लेख अर्जदाराने त्यांच्या अर्जात केला आहे. साई असोसिएशनचे विश्वस्त श्री.बच्छानी यांची जमीन ३ हेक्टर ७८ आर सर्व्हे नं १०८ भू-संपादन होवून मिळावी म्हणून संस्थान मार्फत भू-संपादन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यात जागेच्या किंमतीचा विचार करता मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. १२/०७/२००३ रोजीच्या ठराव नं २८८ प्रमाणे ... सदर जागा भू-संपादनातून वगळण्याबाबत/रद्य करणेबाबत निर्णय झाला आहे. जमिनीची किंमत ८ कोटी ५९ लाख २० हजार दोनशे चोवीस होत होती. याबाबत विचार करता प्रस्ताव रद्य करणेबाबत ठराव झाला आहे.

श्री.प्रभाकर गोविंदराव कोते यांनी संस्थानचे जागेतून त्यांचे जमिनीसाठी रस्त्याची मागणी केली होती त्याबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक १३!१२!२००३ रोजीचा ठराव क्रमांक ५८९ झाला आहे. व त्याप्रमाणे श्री. प्रभाकर गोविंदराव कोते यांना पत्र दिले आहे.

अर्जदार यांनी त्यांची स.नं. १०७ ची मिळकत विकत देण्यास तयारी दर्शविली आहे. यापूर्वी नजिकच्या काळात विकत घेतलेल्या जमिनी त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | खातेदाराचे नांव | स.नं | लिहून घेतलेले क्षेत्र हे.आर चौ | खरेदीचा दिनाक | दिलेली किंमत रुपये | प्रत्येक हेक्टरी येणारी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री चांगदेव दादा कोते | १०७/१अ/१ | ०.२९ | १४/०८/९७ | ५,४३,७५०/ | १८,७५,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | | | | |
| २ | श्री शिवाजी चांगदेव कोते | ११०७/१अ२/अ | ०.१४ | ३१/१२/९७ | २,६२,५००/ | १८,७५,०००/- |
| ३ | श्री.कैलास गोंविंदराव कोते | १०७/१ब२<br>१०७/१ब१ | ०.४०<br>०.१६<br>०.५६ | ३१/१२/९७<br>३१/१२/९७ | १०,५०,०००/ | १८,७५,०००/- |
| ४ | श्री.प्रभाकर गोंविंदराव कोते | १०७/१०/१<br>१०७/१ /२ | ०.६५<br>०.०५<br>०.७० | ३१/१२/९७ | १३,१२,५००/ | १८,७५,०००/- |
| ५ | सौ.सुमित्रा कैलास कोते | १०७/२/१<br>१०७/२ /१अ | ०.८१<br>०.४०<br>१.२१ | ३१/१२/९७ | २२,६८,७५०/ | १८,७५,०००/- |
| ६ | सौ.सुलोचना प्रभाकर कोते | १०७/२ -१<br>१०७/२/२ब | ०.४१<br>०.३९<br>०.८० | ३१/१२/९७ | १५,००,०००/ | १८,७५,०००/- |
| ७ | सौ.अशोक विठठल गोंदकर | १०७/२/२९/३ | ०.१३ | ३१/१२/९७ | ०२,२७,५००/ | १७,५०,०००/- |
| ८ | श्री.विठ्ठल तुकाराम गोदंकर | १०७/२/२अ | ०.१८ | ३१/१२/९७ | ०३,१५,०००/ | १७,५०,०००/- |
| ९ | श्री दत्तात्रय विठ्ठल गोंदकर | १०७/२/२ / २ | ०.१२ | ३१/१२/९७ | ०२,१०,०००/ | १७,५०,०००/- |
| १० | श्री.झुबंरलाल चुनिलाल लोढा | १२५/१अ | १.०९ | ०५/१२/९७ | २२,३४,५००/ | २०,५०,०००/- |
| ११ | श्रीमती शांताबाई ह.शेळके | १४८/२/१ | १.६९ | २९/०९/९८ | ५०,७०,०००/ | ३०,००,०००/- |
| १२ | सौ.पुष्पलता गोंविंदराव आदिक | १४८/२/२ | १.६७ | २९/०९/९८ | ५०,१०,०००/ | ३०,००,०००/- |
| १३ | सौ.मीना सुधीर कदम | १४८/२/३ | १.६७ | २९/०९/९८ | ५०,१०,०००/ | ३०,००,०००/- |
| १४ | श्री गंगाधर वामन कोते | ९९/३ | ०-०३-५० | ३/५/९९ | ८०,५००/- | २३,००,०००/- |
| १५ | श्री पुंजा बळवंत गोंदकर | ९९/२पै | ०-०४-०० | ३/५/९९ | ९२,०००/- | २३,००,०००/- |
| १६ | श्री गोपीनाथ मोसू शेज्वळ | ९९/१ब<br>९९/१अ | ०-०९-५०<br>०-०१-०० | ३/५/९९ | १,४१,५००/- | २३,००,०००/- |
| १७ | एकूण १३ खातेदार | सर्व्हे नं ६ पैकी | ४५.१४ आर | २००४ मध्ये | २४,८२,७००/- | ५५,००,०००/- |

त्याचप्रमाणे आरक्षण क्रं ३४ मधील श्री. लोढा यांची जमीन प्रति आर १,५०,०००/- विकत घेणेचा ठराव दिनांक ०८/०५/०५ निर्णय क्रमांक २४२ झालेला आहे. अर्जदाराची जमीन स.नं १०७ पै. दिसून येते त्यांनी जमिनीच्या पोट हिश्याचा उल्लेख केला नसला तरी स.नं.१०७ ही संस्थानच्या जवळच शैक्षणिक संकुलाजवळ आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक व इतर विकासाचे दृष्टीने उपयोगची आहे. याबाबत प्रामुख्याने खालील माहिती संकलित करणेत आली आहे.

१) सर्व अर्जदार जमीन मालकाचे नांव
२) ७/१२ उतारा व तत्सम उतारा
३) मिळकतीचा नकाशा
४) इतर हक्कात नोंदविलेले फेरफार उतारे
५) प्रत्येक खातेदाराचे किती क्षेत्र याचा उल्लेख
६) अर्जात त्यांनी नमूद केलेले बोअर व रस्त्याबाबतची स्पष्ट माहिती

सदर प्रकरणी सर्व अर्जदारांबरोबर समक्ष चर्चा करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री कोते यांचे जमिनीचे टाऊन प्लॅनिंग नुसार मूल्यांकन करुन जमीन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव पुनश्च व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात यावा. तसेच संस्थानचे प्रॉपर्टीलगत शिर्डी परिसरात भविष्यकाळात विकास योजना राबविण्यासाठी ५० एकर जमीन खरेदी करण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५०. शिर्डी नगरपंचायत शिर्डी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कराबाबत.**

**निर्णय क्र.४३८.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७/११/२००४ रोजीचे सभेत पथकर नाका बंद करणेबाबत निर्णय क्र. १२६ चे निर्णयास अनुसरून नगर पंचायत, शिरडी यांनी त्यांचे मार्फत साई भक्तांकडून कोणताही कर वसुल करु नये. पथकर नाका बंद करावा अशी विनंती संस्थानने जा क्रं. १२३१०/ दिनांक ३१/१२/२००४, जा क्रं. ४०५४/ दिनांक २२/०४/२००५ ने नगर पंचायत शिर्डी यांना केली होती. त्याचप्रमाणे शिरडी येथे भक्तांकडून पथकर आकारणे बाबत रेग्युलर मुकादमा ३७/९३ ( खाजगी व्यक्तीचा दावा आहे ) प्रमाणे मनाई असल्याचेही नगरपंचायत शिरडी यांना कळविणेत आलेले आहे. व संस्थानकडूनच अशा प्रकारे कर आकारला जातो असा भक्तांमध्ये गैरसमज होतो. भक्तांना इतर ठिकाणीही वेगळा आकार द्यावा लागतो त्यामुळे त्यांच्या भावना दुखावतात तेंव्हा भक्तांकडून कोणत्याही स्वरुपात कर आकारू नये असे नगरपंचायत शिरडी यांना कळविणेत आलेले आहे.

शिरडी नगरपंचायत,शिरडी यांनी उपरोक्त विषयांचे संदर्भात दिनांक १८/०३/२००५ चे , दिनांक ११/०५/२००५ व दिनांक ११/०७/२००५ चे पत्र इकडेस पाठविले असून त्यात त्यांनी " मा.अध्यक्ष , श्री साईबाबा विश्वस्त मंडळ यांनी नगरपंचायतीचा टोल नाका बंद करण्याबाबत नगरपंचायतीस सूचना केली आहे, सदरची सूचना करतांना टोल नाक्यापासून नगरपंचायतीस मिळणारे उत्पन्न अनुदान स्वरुपात संस्थानकडून नगरपंचायतीस देणेत येईल. असे संस्थानकडून सूचित केले होते. नगरपंचायतला सदर टोल नाक्यापासून वार्षिक ४५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तेवढी रक्कम प्रतिवर्षी अनुदान स्वरुपात मिळाल्यास टोल नाका बंद करण्यासाठी नगरपंचायत सभागृहात निर्णयासाठी सादर करण्यात येईल.त्यातून नागरिकांना सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देता येतील, असे इकडेस कळविले आहे. तीन वर्षांची आगावू रक्कम मिळणेबाबतही त्यांची विनंती आहे.

नगरपंचायतीने टोल नाक्यापासून मिळणा-या उत्पन्नाचा तक्ता दिनांक ११/०५/२००५ चे पत्रासोबत पाठविला आहे तो खालील प्रमाणे आहे.

शिरडी नगरपंचायत, शिरडी सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात मिळालेले उत्पन्न

| अ.क्रं. | महिना | मिळालेले उत्पन्न |
|---|---|---|
| ०१ | एप्रिल-२००४ | ३,२५,१५०/- |
| ०२ | मे-२००४ | ३,८७,३३०/- |
| ०३ | जुन-२००४ | ३,१२,६७०/- |
| ०४ | जुलै-२००४ | ३,००,४८०/- |
| ०५ | ऑगस्ट -२००४ | ३,९४,२९०/- |
| ०६ | सप्टेंबर-२००४ | ३,७७,७१०/- |
| ०७ | ऑक्टोंबर-२००४ | ३,९५,०६०/- |
| ०८ | नोव्हेंबर-२००४ | ५,२०,०८०/- |
| ०९ | डिसेंबर-२००४ | ५,०७,०१०/- |
| १० | जानेवारी-२००५ | ४,२६,४५०/- |
| ११ | फेब्रुवारी-२००५ | ३,३१,६००/- |
| १२ | मार्च -२००५ | २,८४,१७०/- |
| | **एकुण** | **४५,६१,९९०/-** |

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात नगरपंचायतीस रक्कम रुपये ४५,६१,९९० मिळालेली आहे. तेवढी रक्कम नगरपंचायतीस प्रति वर्षी मिळावी. तसेच प्रती वर्षी सदर रकमेत २०% वाढ करणेत यावी. नगरपंचायत हद्यीतील सोयी सुविधांची कामे हाती घ्यावयाची असल्याने १ वर्षाची रक्कम आगाऊ मिळावी. अशी नगर पंचायतीने संस्थानला विनंती केली आहे. याबाबत नगरपंचायतीस ठराव मंजूर करावा लागेल. तसेच शासनाची मंजूरी घ्यावी लागेल असेही पत्रात म्हटले आहे.

दिनांक ११/०७/२००५ चे पत्रात त्यांनी "श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी यांनी नगर पंचायतीला विशेष स्वच्छता आकार व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करावा व त्यापोटी नगरपंचायतीस सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९०/- टोल नाक्यापासून मिळाले तेवढी रक्कम प्रतिवर्षी मिळावी. प्रतिवर्षी २० % वाढ करणेत यावी. ५ वर्षाची रक्कम आगाऊ भरावी अशी विनंती केली आहे संस्थान कडून निश्चित धोरण त्यांना कळविलेस मंजूरीसाठी शासनास प्रस्ताव सादर करता येईल असेही त्यांनी पत्रात कळविले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (c) चा विचार करता नगरपंचायत शिर्डीस वित्त सहाय्य करता येईल. सदर तरतूद खालील प्रमाणे आहे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्था उद्येशांसाठी आणि मंदिराच्या नजिकच्या भविष्यातील गरजा,आवश्यकता व सुधारणा यांसाठी तत्सम तरतूद केल्यानंतर जर विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये, जादा शिल्लक राहिली तर त्या

जादा शिलकीच्या काही भागाचा समितीस,वेळोवेळी,पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी विनीयोग करता येईल.

( २) पोट-कलम (ग) राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी अथवा संस्था ,सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय,दवाखाना ,निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय अथवा धार्मिक संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली, कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्यांची देखभाल करणे किंवा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्था अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगर पंचायतीला वित्तसहाय्य देणे.

नगर पंचायत शिरडी यांनी वरील प्रमाणे उत्पन्नाची रक्कम कळविलेली असली तरी सदर उत्पन्नातून खर्चाची रक्कम उदा. कर्मचारी पगार,छपाई इत्यादी वजा केलेली दिसून येत नाही. असा खर्च रुपये ६,००,०००/- ( सहा लाख रुपये ) मात्र असलेचे नगरपालिकेचे दिनांक १६/०५/२००५ रोजीचे पत्रावरुन दिसून येते.

टोलनाका- पथकर बंद करणेसाठी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगर पंचायत,शिरडी अनुदान देणेबाबत विचार करणे झालेस संस्थानलाही शासनाची मान्यता घ्यावी लागेल. टोलनाका **उत्पन्न-वजा** खर्च असे ४५,६१,९९०/- **-** ६,००,०००/- **= रुपये ३९,६१,९९०/-** निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुषंगाने अनुदान ठरवावे लागेल.

श्री साईबाबा संस्थान शिरडी यांचे मालकीचे इमारतीवर नगरपंचायत यांचे मार्फत मालमत्ता कर व त्या अनुषंगाने इतर कर उदा. शिक्षण कर, स्वच्छता कर, रोजगार हमी कर यांची साधारणतः रुपये २६,००,०००/- मात्रची आकारणी होते. सदर करातून सवलत मिळावी.याबाबतही संस्थानने यापूर्वी नगरपंचायतीस विनंती केली असून, त्याबाबत मा. कोर्टात टॅक्स अपिले दाखल असून अपील दाखल करणेकामी टॅक्सचा भरणा करावा लागतो. सदर टॅक्समधून संस्थानला वगळणेस नगर पालिकेस विनंती करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपालिका यांना द्यावयाचे रकमेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे समितीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें.

(कार्यवाही - विधी अधिकारी)

**विषय नं.५१. रिट पिटीशन ४०९५/२००५ श्री जयंतीलाल देवीचंद शहा यांत मा. हायकोर्ट, औरंगाबाद खंडपीठ यामध्ये शपथपत्राबाबत.**

**निर्णय क्र.४३९.** मौजे शिरडी शहरासाठी नगरपंचायत शिरडी व नगररचना खाते यांचे मार्फत तयार करण्यात आलेल्या शिरडी विकास आराखडयामध्ये आरक्षण क्रं.८ सर्व्हे नं.६ ही मिळकत प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी आरक्षीत दर्शविलेली आहे. या बाबत विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान शिरडी आहे. शाळेसाठी आरक्षीत असलेले एकूण ५७.६५ आर क्षेत्र असून त्यापैकी ४५.१४ आर इतकी जमीन संस्थानने खरेदीने विकत घेतलेली आहे. व उर्वरीत जमीन १२.५१ आर संस्थान कडून संपादित करणे आहे. यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविला असून मा उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे कडून भूसंपादनाची कार्यवाही चालू असून ती प्रगतीपथावर आहे. तसेच आणखी १ आर जमीन श्री मल्होत्रा यांचेशी खरदीखताने घेण्याबाबत पत्रव्यवहार चालू आहे.

मा.उपविभागीय अधिकारी यांचे कडे चालू असलेल्या भूसंपादनाचे प्रकरणातील श्री जयंतीलाल देवचंद शहा व इतर यांनी आता मा उच्च न्यायालय, मुंबंई खंडपीठ, औरंगाबाद येथे विषयांकित याचिका दाखल केली असून त्यामध्ये खालील आशयाचे मुद्दे कथित केले आहेत.

०१) महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थान शिरडी, यांना आरक्षण क्र.८ बाबत महाराष्ट्र प्रादेशीक व नगरविकास अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास यंत्रणा (डेव्हलपमेंट ॲथॉरिटी) म्हणून केलेली नियुक्ती कायदेशीर नाही.

०२) मा नामदार हायकोर्ट, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी आरक्षणात असलेली स.नं.६/१ब/१ब/१ (सिटी स.नं.९०१ पैकी)जागा आरक्षणातून वगळणेबाबत आदेश दयावा किंवा योग्य ते आदेश देण्यात यावेत.

०३) प्रतिवादी श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी अर्जदाराची जमीन स.नं.६/१ब/१ब/१ क्षेत्र ७०१ चौ मी भूसंपादित करावी म्हणून दिनांक १८/१२/२००३ रोजी नोटीस दिली होती. परंतू संस्थानने मुदतीत भूसंपादन केलेले नाही असे नमूद केलेले आहे.(प्रत्यक्षात नोटीस श्रीमती जयवंतीबेन जे शहा व श्री राजेंद्र ले गाला यांनी दिलेली होती. या दोघांचेही नाव त्यावेळेस स.नं.६/१ब/१ब/१ च्या ७/१२ वर नव्हते. त्या प्रमाणे शपथपत्रात संस्थानने स्पष्ट खुलासा दिला आहे.)

०४) सदरचे केसची सुनावणी चालू असतांना किंवा केस निकाल लागेपर्यंत स.नं.६/१ब/१ब/१ विकास करणेसाठी अर्जदार यांना परवानगी दयावी.

या बाबत संस्थानचे वकील श्री आर.एन.धोर्डे यांनी शपथपत्र तयार करुन दिलेले आहे. सदरचे शपथपत्र श्री पी टी जोशी, प्रशासकिय अधिकारी यांचे सहीने सादर केले आहे. त्याचा आशय खालील प्रमाणे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. सदरचे शपथपत्र अर्जदारास स्टे किंवा तूर्तातूर्त हूकूम प्राप्त होऊ नये म्हणून यासाठी (मर्यादित) दाखल केले आहे. अधिक याबाबत सविस्तर शपथपत्र देण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

०२. अर्जदार क्रं.२ व ३ यांचे नाव रेकॅार्डला मालक म्हणून नाही. फक्त अर्जदार क्र.१ यांचे नाव तंटयाच्या जमीनीच्या ७/१२ ला आहे त्यामूळे सदर याचिका कायदेशीर नाही. आरक्षण क्र.८ क्षेत्र ५८ आर ही जमीन प्राथमिक शाळा व क्रिंडागणासाठी राखीव आहे. संस्थानने विनंती केल्या प्रमाणे दिनांक ६/८/२००३ च्या नोटीफिकेशन प्रमाणे सदरची जागा संस्थानसाठी राखीव झाली. अर्जदार यांनी संस्थानला जमीन भू-संपादनाने घ्यावी म्हणून दि.१८/१२/२००३ रोजी दिलेली नोटीस संस्थानला ६/१/२००४ रोजी मिळाली. संस्थानने दि.२५/०२/२००४ रोजी मा जिल्हाधिकारी अ.नगर यांचे कडे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविला. तो परत येऊन अखेर दि. २०/१२/२००४ रोजी फेर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांचे कडे सादर करण्यात आला. त्याप्रमाणे मुदतीत भूसंपादनासाठी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही संस्थानने केलेली आहे.

०३. याबाबत भूसंपादन कायदा कलम ६ ची नोटीस दि.२४/०३/२००५ रोजी काढण्यात आलेली असून दि १४/४/२००५ रोजीच्या गॅझेटमध्ये प्रसिध्द झालेली आहे. भूसंपादन कायदा कलम ९ (३) (४) च्या नोटीसा संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. अर्जदार यांनी दिनांक १८/१२/२००३ रोजी दिलेली नोटीस योग्य नाही. कारण देवचंद शहा यांचे नाव तंटयाच्या जमिनीच्या ७/१२ ला होते. ते दिनांक दि १/४/२००२ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार यांनी त्यांचे नाव दि २८/१/२००४ पर्यंत महसूल दप्तरी नोंदविलेले नव्हते. एवढेच नव्हे तर २८/१/२००४ पर्यंत अर्जदार क्रं.२ व ३ यांचे नाव महसूल दप्तरात नव्हते.

०४. आरक्षण क्रं.८ मध्ये चालू असलेले शाळेचे बांधकाम प्लिंथ लेव्हल पर्यंत आलेले आहे. अर्जदार यांनी हरकत घेण्यास ऊशीर केलेला आहे. जमीन भू संपादन करण्याची कार्यवाही मुदतीत करण्यात आलेली आहे. त्यामूळे अर्जदार क्रं.२ व ३ यांनी दिलेली नोटीस योग्य नाही. त्यांना कोणताही रिलीफ मागता येणार नाही.

०५. अर्जदार यांनी रिटपिटीशन मधील परीच्छेद क्र.१० मध्ये नमूद केलेली बाब खरी नाही. संस्थान ही आरक्षण क्रं.८ची विकसन यंत्रणा असल्यामुळे व संस्थानसाठी सदरची जागा आरक्षीत केली असल्यामुळे अर्जदार यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे योग्य नाहीत. त्यामुळे सदरची याचिका रद्द करण्यात यावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी आवश्यक आरक्षण किती आहे, तसेच किती जागेवर बगीचा आहे याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन विधी विभाग व बांधकाम विभाग यांनी व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असें ठरले.

(कार्यवाही- विधी अधिकारी/ बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.५२.** **एक सामायिक मुद्रेबाबत.**

**निर्णय क्र.४४०.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४, (२००४ चा महा.१४) चे कलम ५ (०१) (०२) अन्वये, संस्थानच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली आहे. अधिनियमातील कलम ५ (४) नुसार, "या अधिनियमांच्या इतर तरतूदीस अधीन राहून, ही समिती उपरोक्त नांवाने ओळखला जाणारा एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि **एक सामाईक मुद्रा** असेल आणि तिला स्थावर आणि जंगम अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल, आणि तिच्या उक्त नांवाने तिला किंवा तिच्यावर दावा करता येईल." अशी तरतूद आहे.

उपरोक्त तरतूदीनुसार संस्थानला एक सामाईक मुद्रा तयार करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दि.०८.०२.२००५ चे सभेतील निर्णय क्र. ८६ अन्वये संस्थानकरिता सामाईक मुद्रा तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन, दरपत्रके मागविणेत यावीत असा निर्णय झाला होता.

तथापि, बेटर कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई या संस्थेने सेवावृत्तीने कागदपत्रांची मांडणी, आरेखन आदि बाबींमध्ये देऊ केलेल्या विनामुल्य सेवांमध्ये त्यांचे प्रतिनिधी श्री. देविदास का. मेतकर, रिप्रोग्राफीक्स् एक्झिक्युटीव्ह यांना आपलेकडील आय. टी. विभागाकडे पाठविले आहे. त्यांनी संस्थानचे देणगी पावत्या वगैरेंवर डिझाईन करुन दिलेल्या आहेत, त्याप्रमाणेच काही उत्कृष्ट मुद्रेचे नमूनेही तयार

करुन दिले आहेत तसेच दिल्ली येथील साईभक्त श्रीमती तोशी चानना यांनीही श्रींच्या पादुका, सटका असलेल्या मुद्रेचा नमूना तयार करुन पाठविलेला आहे. ते सर्व नमूने अवलोकनार्थ आजचे सभेत सादर करणेत आले होते.

या सर्व नमुन्यांची सदस्यांनी पहाणी करुन मे.बेटर कम्युनिकेशन्स प्रा.लि. मुंबई यांनी तयार केलेल्या नमुन्यातील मुद्रा नं.०१ स्वीकारणेत यावी, असें ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**विषय नं.५३. शिधा स्वरुपात देण्यात येणाऱ्या मदतीबाबत.**

**निर्णय क्र.४४१.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य तसेच श्रीमंत देवस्थान म्हणून ओळखले जाते.

श्री क्षेत्र शिर्डी हे अहमदनगर जिल्ह्यात येत असून त्याचे लगत नाशिक, औरंगाबाद हे जिल्हे येतात.

शिर्डी चे परिसरातील अनेक खेडेगांवातून दरवर्षी नियमीतपणे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह, मूर्ती प्राणप्रतिष्ठा, संतांचे महानिर्वाणानंतर होणारे प्रसाद कार्यक्रम असे व अशाप्रकारचे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. याशिवाय सामुदायिक सर्व धर्मिय विवाह सोहळे, साहित्य संमेलने, आंतर्राष्ट्रीय भाषा परिषदा ,राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धा यासारखे सामाजिक व सार्वजनिक उपक्रमही आयोजित करण्यात येतात.

लोकवर्गणीतून साज-या करण्यात येणा-या या कार्यक्रमांसाठी परिसराच्या गांवातून, तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणावरुन एक प्रसिध्द व श्रीमंत देवस्थान म्हणून श्री साईबाबा संस्थानकडे फार पुर्वीपासून आर्थिक अगर शिध्याच्या स्वरुपात मदतीची मागणी येत असते व कार्यक्रमाचे स्वरुप व त्यांचे आयोजन या गोष्टी विचारात घेऊन किमान रु.१५,०००/- ते रु.१,००,०००/- पर्यंतची मदत शिधा स्वरुपात देण्यात येत असते.

उपरोक्त शिधा मदतीमध्ये तांदूळ, साखर, तूप, खाद्यतेल, डाळ इ. वस्तुंचा समावेश असतो. सदरच्या वस्तू देण्यामागे एक धार्मिक तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून बघण्यात येते.

शिधा स्वरुपात देण्यात येणारी ही मदत " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाची असून विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२)(एक-ग)(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये शैक्षणिक/सांस्कृतिक संस्थेस छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतूद आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन दि.०३/०५/२००५ रोजीचे मुंबई येथील झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.३४ व निर्णय क्र.२०९ अन्वये या विषयांवर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विचार विनीमय करुन प्रस्तावास मान्यता दिल्यास सदरचा प्रस्ताव व संबंधीची नियमावली शासन मान्यतेकरीता पाठविणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) मार्फत देण्यात येणा-या शिधा स्वरुपातील मदतीबाबत खालीलप्रमाणे नियमावली तयार केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

(०१) शिधा मागणारी संस्था ही बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट, १९५०१ अथवा सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८८४ या कायद्यानुसार नोंदणीकृत असावी .

(०२) अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद जिल्ह्यातील रजिष्टर सामाजिक संस्थांनी आयोजित केलेली साहित्य संमेलने, जागतिक भाषिक परिषदा, आदिवासी मेळावे, राष्ट्रीय क्रिडा संमेलने इ. सामाजिक कार्यक्रमासाठी .

(०३) शिर्डी परिसरातील गांवे, कोपरगांव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी, संगमनेर, सिन्नर इ. तालुक्यातील धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी.

(०४) कार्यक्रमाचे स्वरुप व व्याप्ती पाहून शिधास्वरुपातील द्यावयाची मदत ही रु.११,०००/- ते रु.१,००,०००/- पर्यंत असावी. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| (अ) | अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, मूर्ती प्राणप्रतिष्ठा, संतांचे महानिर्वाणानंतर होणारे प्रसाद कार्यक्रम इ.धार्मिक कार्यक्रमांसाठी | रु. ११,०००/- ते रु. २५,०००/- |
| (ब) | सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळा कार्यक्रम ,जिल्हास्तरावर भरविणेत येणा-या जागतिक भाषिक परिषदा, आदिवासी मेळावे, साहित्य संमेलने, इ. सामाजिक कार्यक्रमासाठी . | रु.२५,०००/- ते रु. ५०,०००/- |
| (क) | जिल्हास्तरावर भरविणेत येणा-या राष्ट्रीय स्तर -क्रिडा महोत्सव इ. कार्यक्रमासाठी | रु.५०,०००/-ते रु.१,००,०००/- |

(०५) संबधित संस्थेने आर्थिक / वस्तूरुपाने घ्यावयाचे सहाय्य व प्राप्त सहाय्याच्या विनियोगाबाबतचे व्यवस्थापकीय निर्णयांसह विनियोग अहवाल (Utilization Certificate ) संस्थानकडे कार्यक्रमानंतर १५ दिवसाचे आत सादर करावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तयार करणेत आलेल्या नियमावलीस मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.५४. श्री पुण्यतिथी उत्सव -२००५बाबत**

**निर्णय क्र.४४२.** श्रीसाईबाबांचा ८७ वा पुण्यतिथी उत्सव २००५,मंगळवार दिनांक ११/१०/२००५ ते गुरुवार दिनांक १३/१०/२००५ असा तीन दिवस साजरा होणार आहे. या उत्सवातील कार्यक्रमाच्या रुपरेषेबाबतच्या टिप्पणीची प्रत सर्व सदस्यांना पुरविणेत आली होती. तिची नोंद घेण्यात येऊन ती सोबत **परिशिष्ट "ब" म्हणून** ठेवणेत आलेली आहे.

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव २००५ बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले.

**(०१) निमंत्रण पत्रिका-**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००५ च्या निमंत्रण पत्रिका आजीव, आश्रयदाते आदि सर्व सभासद यांना पाठविण्यात याव्यात. एकूण ०१ लाख २५ हजार नग निमंत्रण पत्रिकांची छपाई करुन घेण्यासाठी नेहमीचे प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागवून व अंतिम निर्णय घेऊन छपाई आदेश देणेत यावेत. तसेच इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांतून उत्सवाचे निमंत्रण "न्यूज आयटेम" म्हणून प्रसिध्द करण्यात यावे.

**(०२) निमंत्रित कलाकार कार्यक्रम-**

निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मा.श्री.विनोद अग्रवाल, ह.भ.प.श्री.बाबा महाराज सातारकर, मा.श्री.मोरारी बापू, मा.श्रीमती लता मंगेशकर, मा.श्री.किशोरजी व्यास इत्यादी नामांकी त मान्यवरांचे कार्यक्रम मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व स्थानिक सदस्यांनी निश्चित करावेत.

**(०३) कीर्तन कार्यक्रम-**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००५ मध्ये तीन दिवस ह.भ.प. शरद नेरळकर,नांदेड यांचे कीर्तन ठेवण्यात यावे.

**(०४) मंडप व कमानी:-** उत्सवात १० मंडप व १ स्टेज टाकण्यात यावा्

**(०५) सर्व साधारण व्यवस्था:-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात याव्यात. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणाऱ्या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रित कलाकारांची निवास,भोजन, मानधन व्यवस्था करण्यात यावी. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार एम.टी.डी.सी हॉटेल, शिरडी अथवा संस्थानचे निवासात करण्यात यावी.

सालाबादप्रमाणे भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात विश्वस्तांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, वीणा, व पोथी यातील विश्वस्तांचा सहभाग, सिमोल्लंघन, गांवजेवण, प्रसाद जेवण व्यवस्था, पालखी व्यवस्था, कंत्राटी कामगार, विद्युत रोषणाई , मिष्टान्न निश्चिती, इ.बाबी नेहमीप्रमाणे करण्यात याव्यात.

**(०६ ) उत्सवाचे खर्चाचे अंदाजपत्रक-**

श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००५ करिता रुपये २५,०५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस लाख पांच हजार मात्र) चे अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा-वशी-०५)

**विषय नं.५५. कोजागिरी पौर्णिमा उत्सव-२००५**

**निर्णय क्र.४४३.** श्री मोरेश्वर के गव्हाणकर, अध्यक्ष, डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्ट, मुंबई यांचे दि.१७/०६/२००५ रोजीचे मा.श्री.ससाणेसाहेब, अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांना लिहीलेले पत्रात खालीलप्रमाणे मनिषा व्यक्त केलेली आहे.

"शिर्डी संस्थानचे माजी अध्यक्ष कै. डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर, ज्यांनी सध्याच्या साईमंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना सन १९५० साली केली, त्याचप्रमाणे कै.अण्णासाहेब गव्हाणकर यांनी चालू ठेवलेल्या " कोजागिरी पौर्णिमा" शिर्डी, ह्यावर्षी दि.१६/१०/२००५ मध्ये अमृत महोत्सवात (७५ वर्षे ) पदार्पण करत आहे. डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्ट, मुंबई तर्फे नेहमीप्रमाणे ह्यावर्षी दोन दिवस दि.१६/१०/२००५ व दि.१७/१०/२००५ शिर्डी क्षेत्री विविध कार्यक्रम आपण नेमून दिलेल्या नेहमीच्या जागेवर साजरा करण्याची परवानगी द्यावी. मा.अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांना समारंभाचे अध्यक्ष स्थान भूषविण्याची विनंती करणार आहेत. तसेच संस्थानचे अध्यक्ष

म्हणून सत्कार करणार आहेत. प्रमुख पाहूणे म्हणून प्रतिष्ठीत अधिकारी व्यक्तीस पाचारण करण्याचे योजिले आहे.

समस्त साईभक्तांच्या इच्छेचे प्रतीक म्हणून कै.डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर यांची तसबीर साईमंदिरात कायमची लावण्यात यावी. व कोजागिरीच्या दिवशी साईमंदिर रात्रभर साईभक्तांस दर्शनास उघडे ठेवल्यास डॉ.अण्णांच्या श्रमाचे सार्थक होईल. सर्व साई विश्वस्तांनी यांची नोंद घ्यावी. दि.१६/१०/२००५ व १७/१०/२००५ रोजी डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर यांच्या नांवाचे फलक व कटाऊट स्टेजजवळ व चारी प्रवेशद्वाराजवळ लावण्याची आम्हास परवानगी द्यावी, ही नम्र विनंती.

कार्यक्रमाची सविस्तर कल्पना कार्यकारी अधिकारी (शिर्डी) यांस नेहमीप्रमाणे लेखी कळविण्यात येईल. आपणांस व श्री साईबाबा संस्थानचे सर्व विश्वस्त यांस प्रेमाची विनंती की, आम्ही हाती घेतलेल्या कार्यास आपण सर्व प्रेमाने समर्थन देऊन कार्याची शोभा वाढवावी. "अशा प्रकारचे पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त बाबतीत सौ.संजीवनी गव्हाणकर, विश्वस्त , डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्ट, मुंबई यांचे दि.१६/०६/२००५ रोजीचे पत्रान्वये दोन दिवस कोजागिरी पौर्णिमा उत्सव साजरा करण्याबाबत व कार्यक्रमाचा तपशील इकडे कळविण्यात आला होता. त्यास संस्थानमार्फत त्यांना " कोजागिरी पौर्णिमेच्या मुख्य दिवशी म्हणजे दि.१६/१०/२००५ रोजी सायं.७.०० ते ११.०० कलाकार हजेरी व रात्रौ शेजारतीनंतर लेंडीबागेच्या जवळील स्टेजवर विनोदी नाटक सादर करणेस तसेच दि.१७/१०/२००५ रोजी फक्त दैनंदिन कार्यक्रमास अडथळा न येता सायंकाळी ७.०० ते ९.३० पर्यंत समाधी मंदिराचे स्टेजवर गायनाच्या कार्यक्रमाची हजेरीस मान्यता देण्यात येईल. असे पत्राने कळविण्यात आलेले आहे. कै.डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर, यांची समाधी मंदिरात कायमची तसबीर लावणेबाबत मंदिर विभाग, यांचेशी चर्चा केली असता साईचरित्रांत ज्यांचा उल्लेख आहे अशाच साईभक्तांचे फोटो समाधी मंदिरात लावण्यात आलेले आहेत अशी माहिती मिळाली त्यानुसार कै.अण्णासाहेब गव्हाणकर यांची तसबीर समाधी मंदिरात इतर भक्तांबरोबर लावता येणार नाही फारतर ती तसबीर मंदिर विभागात ठेऊन घेता येईल व पुढे-मागे निर्णय झालेस इतरत्र लावणेची व्यवस्था करता येईल.

तसेच कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी त्यांचे इच्छेप्रमाणे मंदिर संपूर्ण रात्रभर उघडे ठेवणेबाबत केलेली विनंती स्विकारता येणार नाही, कारण फक्त तिन्हीही उत्सवांचे मुख्य दिवशीच फक्त समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्याची प्रथा आहे. इतरवेळी शेजारतीनंतर मंदिर बंद करणेत येते. कोणत्याही कारणास्तव त्यात बदल करणे इष्ट होणार नाही. तसेच जर समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवले तर ती एक प्रथा सुरु होईल व त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कार्यक्रमात व्यत्यय येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच दि.१६/१०/२००५ व दि.१७/१०/२००५ रोजी डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर यांच्या नांवाचे फलक व कटाऊट स्टेजजवळ व चारी प्रवेशद्वारांजवळ लावणेबाबत त्यांनी परवानगी मागितली आहे, त्याबाबत त्यांच्या नांवाचे फलक व कटाऊट बाहेरील स्टेजजवळ लावणेस काहीही हरकत नाही तथापि; चारही प्रवेशद्वारांजवळ लावणेस परवानगी देणे योग्य व प्रशस्त वाटत नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासनशाखा-वशी५/ अधिक्षक, मंदिर विभाग)

**विषय नं.५६. श्री रामनवमी उत्सव २००५ वाढीव खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४४.**श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते व त्यास मा.व्यवस्थापन समितीत मान्यताही मिळालेली होती. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षाही जादा खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | मा.व्य.समितीने मंजूर केलेली रक्कम | प्रत्यक्ष खर्च | शेरा (जादा खर्च) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंडप,कमानी स्टेज, उन्हाळी मंडपासह व पाणपोई इ. | ०१,५०,०००.०० | ०२,९१,७८३.०० | १,४१,७८३.०० |
| ०२. | कलाकार बिदागी, | ०२,७०,०००.०० | ०२,४३,७२१.०० | --- |
| ०३. | भक्तांना मिष्टान्न मजूरीसह | ०१,००,०००.०० | ०१,७६,०६३.०० | ००,७६,०६३.०० |
| ०४. | विद्युत रोषणाई | ०१,८०,०००.०० | २,६७,०५०.०० | ००,८७,०५०.०० |
| ०५. | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदीप्रसादासह. | ०५,००,०००.०० | ०९,३५,१३०.०० | ०४,३५,१३०.०० |
| ०६. | जादा कामगार | ००,३५,०००.०० | ०१,२०,०२९.०० | ००,८५,०२९.०० |
| ०७. | इतर खर्च - मंदिर रंगकाम, | ०१,५०,०००.०० | ००,२९,६९६.०० | ---- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कुस्त्या, मंदिर प्रसाद, कावडी, जादा फर्निचर, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ.शुटींग, पेंटर बिले, पोलीस स्टेशन इंधन बीलासह. | | ००,५६,३१५.००<br>--------------<br>००,८६,०११.०० | |
| ०८. | पालख्या, पिण्याचे पाणी इ. | ००,७०,०००.०० | ००,३६,१२८.०० | ---- |
| | एकूण खर्च | १४,५५,०००.०० | २१,५५,९१५.०० | ०७,००,९१५.०० |

**अ.नं.०१ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव व उन्हाळी मंडपकामी रु.१,०२,०००/- चे मंडपाची कामे दिली होती मात्र दर्शन लाईनसाठी छतावर व लेंडीबागेत जादा मंडप टाकण्यात आले होते त्याचे बील रु.१६,७७०/-, पाणीपुरवठा विभागामार्फत पालखीतील पदयात्रेसाठी ६ शामियाने व ४ कापडी मंडप टाकण्यात आले होते, त्यांचे बील रु.१,५५,३६३/-, पिण्याच्या पाण्याचे टाकीसाठी शिर्डी ते सिन्नर याठिकाणी दोन्ही मार्गात एकूण १९ मंडप टाकण्यात आले होते त्यांचे बील रु.९,०००/- व इतर खर्च रु.८,६५०/- असा एकूण खर्च रु.२,९१,७८३/- इतका झालेला असून मंजूरी फक्त रु.१,५०,०००/-च घेण्यात आलेली होती. तसेच सन २००४ साली पालखी-पदयात्री व पिण्याच्या पाण्याचे टाकीवरील मंडपाचे बील हे पाणीपुरवठा विभागाचे बजेटमधून खर्ची टाकण्यात आले होते.

**अ.नं.०३ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००५ भक्तांना मिष्टान्न मजूरीसह चा मंजूर खर्च हा रु.१,००,०००/- इतका होता प्रत्यक्षात मात्र रु.१,७६,०६३/- इतका खर्च झालेला आहे, कारण ८,१३५ भक्तांनी जादा भोजन घेतले असून दरामध्येही मूळ किंमतीपेक्षा २५ टक्केंनी भाववाढ झालेली असलेने उर्वरीत खर्च जादा झालेला आहे.

**अ.नं.०४ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये विद्युत रोषणाईवर रु. ०१,८०,०००/- इतका खर्च मा.व्यवस्थापन समितीने मंजूर केला होता व श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये विद्युत रोषणाईवर रु.०२,६७,०५०/- इतका खर्च झालेला आहे. यात श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये भक्तांच्या आग्रहाखातर सिन जादा दिवस ठेवण्यात आलेने प्रवास भाडे, वाहतूक भाडे हे खर्ची पडलेले आहे. त्यामुळे जादा खर्च झालेला आहे.

**अ.नं.०५ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत** - श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये पोष्टेजवर रु.५,००,०००/- इतका खर्च मंजूर करण्यात आलेला आहे, व श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये पोष्टेजवर प्रत्यक्ष खर्च रु.९,३५,१३०/- झालेला आहे. श्री रामनवमी उत्सव २००४ मध्ये उदीप्रसाद पाकीटे पाठविण्यात आलेली नव्हती, कारण भांडारमध्ये उदीप्रसाद पाकीटे शिल्लक नव्हती, म्हणून कमी खर्च आला होता. श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाकीटेही आजीव सभासदांना पाठविण्यात आली होती, त्यामुळे उर्वरीत खर्च जादा झालेला आहे.

अ.नं.०६ मध्ये जादा झालेल्या खर्चाबाबत - श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये जादा कंत्राटी कामगार खर्च हा रु.३५,०००/- इतका मंजूर झालेला होता व श्री रामनवमी उत्सव २००५ मध्ये प्रत्यक्ष कंत्राटी कामगार खर्च हा रु.०१,२०,०२९/- इतका झालेला आहे, विभागवार मागणी ही २००४ पेक्षा २००५ मध्ये जादा असलेने मॅनडेज जादा भरले तसेच दर वाढ झालेने उर्वरीत खर्च जादा झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीने श्री रामनवमी उत्सव २००५ चा मंजूर केलेला खर्च हा अंदाजित असून सन २००४ मधील खर्चामध्ये १० टक्के जादा धरुन कळविण्यात आलेला होता प्रत्यक्षात मात्र मंडप, मिष्टान्न, निमंत्रण पत्रिका पोष्टेज, जादा कामगार इ. ठिकाणी भाववाढ व इतर कारणांमुळे जादा खर्च झालेला आहे.

श्री रामनवमी उत्सवात अंदाजीत खर्च रु.१४,५५,०००.०० इतका अपेक्षीत होता मात्र प्रत्यक्षात खर्च रु.२१,५५,९१५.०० झालेला आहे. उपरोक्तनुसार जादा खर्च रु.०७,००,९१५.०० (अक्षरी रु. सात लाख नऊशे पंधरा मात्र) इतका झालेला आहे. तरी श्री रामनवमी उत्सवात जादा झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.५७. सल्लागार पदी नेमणूक होणेबाबत.**

**निर्णय क्र.४४५.** संस्थानमध्ये सल्लागार पदावर नेमणूक होणेबाबत श्री दत्तात्रय व्यंकटेश रायपल्ली, सेवानिवृत्त नायब तहसिलदार, श्रीरामपूर व श्री एन.सी.वाखुरे, सेवानिवृत्त जनरल मॅनेजर यांनी त्यांचे अनुक्रमे दिनांक ०७.०५.२००५ व दिनांक ०१.०६.२००५ चे अर्जाने विनंती केलेली आहे.

श्री रायपल्ली यांचे अर्जावर 'मिटींगपुढे ठेवा' असा अभिप्राय मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेला आहे. तसेच श्री.वाखुरे यांचे अर्जावर 'श्री.सिताराम चंद्रभान वाखुरे यांनी आपल्या संस्थानकडे कायदे सल्लागार (लिगल ॲडव्हायजर) म्हणून नोकरी मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. आपल्या

संस्थानमधील श्री.वाव्हळ यांची श्रीरामपूर येथे बदली केलेली आहे. त्यांची शिर्डी येथील जागा असून त्या जागेवार अनुभवी व्यक्तीची निवड होणे गरजेचे आहे श्री.वाखुरें यांनी यापूर्वी सहकार क्षेत्रात महत्वाचे जागेवर काम केलेले असून त्यांचे शिक्षणाचा व अनुभवाचा विचार करता संस्थानला त्याचे सेवेची मदत होणार आहे. तरी त्यांना आपल्या संस्थानमध्ये श्री.वाव्हळ यांचे रिक्त जागेवर कामावर घेणेबाबत विचार करावा' असा अभिप्राय मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांनी दिलेला आहे.

श्री.दत्तात्रय रायपल्ली, यांचे संबंधीत माहिती खालीलप्रमाणे आहे:-

श्री.रायपल्ली यांनी महसूल खात्यात एकूण ३५ वर्षे सेवा केलेली आहे. ते दिनांक ३१.०१.२००३ रोजी नायब तहसिलदार या पदावरुन सेवानिवृत्ती झालेले आहेत. सेवानिवृत्तीचे वेळी त्यांचे मुळ वेतन रुपये ७२००/- इतके होते. आजमितीस त्यांचे वय ६० वर्षे इतके आहे.

श्री.सिताराम वाखुरे यांचेबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| जन्मतारीख- | : १९.०९.१९३९ | |
| अर्जाचे तारखेस वय | : ६५ वर्षे | |
| शिक्षण | : बी.ए.एल.एल.बी | |
| अनुभव | : (अ) क्लर्क/कॅशियर | वर्षे ०३.१० |
| | (ब) अकौंट, श्रीशिवाजी हायस्कूल औरंगाबाद | वर्षे ०५.०२ |
| | (क) वकिली व्यवसाय | वर्षे ०५.१० |
| | (ड) सुपरिटेन्डेंट, गणेश सह.साखर कारखाना | वर्षे ०२.०६ |
| | (इ) सेक्रेटरी, गणेश सह.साखर कारखाना | वर्षे १७.०८ |
| | (ई) इन्चार्ज मॅनेजिंग डायरेक्टर गणेश सह.साखर कारखाना | वर्षे ०१.०४ |
| | (उ) जनरल मॅनेजर,श्रीछत्रपती संभाजीराजे साखर उद्योग, औरंगाबाद | वर्षे ०.०९ |
| | (ऊ) सध्या राहाता व कोपरगाव न्यायालयात दिवाणी व फौजदारी कामाचा व्यवसाय | |

सध्या संस्थानचे सर्वांगिण कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढला असून दिवसेंदिवस वाढत आहे. संस्थानसाठी जमीन संपादन विषयक व अनुषंगिक कामांसाठी विधी अधिकारी यांचे मदतीसाठी श्री.रणशूर,सेवानिवृत्त नायब तहसिलदार, यांची मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८ मे,२००५रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२६ नुसार दरमहा रुपये ७०००/-मानधनावर एक वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणूक करणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार श्री.रणशूर हे दिनांक १०.०५.२००५पासून कार्यरत आहेत.

प्रशासन शाखा विधी विभागाकडे सध्या कोपरगाव न्यायालयात ४४ प्रकरणे, औरंगाबाद खंडपीठात ०७ प्रकरणे व मुंबई उच्च न्यायालयात ०१ प्रकरण, अशी एकूण ५२ प्रकरणे (दिवाणी/ फौजदारी) प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच सध्या विविध कारणांसाठी जमीन संपादन विषयक प्रस्ताव आहेत. सदरचे कामासाठी श्री.गर्कल, विधी अधिकारी यांचे मदतीसाठी, श्री.रायपल्ली अथवा श्री.वाखुरे, या दोघांपैकी एकाची श्री.रणशूर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचेप्रमाणेच कंत्राटी पद्धतीने, मानधन तत्वार नेमणूक केल्यास संस्थानची कामे वेळेवर पूर्ण करण्यास विधी अधिकारी यांना त्यांची मदत होवू शकेल.

संस्थानचे भू-संपादन विषयक कामासाठी मा.उपविभागीय अधिकारी (महसूल) यांचे पर्यवेक्षण खाली कार्यरत असलेल्या कक्षाकडे सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री.वाव्हळ व संस्थानचे शिरडी कार्यालयात श्री.रणशूर, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांचे कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधन तत्वावर तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचेप्रमाणे श्री,रायपल्ली, सेवानिवृत्त नायब तहसिलदार अथवा श्री.वाखुरे सेवानिवृत्त जनरल मॅनेजर श्री.छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लि.,औरंगाबाद यां दोघांपैकी एकाची दरमहा रुपये ७०००/- (अक्षरी रुपये सात हजार) मात्र एकत्रित मानधनावर तात्पुरते सहा महिने कालावधीसाठी कंन्सलटंट म्हणून नेमणूक होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भू-संपादन विषयक कामांचा दिवसेंदिवस वाढणारा व्याप लक्षात घेता, श्री.दत्तात्रय व्यंकटेश रायपल्ली, सेवानिवृत्त नायब तहसिलदार, श्रीरामपूर व श्री एन.सी.वाखुरे, सेवानिवृत्त जनरल मॅनेजर श्री.छत्रपती संभाजीराजे साखर उद्योग लि.,औरंगाबाद या दोघांनाही कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी दरमहा रुपये ७०००/- (अक्षरी रुपये सात हजार) मात्र एकत्रित मानधनावर तात्पुरते सहा महिने कालावधीसाठी कंन्सलटंट म्हणून नेमणूक देणेत यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.५८. सन २००३-०४ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालावरील कार्यवाहीची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४४६.** सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणासाठी मे. मे.एन.पी.रेडीज् ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, मुबई यांची, तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.०४ जानेवारी, २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०६(०३) अन्वये नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूकीस मा.धर्मादाय आयुक्त मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.विधी/१४२०/०४ दि.०४ मार्च, २००४ अन्वये मान्यता दिलेली होती. त्या अनुषंगाने मे.एन.पी.रेडीज् ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, मुबई यांना जा.नं.एसएसएस/ वशी/लेखा/ २७८२/ २००४ दि.१२ मार्च, २००४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. लेखापरिक्षण पूर्ण करुन माहे जुलै २००४ मध्ये अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले होते.

उपरोक्त कार्यादेशान्वये वैधानिक लेखापरिक्षक यांनी त्यांचा सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल दि.१७ ऑगष्ट, २००४ रोजी सादर केला होता. सदरचा अहवाल तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.२० ऑगष्ट, २००४ रोजीच्या सभेसमोर ठेवण्यात येऊन त्याची निर्णय क्र.४२१ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच सदर अहवालात उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतचा पूर्तता अहवाल मा.व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्यात यावा, असे निर्देश देण्यात आलेले होते.

परंतु, त्या दरम्यान संस्थानच्या व्यवस्थापनामध्ये बदल होऊन राज्य शासनाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४' लागू करण्यात आला. त्यानुसार नव्याने मा.व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. व्यवस्थापकीय घटना व व्यवस्थापनामध्ये झालेले बदल व त्या अनुषंगाने तातडीने करावी लागलेली कामे, यांमुळे उपरोक्त लेखापरिक्षण अहवालातील मुद्दयांचा पूर्तता अहवाल तातडीने मा.व्यवस्थापन समिती-समोर ठेवता आलेला नाही. त्यामुळे सदरचा पूर्तता अहवाल सन २००४-०५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाबरोबरच सादर करण्याचे नियोजन करण्यात आले होते.

तसेच, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम-२००४ मधील कलम २९(१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे लेखापरिक्षण अहवालाची प्रत दिनांक ३० जूनपुर्वी शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. उपरोक्त तरतुदींन्वये सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल पूर्ण करण्यासाठी तीनच महिन्यांचा कालावधी उपलब्ध असल्याने, आर्थिक वर्ष संपताच लेखापरिक्षणाच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली होती. वैधानिक लेखापरिक्षक यांनी सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण केलेले असून, सदर अहवाल आजचे सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात आला आहे त्यासह प्रस्तूत २००३-०४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालावरील पूर्तता अहवाल सोबत सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.५९. श्रीसाईसच्चरित पारायण सोहळा वर्ष ११ वे वाढीव खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.४४७.** श्री शांताराम रंगनाथ मिराणे, संस्थापक, नाटय रसिक संच, शिर्डी, यांनी त्यांचे दि.२७/०७/२००५ रोजीचे पत्रान्वये - गेली १० वर्षे श्री साईबाबा संस्थानच्या सौजन्याने व नाट्य रसिक संच, शिर्डीच्या वतीने हा पारायण सोहळा संपन्न होत आहे. यावर्षी मात्र हा सोहळा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) व नाट्य रसिक संच यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करावयाचे विश्वस्त समितीने मंजूर केले आहे. यातील खर्चाच्या खालील बाबींची पूर्तता सालाबादप्रमाणे करावयाची आहे. आपल्या माहितीसाठी स्थूलमानाने खर्चाचा तपशील देत आहोत. मंडपाच्या खर्चाव्यतिरिक्त सर्व खर्च पूर्ती गावक-यांच्या सहकार्याने आम्ही करीत होतो.

| | |
|---|---|
| ०१) मंडप व डेकोरेशन खर्च | रु. ०,३५,०००.०० |
| ०२) कलाकार बिदागी-जाणे-येण्याच्या प्रवासखर्चासह. | रु. ०,४०,०००.०० |
| ०३) मिरवणूक खर्च (रथ, बँड इ.) | रु. ०,१०,०००.०० |
| ०४) पत्रिका, हँड बिल्स, बॅनर्स व इतर छपाई खर्च. | रु. ०,१८,०००.०० |
| ०५) किरकोळ खर्च | रु. ०,०५,०००.०० |
| एकूण खर्च | **रु. १,०८,०००.००** |

श्रींचे पारायण समाप्तीनंतर भंडारा - महाप्रसाद - संस्थानने करावयाचा आहे.

या व्यतिरिक्त खालील खर्च आम्ही करणार आहोत.

०१) वाचक नोंदणी बॅज, पोथीची पिशवी इ.

०२) मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष , विश्वस्तांचा व मान्यवरांच्या सत्कारासाठी लागणारा खर्च,

०३) जेष्ठ नागरिक सत्कार,

०४) कर्तृत्ववान महिला सत्कार व हळदी-कुंकू समारंभ खर्च,

०५) ज्यांनी कार्यक्रमाच्या वेळी विशेष सहकार्य केलेले आहे अशांचा सत्कार.

उपरोक्तप्रमाणे त्यांनी स्थूलमानाने माहिती दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२००५ रोजीचे मुंबई येथील सभेत उपरोक्त कार्यक्रमास रु.५०,०००/- (अक्षरी रु.पन्नास हजार मात्र)ची मंजूरी देण्यात आलेली आहे. तथापि ; श्री मिराणे सर यांनी स्थूलमानाने रु.१,०८,०००/- (अक्षरी रु.एक लाख आठ हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असून उर्वरीत रु.५८,०००/-(अक्षरी रु. अठ्ठावन्न हजार मात्र)चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचेवेळेस काहीं सदस्यांनी साईसच्चरित पारायण सोहळयाच्या पत्रिका मिळाले नसलेबाबत सांगितले. याबाबत चर्चा होऊन, नाट्य रसीक संच,शिर्डी यांना पत्र देऊन सभेने तिव्र आक्षेप घेऊन नापसंती व्यक्त केलेबाबत कळविण्यात यावे, असें ठरलें.

आजचे सभेत नाट्य रसीक संच, शिर्डी यांचे प्रतिनिधी सभेपुढे उपस्थित झाले, त्यांना सभेने कार्यक्रमाच्या पत्रिका सदस्यांना मिळाले नसल्याबाबत विचारणा केली असता, आमचेकडून चुक झाली असे त्यांनी मान्य केले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.६०. संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगार पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर यांचे ठेकेदारीस/करारास मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.४४८.** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल,कुशल कामगार पुरविण्यासाठी श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लिमिटेड,नाशिक तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.,मुंबई व मे इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स (इं) लि.,नागपूर यांची दि.०१/०८/२००३ पासून नेमणूक करण्यात आलेली आहे.सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कराराचा ठेकेदारीचा कालावधी दि.३१.०७.२००४ अखेर संपुष्टात आल्यानंतर त्यांचे कराराची ठेकेदारीची मूदत आहे त्याच अटी व शर्तीवर दि.०१.०८.२००४ पासून ते दि.३१.०८.२००५ अखेर पर्यंत वेळोवेळी वाढविणेत आलेली आहे.संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची वाढीव मुदत दि.३१०८२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी यांना पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी लागणारे अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे कामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांची ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रातून जाहिरात देवून सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या.सिलबंद निविदा फॉर्मस् विक्रीची मुदत दि.०६.०६.२००५ पासून ते दि.१८.०६.२००५ अखेर पर्यंत अशी होती.तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०.०६.२००५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन संस्थानमध्ये लागणारे अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे कामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून ठेकेदारांकडून एकूण-४२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.सदर ४२ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेल्या आहेत.त्या बाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करुन,निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलाविणे.मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निविदाधारकांशी ठेकेदारांशी चर्चा/ वाटाघाटी झाल्यानंतर, निविदा मंजूर करणेत आलेल्या ठेकेदारांना वर्क ऑर्डर्स देणे या प्रक्रियेला सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

याकरिता, श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लिमिटेड,नाशिक यांचे मार्फत पुरविण्यात येणा-या कंत्राटी अकुशल कुशल कामगारांच्या ठेकेदारी करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.,मुंबई व मे इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स (इं) लि.,नागपूर,यांचे मार्फत पुरविण्यात येणा-या कंत्राटी सुरक्षा कर्मचा-यांच्या ठेकेदारी करारास सध्याच्या कंत्राटा संबंधातील करारातील अटी व शर्तीसच अनुसरुन व त्याच अटी,शर्तीचे अधीन राहून दिनांक ०१/०९/२००५ पासून पुढे दोन महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.६१. कवी सम्मेलन भरविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४९.** श्री धनंजय सोलंकर, पुणे यांनी त्यांचे दिनांक ०८ जून २००५ रोजीचे पत्राने,"मी स्वत: एक मान्यताप्राप्त कवी असून माझी तीन पुस्तके प्रकाशित आहेत. त्यापैकी " पदर " कवीतासंग्रहाचे हिंदीत भाषांतर झाले आहे. मी विनंती करीतो की, साईंच्या दरबारात आपल्या नियोजनाप्रमाणे नजिकच्या भविष्यात एक कवी संमेलन घ्यावे. मी महाराष्ट्रातील खालील प्रसिध्द कवींना कवीसंमेलनास निमंत्रीत करणेची जबाबदारी घेईन.

०१.संजय बोरुडे ०२.भरत दौंडकर ०३.मन्मथ बंलूरे ०४.कुमार खोद्रे ०५.रवि पाईक ०६.संगीता बर्वे ०७. विजय नांगरे ०८. बाबासाहेब सौदागर ०९. अंजली कुलकर्णी १०. रघुराज मेटकरी.

तसेच जेष्ठ कवींपैकी स्वत: नारायण सुर्वे किंवा ना.धों.महानोर किंवा फ.मु.शिंदे आदिंना आमंत्रित करता येईल. सदरचा कार्यक्रम मोठया प्रमाणात जाहिरात करुन आयोजित करावा अशी आशा आहे. कार्यक्रमास कमीत कमी रु.२५,०००/- खर्च अपेक्षित आहे. संमेलनासाठी येणाऱ्या कवींची येण्याची, राहण्याची व जेवणाची व्यवस्था संस्थानकडून व्हावी, " असे कळविलेले आहे.

महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात " समितीची कर्तव्य व अधिकार " या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७(२) मधील (ठ) मध्ये **" श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" तसेच (ड) मध्ये " श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल,"** अशी तरतूद आहे.

सदरचे तरतूदी नुसार साईबाबांच्या जीवनकार्यावर व शिकवणूकीवर आधारीत कवी संमेलन भरवून त्यामध्ये नामांकित कवींना निमंत्रित करावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिरडी येथे लहान स्वरुपाचे कवी संमेलन आयोजित न करता राज्य पातळीवरील कवी संमेलन आयोजित करण्यात यावे. याकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करण्यात यावा असें ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **महाराष्ट्र राज्यातील अतिवृष्टीच्या नैसर्गिक आपत्ती निवारणास आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५०.** मंगळवार दिनांक २६ जुलै, २००५, रोजी व त्या दरम्यान महाराष्ट्राची राजधानी, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. या प्रचंड पावसामुळे मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक शहरात नद्यांच्या महापूराचे पाणी भरले. यामुळे महाराष्ट्रात प्रचंड मनुष्य, प्राणी व वित्तहानी झाली. मा.पुनर्वसन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी या हानीचा प्राथमिक अंदाज सुमारे रुपये ४ हजार कोटी, इतका वर्तविला आहे.

दिनांक ०४ ऑगष्ट,२००५ रोजीचे दैनिक सकाळ या वृत्तपत्रातील महाथैमान या पुरवणीत, तसेच इतर वृत्तपत्रांत महाराष्ट्रातील या नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीचा अंदाज पुढीलप्रमाणे वर्तविण्यात आलेला आहे :

- आर्थिक १५ हजार कोटी रुपयांचे नुकसान.
- संपूर्ण राज्यात १०३४ जणांचे पूरबळी, त्यापैकी एकटया मुंबई शहरात ४५० जण मृत्यूमुखी.
- मुंबई शहरातील ३५०० म्हशीसह संपूर्ण राज्यात २३,००० शेळया-मेढयांचा मृत्यू.
- संपूर्ण राज्यात २,५०,००० हेक्टर शेती नष्ट.
- १३५० कोटी रुपयांचे विम्याचे दावे दाखल.
- राज्यभरात अडीच लाख लोक मदत छावण्यांत आसऱ्याला.

याशिवाय, राज्यातील विविध भागांतील मनुष्य व वित्तहानीचे सर्वेक्षण व पहाणीचे काम अद्यापी सुरु आहे. त्यामुळे या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा संपूर्ण अंदाज येण्यास अजून काही कालावधी जावा लागणार आहे.

महाराष्ट्र राज्यावर आलेल्या या नैसर्गिक आपत्तीची हवाई पहाणी भारताचे पंतप्रधान मा.डॉ.मनमोहन सिंग व त्यांच्या सहकारी केंद्रीय मंत्र्यांनी दिनांक २९ जुलै, २००५ रोजी केली. त्यानंतर सुरुवातीस ५०० कोटी रुपयांची तातडीची मदत केंद्र शासनामार्फत करण्यात आली. त्यानंतर आपत्तीची भीषणता विचारात घेऊन दिनांक ०१ ऑगष्ट,२००५ रोजी आणखी ५०० कोटी रुपयांची मदत केंद्र शासनामार्फत करण्यात आली आहे. या नैसर्गिक आपत्तीत, सर्वसामान्य जनतेस सहाय्य करण्यासाठी ठिकठिकाणी लष्कराची मदत घेण्यात येत आहे.

या नैसर्गिक आपत्तीस सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध संस्थांनी आपल्या मदतीचा हात पुढे केला असून, महाराष्ट्र राज्यावर कोसळलेल्या या अस्मानी संकटास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापनामार्फत रुपये ५ कोटींची भरीव मदत करण्यात यावी, असे मा. सदस्य श्री. अशोकराव खांबेकर यांनी दिनांक ०२ ऑगष्ट, २००५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

यापूर्वीही अशा स्वरुपाच्या नैसर्गिक आपत्तीमध्ये संस्थानच्या व्यवस्थापनाने तातडीचे आर्थिक सहाय्य केले आहे.

त्याचा थोडक्यात गोषवारा पुढील प्रमाणे :

| अ.नं. | आर्थिक वर्ष | आपत्तीचा तपशील | आर्थिक सहाय्य रक्कम रुपये | निधीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | १९९३-१९९४ | किल्लारी भूकंप | ५१,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| ०२ | १९९६-१९९७ | आंध्र पद्रेश चक्रीवादळ | २५,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| ०३ | १९९९-२००० | कारगील युध्द फंड | ११,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| ०४ | १९९९-२००० | ओरिसा चक्रीवादळ | ११,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| ०५ | २०००-२००१ | गुजरात भूकंप | ११,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी |
| ०६ | २००४-२००५ | दक्षिण भारतातील त्सुनामी वादळ व भूकंप | २५,००,०००/-<br>२५,००,०००/-<br>२५,००,०००/- | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी<br>मा.पंतप्रधान सहाय्यता निधी<br>राजीव गांधी प्रतिष्ठान, नवी दिल्ली |

उपरोक्त परिशिष्टातील सहाय्यता निधीच्या नोंदी लक्षात घेता, या प्रसंगी विश्वस्तव्यवस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यावर कोसळलेल्या या नैसर्गिक आपत्तीमध्ये मानवीय दृष्टीकोनातून भरीव व तातडीने मदत करणे, हे विश्वस्तव्यवस्थेचे कर्तव्य ठरते.

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, अधिनियम २००४ चे (सुधारीत) कलम २१ (२) अन्वये, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीकडून पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात व खर्च करण्यात येईल :- (एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी किंवा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था किंवा कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतिक संघटना अथवा सोसायटी यांची नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांच्याकडून स्थापना करुन घेण्यासाठी आणि त्यांची देखभाल करण्यासाठी वापरण्यांत येईल. असे नमूद करण्यात आले आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद " ब " मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार, छाननी समितीच्या अभिप्रायानंतर या नैसर्गिक आपत्तीस आर्थिक सहाय्य देता येईल. परंतु महाराष्ट्र राज्यावर कोसळलेल्या या नैसर्गिक आपत्तीची तीव्रता व भीषणता लक्षात घेता, राज्यातील एक मोठी संस्था या नात्याने, विश्वस्तव्यवस्थेच्या व्यवस्थापनाचे या नैसर्गिक आपत्तीस सहाय्य करणे कर्तव्य ठरते. श्री साईंच्या दर्शनास येणाऱ्या भक्तांमध्ये मुंबई व परिसरातील भक्तांची संख्या मोठी आहे. सर्वसामान्यांसह या संकटग्रस्त साईभक्तांस सर्वतोपरी सहाय्य करण्याच्या दृष्टीकोनातून या नैसर्गिक आपत्ती निवारणाच्या कार्यामध्ये सहभाग म्हणून उचित आर्थिक सहाय्य दिले जावे, असे नम्र मत आहे. ही सहाय्यता रक्कम मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी (नैसर्गिक आपत्ती), महाराष्ट्र राज्य यांस धनादेशाने अदा करण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रामध्ये राज्यशासनाकडून सुरु असलेल्या आपत्ती निवारण कार्यामध्ये सहभाग म्हणून श्री साईबाबां संस्थानचे वतीने रुपये पाच कोटी ची आर्थिक मदत तसेच संस्थान कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या पगाराची होणारी रक्कम मा.श्री शरदरावजी पवार, केंद्रीय कृषि मंत्री, नवी दिल्ली यांचे हस्ते मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना चेकव्दारे देण्यात यावी. तसेच कोकणात अतिवृष्टीमूळे अधिक नुकसान झाले आहे अशा एका गावास दत्तक घेऊन तेथील घरे, रस्ते, वीज वितरण यंत्रणा आदी पायाभूत सुविधांची पूनर्उभारणी करण्याचा खर्च श्रीसाईबाबा संस्थानने करणेबाबत समक्ष पहाणी करुन सविस्तर अहवाल सादर करावा, असे ठरले. मा.सदस्य श्री शैलेश श्रीहरी कुटे यांनी स्वत: होऊन तयारी दर्शविल्याने मा.व्यवस्थापन समितीचे वतीने त्यांचेकडे ही जबाबदारी सर्वानुमते सोपविण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-६/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **श्री छोटू हुसेन लहारे, रा.राहूरी व श्री मधुकर दिनकरराव जाधव यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४५१.** अ) श्री छोटू हुसेन लहारे. रा.राहुरी यांनी दिनांक ०९.०६.२००५ चे अर्जान्वये त्यांचे किडणीचे आजारावर ग्रॅंड मेडिकल फाऊंडेशन रुबी हॉल क्लिनिक, पुणे या रुग्णालयात उपचार चालू असून त्याकरीता रुपये ८०,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे. तरी या उपचारासाठी आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

श्री लहारे यांनी अनुदान अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली असून अनुदान देणेकामी मा.श्री प्रसाद तनपुरे यांचे शिफारस पत्र जोडलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक २३.०७.२००५ रोजी शिरडी येथील समक्ष भेटीत व दिनांक ०४.०८.२००५ रोजी दूरध्वनीव्दारे श्री लहारे यांचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत सूचना दिलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री लहारे यांना उपरोक्त आजारावरील उपचारासाठी वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याची तरतूद नाही, परंतू एक विशेष बाब म्हणून श्री छोटू हुसेन लहारे यांना संस्थान नियमानुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे असें ठरलें.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३. श्री मनोज वसंतलाल लुनिया, श्रीरामपूर यांचा वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज**

**निर्णय क्र.४५२.** श्री मनोज वसंतलाल लुनिया, रा.श्रीरामपूर यांनी त्यांचे मेंदूवर सह्यांद्री स्पेशालिटी हॉस्पिटल,पुणे या रुग्णालयात उपचार चालू असून त्याकरीता रुपये ६५,०००/- खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे. तरी या उपचारासाठी आर्थिक मदत मिळावी अशी विनंती केलेली आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार मेंदूची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार याकरीता अनुदान देण्यात येते. श्री लुनिया यांची शस्त्रक्रिया नसून फक्त उपचार चालू आहेत. त्यामुळे अनुदान देता येत नाही

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक २५.०७.२००५ रोजी दूरध्वनीव्दारे श्री लुनिया यांचा अर्ज मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत सूचना दिलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री लुनिया यांना उपरोक्त आजारावरील उपचारासाठी वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याची तरतूद नाही, परंतू एक विशेष बाब म्हणून श्री मनोज वसंतलाल लुनिया यांना संस्थान नियमानुसार वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका, रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४. सन २००५-२००६ प्रसादालय काजू तुकडा खरेदीबाबत**

**निर्णय क्र.४५३.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.०१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.१६ नुसार सन २००५-२००६ प्रसादालय व कॅन्टीन विभाग वार्षिक माल खरेदीकामी मान्यता मिळालेने माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आलेल्या निविदा व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०४.२००५ मध्ये उघडण्यात येऊन दिनांक ०९.०७.२००५ चे व्यवस्थापन समितीत निविदाधारकांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करुन त्यांनी दिलेल्या सूटीचा विचार करुन गुरुवार दिनांक १४.०७.२००५ रोजीचे मा.स्थानिक विश्वस्त सभेत खरेदीबाबतचा अंतिम निर्णय घेणेत आलेला आहे. सदर खरेदीमध्ये काजू तूकडा -१०० क्विंटल ची मागणी केलेली असून न्युनतम दराने काजू तुकडा पुरवठा आदेश मे.संतोष ट्रेडींग कं.जळगांव यांना प्रति किलो रुपये २४५/- अधिक व्हॅट टॅक्स सह रुपये २५४.८० ने अलहिदा देण्यात येत आहे. परंतू दरम्यानचे काळात मे.संगमनेर तालुका ॲग्रीकल्चर प्रोड्युस प्रोसेसिंग मार्केटींग को-ऑप सोसायटी लि.संगमनेर यांनी दिनांक २०.०६.२००५ चे पत्रान्वये राजहंस काजू तुकडा मोठा तुकडा रुपये २४०/- अधिक व्हॅट टॅक्ससह रुपये २४९.६० ने पुरवठा करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

मे.संगमनेर तालुका ॲग्रीकल्चर प्रोड्युस प्रोसेसिंग मार्केटींग को-ऑप. सोसायटी लि.संगमनेर ही संस्था परिसरातील नामवंत सहकारी संस्था आहे. तसेच त्यांचे काजू तुकड्याचा नमूनाही चांगला असून काजू तूकडा पुरवठ्याची हमी म्हणून नियमाप्रमाणे ५% अनामत रक्कम संस्थानकडे ठेवणेस तयार असल्यास त्यांचेकडून वार्षिक खरेदीपैकी ५०% म्हणजे ५० क्विंटल काजू तुकडा प्रति किलो रुपये २४९.६० ने खरेदी करणेस व उर्वरित ५० क्विंटल काजू मे.संतोष ट्रेडींग कं.जळगांव यांचेकडून मान्य दराने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५. चपाती चांगली मऊ येण्याकरीता आट्यामध्ये मैदा वापरणे व चपाती ठेकेदार यांना आट्या बरोबर मैद्याचे वजनाचे बील आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५४.** साईभक्तांना चांगल्या प्रतीच्या चपात्या मिळणेकामी सन १९९९ पासून चपाती बनविण्याचे काम श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी , साळंगपूर , गुजराथ यांना ठेकेदाराने देण्यात आलेले आहे. चपात्या चांगल्या मऊ, मुलायम येणेकामी १०० किलो आटयामध्ये सुमारे ५ किलो मैदा वापरणे योग्य राहील. असे चपाती

ठेकेदार यांनी सांगितल्याने व प्रायोगिक तत्वावर आटा + मैदा वापरून केलेल्या चपात्या चांगल्या मऊ व मुलायम होत असल्याने मा. व्यवस्थापन मंडळ दि. २७.२८/०७/९९ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.२ वरील निर्णय क्र. ३१९ नुसार आटयामध्ये मैदा वापरणेस व त्याकामी आवश्यक तो जादा मैदा खरेदीस मंजूरी मिळालेली आहे.

तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२७.२८/०७/९९ चे सभेतील निर्णय क्रं.३१९ नुसार सन १९९९ पासून उपरोक्तप्रमाणे आटयामध्ये मैदा वापरून चपात्या बनवित आहोत व आटा + मैदा याचे वजनानुसार चपाती ठेकेदार यांना मजूरीची रक्कम आदा करीत आहोत. मैदा हा आटयाचाच एक प्रकार आहे. त्यामुळे यापूर्वी मैदयाचे वजनाचेही मजूरी बिल चपाती कंत्राटदारास देणेबाबत मान्यता घेणेत आलेली नाही. तसेच निविदेमध्येही त्याबाबतचा स्वतंत्र उल्लेख करणेत आलेला नाही. वास्तविकत: १०५ किलो निव्वळ आटयाच्या चपात्या जेवढया नग होतात, तितक्याच चपात्या १०० किलो आटा व ५ किलो मैदा = १०५ किलो वजनाच्या चपात्या तयार होतात.

मा.लेखा परिक्षक यांनी सन २००४ -२००५ चे लेखापरिक्षणाचे वेळी मुद्या उपस्थित केला की , कोटेशनमध्ये १०० किलो आटयाच्या चपात्याचा दर असे नमूद केलेले आहे. त्यामुळे मैदयाचे वजनाचे बील आदा करता येणार नाही. मात्र चपात्या चांगल्या मऊ, मुलायम येणेकरीता तत्कालीन व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने आटयामध्ये मैदा वापरणेत येत आहे. यापुढील चपाती बनविणेचे कोटेशन काढतांना आटा + मैदा असा शब्द प्रयोग वापरता येईल. तोपर्यंत वरीलप्रमाणे आटा + मैदा सह वजनाचे बील चपाती ठेकेदार यांना आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-प्रसादालय प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविणेबाबत**

**निर्णय क्र.४५५.** नवीन नियोजित रुग्णालयाला सौर उर्जा सुविधा पुरविणेबाबत मा. वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये, यांनी कळविले असून यात त्यांनी पुढील प्रमाणे नमूद केले आहे. नियोजित नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयात २०० पलंगाची व्यवस्था असून ६ शस्त्रक्रिया कक्ष, ३ क्रिटीकल केअर युनिटस्, ३३ स्पेशल रुम्स आहेत. यासोबत ३२ डॉक्टरांची निवासस्थाने असून रुग्णालयासाठी स्वतंत्र कॅन्टीन आहे. खालील ठिकाणी गरम पाण्याचा पुरवठा आवश्यक आहे.

(१) रुग्णालयातील सर्व स्नान कक्ष
(२) रूग्णालयातील सर्व स्पेशल रुमचे बेसिन व स्नान कक्ष ( ३३ खोल्या )
(३) कॅथलॅबसह सहा शस्त्रक्रिया कक्ष , यात हात धुण्याची जागा, हत्यारे धुण्याची जागा व स्टरलायझेशन
(४) क्रिटिकल केअर कक्ष
(५) ह्दय शस्त्रक्रिया वॉर्ड
(६) अपघात कक्ष
(७) सर्व वॉर्ड
(८) रक्त पेढीची लॅबोरेटरी
(९) डॉक्टरांचे निवास स्थान
(१०) कॅन्टीन विभाग
(११) लॉण्ड्री विभाग

उपरोक्त विभागात स्नानासाठी, उपकरणे साफसफाईसाठी, निर्जतुकीकरणासाठी, ऑटोक्लेव्हसाठी, फ्लोअरींग साफसफाईसाठी तसेच कॅन्टीन विभागातील किचनसाठी व भांडी धुण्यासाठी गरम पाण्याची आवश्यकता लागणार आहे. या साठी सौर उर्जेचा वापर केल्यास मोठ्या प्रमाणावर वीज बचत होऊ शकेल. जिथे या सौर उर्जेच्या तापमानापेक्षा जास्त तापमानाचे पाणी लागणार आहे, त्याठिकाणी उपकरणामध्ये हे सौर उर्जेद्वारे मिळालेले गरम पाणी आधी वापरल्यास पुढे उच्च तापमानासाठी कमी वीज लागून विजेचा खर्चही कमी होईल. शिवाय वीजेच्या भारनियमनाचा यावर कोणताही परिणाम न होता २४ तास गरम पाण्याचा शाश्वत पुरवठा मिळू शकेल.

या सर्व विभागात रुग्णालयातील विविध प्रक्रियांसाठी गरम पाण्याची आवश्यकता लागणार आहे. यामध्ये खालील बाबी येतात. एकूण दिवसभरात लागणा-या गरम पाण्याची अंदाजे गरज खालीलप्रमाणे :-

०१) पेशंट (२०० कॉट ) फ्लोटींग (१५० +५०) - ०३७५० लि.

| | | | |
|---|---|---|---|
| ०२) | नातेवाईक (२००) + स्टाफ (१००) | - | ०४५०० लि. |
| ०३) | ऑटोक्लेव्ह मशिन्स् | - | ०१००० लि. |
| ०४) | वॉशिंग मशिन्स् | - | ०१५०० लि. |
| ०५) | स्टरलायझर्स | - | ००५०० लि. |
| ०६) | हॉस्पिटल फ्लोअर क्लिनिंग व इतर | - | ०२००० लि. |
| ०७) | वार्ड | - | ०१२५० लि. |
| ०८) | वाढीव तरतूद | - | ०३५०० लि. |
| | एकूण लिटर | - | १८००० लि. (अंदाजे ) |

उपरोक्त विद्यूत् वापराऐवजी जर सोलर सिस्टिमचा (अपारंपारीक उर्जेचा ) वापर केला तर वीजबीलात बचत होऊन शाश्वत गरम पाणीही मिळू शकेल. सध्याच्या काळात सर्व ठिकाणी वीज भारनियमन चालू आहे. भविष्यात वीज कपातीचे संकटही येऊ शकते. त्याकरीता सध्याच आणि विस्तारीकरणाचे कामातच सोलर सिस्टिम बसविली तर पर्यावरणाचे, वीजबचतीचे दृष्टीने ध्येय साध्य होऊ शकेल.

याबाबत महाऊर्जा, (मेडा) पुणे यांचेशी संपर्क साधला असता त्यांचे प्रकल्प अधिकारी श्री. श्रीकांत सराफ यांनी दिनांक ०२-०७-२००५ रोजी शिर्डी येथे भेट दिली व त्यांनी रुग्णालयाची समक्ष पाहणी केली. यानंतर त्यांनी २०० कॉटस्च्या रुग्णालयाकरिता सरासरी १८००० लिटर्सच्या सोलर सिस्टिमसाठी रु.१३०.०० प्रती लिटरप्रमाणे साधारणतः रुपये २३,४०,०००.०० इतका खर्च येऊ शकेल. व याकामी महाऊर्जामार्फत सौर उष्णजल सयंत्र बसविण्यासाठी प्रति लि. रुपये ७/- या दराने सेवाशुल्क आकारुन सयंत्र बसविण्याबाबत सर्वे करुन प्रस्ताव तयार करणे, संयंत्र बसविण्यासाठी निविदा मसूदा तयार करणे, प्राप्त निविदांची छाननी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, संयंत्र बसवत असताना किंवा आस्थापीत केल्यानंतर पाहणी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, इत्यादी सेवा पुरविल्या जातील. संयंत्रासाठी निविदा मागविणे व उत्पादकाला कार्यादेश देवून रक्कम आदा करण्याबाबतची कार्यवाही संस्थानला करावी लागेल. तरी याबाबत संस्थानचा निर्णय सदर मेडाच्या कार्यालयास कळवावा ही विनंती. असे लेखी कळविले आहे. उपरोक्त क्षमतेचे पाणी गिझरद्वारे मिळविण्यासाठी विद्युत् बीलाचा खर्च साधारणतः वार्षिक रुपये ११,००,०००.०० इतका येऊ शकतो. सौर उष्णजल सयंत्र बसविण्यासाठीचा खर्च साधारणतः दोन वर्षाच्या गरम पाण्यासाठी लागणा-या गिझरच्या वीजबील आकारा इतका असून या सौर उर्जा प्रकल्पासाठी लागणारा खर्च दोन वर्षातच भरुन निघू शकतो.

या प्रकल्पाचा एकूण खर्च रु.२३,४०,०००.०० + रू. १,२६,०००.००( महाउर्जा सेवाशुल्क ) = रु. २४,६६,०००.०० इतका अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावीत. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २४,६६,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७. खाजगी दिनदर्शिका विक्रीबाबत**
**निर्णय क्र.४५६.** मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) लि.मुंबई यांनी त्यांचे द्वारा दि १५.०७.२००५ रोजी चे दाखल झालेले पत्रानुसार त्यांनी संस्थानला देणगी दाखल दिनदर्शिका-२००५ जमा केले असल्याचे कळविले आहे.उपरोक्त देणगी दाखल खाजगी दिनदर्शिकांची संस्थानद्वारा विक्री करण्यात आली आहे. मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) लि.मुंबई यांचे द्वारा देणगी दाखल जमा दिनदर्शिकेचे भक्तांनी चांगले कौतुक केले असुन, त्यास भक्तांचा चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे त्यांनी वरील पत्राद्वारे कळविले आहे.

सन.२००४ मध्ये श्री.पांडे, मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) लि.मुंबई यांनी ३,३०० कॅलेंडर्स संस्थानला देणगी दिलेले होते. त्या कॅलेंडरची किंमत प्रत्येकी रूपये २५०/- प्रमाणे संस्थानने विक्री केली असून, ती आलेली रक्कम रू. ८,२५,०००/- (अक्षरी रूपये आठ लाख पंचविस हजार) मात्र देणगी म्हणून संस्थानमध्ये जमा केले आहेत.

मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) लि.मुंबई यांनी दिनदर्शिका २००५ प्रमाणे त्याच धर्तीवर दिनदर्शिका २००६ ह्या वर्षासाठी छपाई करण्याचे नियोजन असल्याचे कळवून, सदर दिनदर्शिकेसाठी ते चांगल्या प्रकारचा फोटोग्राफ्स डिझाईन वापरणार असून, त्यासाठी खास वेगळे टेक्नीक वापरणार असलेबाबत

कळविले आहे. सदरच्या दिनदर्शिका साईभक्तांना खूपच आवडतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) लि.,मुंबई यांनी वरील तपशिलानुसार नमूद केलेप्रमाणे संस्थानचे नावाने सन.२००६ साठी एकूण २०,००० दिनदर्शिका देणेविषयी सूचित केले आहे. मात्र या कॅलेंडर्सच्या निर्मितीचा खर्च त्यांना झेपवणार नाही. त्यासाठी छपाईकामी त्यांनी प्रत्येक दिनदर्शिका नगासाठी रू.१५०/- मात्र नुसार होणारी रक्कम संस्थानने देणेविषयी कळविले असून, संस्थानद्वारा त्यांची प्रती नगास रू.२५०/- मात्र प्रमाणे विक्री केल्यास संस्थानला रू.२०,००,०००/- मिळतील असे सूचित केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८.** **नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयामधील कॅंटीन, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे इलेक्ट्रीक वायरिंग करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५७.** नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकडे कॅन्टीनचे, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे बांधकाम चालू आहे. या बांधकामाचे टेंडरचे वेळी टेंडरमध्ये इलेक्ट्रीक वायरींगचा समावेश करण्याचे या कामाचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नासिक यांच्याकडून राहून गेले होते.

कॅन्टीनचे बांधकाम चालू झाल्यानंतर इलेक्ट्रीक कामाबाबत त्यांनी इलेक्ट्रीक कामाचा समोवश टेंडरमध्ये राहून गेला असल्याचे परंतु इलेक्ट्रीक कामाबाबत लवकरच लेआऊट प्लॅन व इस्टिमेट पाठवितो म्हणून सांगितले.

आता आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नासिक यानह कॅन्टीन, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे इलेक्ट्रीक कामाचा लेआऊट प्लॅन व एस्टिमेट पाठविले असून या कामासाठी रुपये २,७२,६५३.०० इतका खर्च कळविला असून सदर कामास व सदरहू काम सुरु करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयामधील कॅटीन, डॉक्टर निवासस्थाने व फार्मसी विभागाचे इलेक्ट्रीक वायरिंग करणेकामी कोटेशन्स मागविण्यात याव्यात असें ठरलें. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९.** **शिधा सामुग्री मिळणेबाबत**

**निर्णय क्र.४५८.** समस्त गावकरी, सप्ताह कमिटी सावरवेस (परिसर ) व श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान, शिऊर ता.वैजापूर जि.औरंगाबाद यांनी त्यांचे २६० वा अखंड हरिनाम सप्ताह दिनांक १०.०८.२००५ ते दिनांक १७.०८.२००५ या कालावधीत होणार असून त्यास शिधा वा आर्थिक स्वरुपात मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०.** **श्री दत्तात्रय चंद्रकान्त हजारे, वर्ग-४ चे कर्मचारी यांना संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५९.** श्री दत्तात्रय चंद्रकांत हजारे यांचे दि.२२/०२/२००३ पासून वर्ग-४ पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी पहिल्या वर्षासाठी रु.२०००/- व दुसऱ्या वर्षासाठी रु.२५००/- नियत वेतनावर नेमणूक करण्यात आलेली आहे.दि.२१/०२/२००५ अखेर त्यांची *दोन वर्षाची* परिवीक्षाधीन कालावधीची मुदत संपल्यानंतर त्यांना वर्ग-४ पदाची वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० देऊन सेवेत कायम करण्यासाठीचा प्रस्ताव दि.२९ जानेवारी २००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर केला होता.त्यावर सभेत चर्चा होऊन निर्णय क्र.३३ नुसार,त्यांना वेतनश्रेणी न देता " जैसे थे " परिस्थिती ठेवून आहे त्या अटी-शर्तीवर रु.२५००/- मासिक नियत वेतनावर त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात आली आहे सदरचे निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/६८५/२००५ दि.३०/०३/२००५ चे आदेशान्वये तशी कार्यवाही चालू आहे.

आता, श्री हजारे यांनी त्यांना वर्ग-४ पदाची वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत दि.२३/०७/२००५ रोजीच्या पत्राने विनंती केलेली आहे.

दि.३१/०७/२००५ रोजी मा.अध्यक्ष सो.शिर्डी येथे आले असतांना श्री हजारे यांचेबाबत त्यांचेशी चर्चा झाली चर्चेअंती " श्री हजारे यांना वर्ग-४ चे पदाची वेतनश्रेणी देऊन सेवेत कायम करावे व सदरची कार्यवाही दि.०१/०८/२००५ पासून त्वरीत करण्यात यावी. " अशी मान्यता वजा तोंडी आदेश मा.अध्यक्ष सो.यांनी दिलेले आहेत.

मा.अध्यक्ष सो.यांचे सूचनेनुसार श्री हजारे यांना दि.०१/०८/२००५ पासून वर्ग-४ पदाची वेतनश्रेणी रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० मंजूर करुन सेवेत कायम करणेबाबतच प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

( कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११.** **श्री आर.डी. चौधरी, प्र.प्राचार्य, आय.टी.आय यांना जादा पाच वेतनवाढी मंजूर करणेबाबत**

**निर्णय क्र.४६०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२.** **कंत्राटी पद्धतीने तात्पुरते कालावधीसाठी नियुक्त केलेल्या रेसिडेंट मेडिकल ऑफिसर (इ.एन.टी.) यांच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.४६१.** दि.११/०९/२००४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२५ नुसार दरमहा रु.४५००/- एकत्रीत मानधनावर कंत्राटी पध्दतीने डॉ.स्नेहल दिनकर पाटील यांची संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये आर. एम. ओ. (नाक,कान,घसा) या पदावर प्रथमतः सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आली.त्यानुसार त्या दि.०९/०८/२००४ रोजी नेमणूकीच्या पदावर हजर झाल्या सदर सहा महिन्यांची नेमणूक संपल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८४ नुसार दि.०९/०२/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी पुर्वीच्याच अटी शर्तीवर त्यांची नेमणूकीची मुदतवाढ करण्यात आली.सदरची त्यांची नेमणूकीची मुदत दि.०८/०८/२००५ अखेर संपुष्टात येत आहे. डॉ.स्नेहल दि.पाटील यांनी दि.२५/०७/२००५ रोजी अर्ज करुन त्यांचे कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदतवाढ सहा महिन्यांसाठी वाढविण्याबाबतची विनंती केली असून,त्यावर वैद्यकीय अधिक्षिका श्री साईनाथ रुग्णालय यांनी," डॉ.स्नेहल पाटील ह्या इ.एन.टी.विभागाचे रेसिंडेट मेडीकल ऑफीसर म्हणून कार्यरत आहेत व त्यांच्या सेवेचा दैनंदिन ओ.पी.डी.मध्ये येणाऱ्या नाक कान घसा या रुग्णांना लाभ होत आहे तसेच डॉ.आर.के.कुलकर्णी; वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांना दैनंदिन कामात मदत होत आहे.डॉ.आर.के.कुलकर्णी हे रजेवर गेल्यानंतर रुग्णालयाचे दैनंदिन कामकाजात अडचण येऊ नये म्हणून डॉ.स्नेहल पाटील कंत्राटी आर.एम.ओ.(नाक, कान, घसा) यांची सेवा पुढे चालू ठेऊन सहा महिन्याकरीता मुदतवाढ मिळावी." असे अभिप्राय दिलेले असून त्यावर प्रशासकीय अधिकारी व वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी संमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

वैद्यकीय अधिक्षिका; रुग्णालय व प्रशासकीय अधिकारी/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ.स्नेहल दि.पाटील, कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या आर.एम.ओ.यांची पुर्वीच्याच अटी-शर्तीवर दरमहा रु.४५००/-एकत्रीत मानधनावर दि.०९/०८/२००५ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी मुदत वाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३.** **संस्थानचे शिरडी येथील सर्व्हे न.१०७ मधील मोकळया जागेत साईभक्तांचे निवासासाठी डॉरमेंटरी हॉल्स (लॉकरसह) बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६२.** शिरडी येथील श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर परदेशातून सुद्धा दररोज हजारो संख्येने भक्त येत असतात. श्री साईबाबा हे लाखो भारतीयांचे श्रध्दास्थान आहेत. श्री साईबाबांच्या सर्वधर्म समभावाच्या संदेशास विद्यमान कालावधीत अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. शिरडी हे तीर्थक्षेत्र जगातील लाखो भविकांचे लक्ष वेधीत आहे. त्यामुळे दर्शनासाठी येणा-या भक्तांची गर्दी दररोज वाढत असून संस्थानची उपलब्ध निवासव्यवस्था दिवसेंदिवस अपुरी पडत आहे.

संस्थानचे सर्व्हे क्र. १४८/२ मधील जमिनीवर निवासी खोल्या इमारतीचे बांधकाम लवकरच हाती घेण्यात येत आहे. या खोल्या संलग्न टॉयलेटच्या असून त्या एका कुटूंबासाठी उपयुक्त आहेत. तथापि, बसद्वारे मोठ्या गटाने येणा-या साईभक्तांसाठी डॉरमेटरी व लॉकरची व्यवस्था असणे गरजेचे आहे. संस्थान मालकीचे शिर्डी येथील स.नं. १०७ मधील वाहन विभागाच्या पूर्वेस असलेल्या मोकळ्या जागेवर साईभक्तांसाठी डॉरमेटरी हॉल्स (लॉकर्ससह) इमारत बांधकाम हाती घेता येईल. सदर जागेचे क्षेत्रफळ २५५२१.०० चौ.मी. (६.३८ एकर ) इतके आहे. सदर जागेवर १९१४१.०० चौ.मिटर चटई क्षेत्राचे बांधकाम करता येईल. या इमारतीमध्ये सुमारे २५०० व्यक्तींची निवासाची व्यवस्था होईल. तथापि, सदर जागा सध्या संस्थान शैक्षणिक संकूल क्रिडांगणासाठी वापरात आहे. त्यामुळे क्रिडांगणासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करावी लागेल.

प्रस्तावीत जागेच्या समोर (उत्तरेस ) सध्या संस्थानचा सेंद्रीय खत तयार करण्याचा प्रकल्प कार्यान्वित आहे. सदरहू प्रकल्प संस्थानने घेतलेल्या शेती महामंडळाचे जागेत स्थलांतरीत करता येईल व या जागेत साईभक्तांच्या गाड्यांची (मुख्यत: बसेस ) पार्किंग व्यवस्था करता येईल.

उपरोक्त डॉरमेटरी हॉल (लॉकर्ससह ) इमारतीमध्ये खालील सुविधा देता येतील.

१) प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र बेड.

२) प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र लॉकर.

३) कॉमन टॉयलेट व्यवस्था.

४) पार्किंग व्यवस्था,

५) किचन व डायनिंग शेड.

याप्रमाणे नियोजीत इमारतीचे बांधकामास प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

बांधकाम क्षेत्र १९१४१.०० चौ.मी. x दर रु. ५९१८.००प्रति चौ.मि.= रु.११,३२,७६,४३८.००

(अकरा कोटी बत्तीस लक्ष शहात्तर हजार चारशे अडतीस मात्र )

सदर प्रकल्पासाठी शासनाचे हुडको या संस्थेकडून अनुदान मिळू शकेल काय, याबाबत माहिती घेण्यात येत आहे.

तरी उपरोक्त प्रकल्पासाठी तत्वत: मान्यता मिळणेस व आर्किटेक्ट यांची नेमणूक होणेसाठी मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेपुढे सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होवून वरीलप्रमाणे डॉरमेटरी हॉल्स (लॉकरसह) बांधकामासाठी तत्वत: मान्यता देणेत आली. तसेच सदर कामासाठी आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करुन त्यांचेकडून प्लॅन व तपशिलवार एस्टिमेट तयार करुन घ्यावेत असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४. शिरडी येथे उद्यान विकसित करणेबाबत**

**निर्णय क्र.४६३.** श्री साईबाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जातात. त्यामुळे शिर्डी या महत्त्वाच्या धार्मिक स्थळाला भेट देण्यासाठी संपूर्ण देशातून त्याचप्रमाणे परदेशातून येणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. शिर्डी येथे साईभक्तांच्या सोयीसाठी आजपावेतो अनेक विकास प्रकल्प संस्थानतर्फे उभारण्यात आलेले आहेत. त्यामध्ये लेंडीबाग,धर्मशाळा, नवीन भक्तनिवासस्थान, धर्मशाळा या ठिकाणी बगीचा विकसीत करण्यात आलेला आहे. परंतू एकाच ठिकाणी सलग व विस्तीर्ण स्वरुपातील उद्यान सध्या शिर्डी परिसरात उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारचे विस्तीर्ण स्वरुपातील उद्यान शिर्डी येथे निर्माण करणे आवश्यक आहे. सदर उद्यान हे मौजे निमगांव - को-हाळे येथील शेतीमहामंडळाकडून संपादित केलेल्या जमिनीवर निर्माण करता येईल. त्यासाठी सुमारे १५ ते २० एकर इतके क्षेत्र लागेल. नियोजीत उद्यानामध्ये खालील सोयीं-सुविधांचा अंतर्भाव करता येईल.

१. सुशोभित फुलझाडे, हिरवळ, कारंजे, धबधबा इ.

२. श्री साईबाबांचे चरीत्र व शिकवणीवर आधारीत देखावे.

३. ॲम्युझमेंट पार्क - लहान मुलांचे करमणुकीसाठी खेळाची उपकरणे

४. औषधी वनस्पतींचे धन्वंतरी उद्यान.

५. कॅन्टीन तसेच डबे खाण्यासाठी शेडस्.

६. टॉयलेट ब्लॉक.

७. सिक्युरिटी केबीन, कार्यालय.

८. नगर- मनमाड रस्त्यापासून उद्यानाचे प्रवेशद्वारापर्यंत पक्क्या स्वरुपाचा रस्ता.

९. नियोजीत उद्यानासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी लागेल.त्यासाठी पिण्याचे पाणी वापरण्याऐवजी सांडपाणी शुद्धीकरणातून पाण्याचा पुनर्वापर करणेबाबत विचार करता येईल.

दि. १३/०३/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे वरील प्रमाणे उद्यानाचे नियोजीत कामासाठी प्रथम तपशिलवार डिझाईन,एस्टीमेटसह प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणेसाठी लॅण्डस्केप आर्किटेक्ट व हॉर्टीकल्चरीस्ट यांची संयुक्तरित्या नेमणूक करण्यास निर्णय क्र. १०५ अन्वये मान्यता देणेत आली.

मौजे निमगांव - को-हाळे येथे संस्थानने शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या क्षेत्रापैकी गट नं. १९८, १९९, २०० व २०१ सर्व मिळून एकूण क्षेत्र ८ हेक्टर २० आर (२०.५० एकर) या जागेवर उद्यान विकसीत करणेकामी आर्किटेक्ट सुरेश घोरपडे असोसिएटस्, मुंबई यांनी तयार केलेला आराखडा आजचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला.

यावर सविस्तर चर्चा होवून याकामी प्रथम वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरहू क्षेत्रातील नामांकित सल्लागारांकडून अर्ज मागविण्यात यावेत असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५. "श्री" चे समाधी मंदिराचे दक्षिण दरवाज्यास बुलेटप्रूफ काच बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.४६४.** 'श्री' चे मंदीराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मा. पोलीस अधिक्षक यांनी 'श्री' चे समाधी मंदीराचे दक्षिण बाजूचे दरवाज्यास बुलेटप्रूफ काच बसविण्याची सूचना केली आहे. २४ एम एम जाडीची ७२"x३६" आकाराची बुलेट रेजिस्टंट काच बसविणेकामी अंदाजे रुपये ३५,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. अशा प्रकारचे काचेचे काम करणा-या मे. प्रकाश ग्लास ट्रेडर्स भांडूप, मुंबई व मे.जी.एस.सी. टंगस्टन ग्लास प्रा.लि., अंधेरी, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आलेली आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | सप्लायरचे नांव | तपशील | दर प्रति चौ.फूट | |
|---|---|---|---|---|
| ०१ | Prakash Glass, Mumbai | सुमारे ४८ एम एम. जाडीची बुलेट रेझिस्टन्स ग्लास | २८५०.००<br>३५६.२५<br>३२०६.०० | रु. प्रती चौ.फूट<br>रु. १२.५ % वॅट<br>रु.इतर टॅक्सेस सह मुंबई येथील दर असल्याचे सांगितले. |
| ०२ | G.S.C. Toughened Glas, Pvt. Ltd. Mumbai | ५२ एम एम जाडीची SLR (Assault Rifle ) | २३६९.८९<br>३८६.७७<br>२३६.९९<br>०९.००<br>३००२.६५ | रु. प्रती चौ.फूट (२५,५००/ Sqm)<br>रु. १६.३२ % excise<br>रु. १०% CST<br>रु. ०.३८% Insurance<br>रु. एकूण रु. ५४,०४७.७०<br>दूरध्वनीवर त्यांनी Vat सह मुंबई येथील दर आहेत असे सांगितले. |

वरील दोन सप्लायरांच्या दरांचा विचार करता अ.नं. २) G.S.C., मुंबई यांचा दर निम्नत्तम आहेत. त्यांचेकडून काच खरेदी करणेकामी वहातुकी व्यतिरिक्त रु. ५४,०४७.०० मात्र खर्च येईल. वरीलप्रमाणे बुलेटप्रूफ काच G.S.C., मुंबई यांचेकडून खरेदी करणेसाठीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६. जनसंपर्क कार्यालयासमोर शेड (Awning) तयार करणेबाबत**

**निर्णय क्र.४६५.** संस्थानचे जनसंपर्क कार्यालयासमोर 'श्री' चे दर्शनाकरिता व्ही.आय.पी. करिता दर्शन/ आरती पास घेण्यासाठी, संस्थानचे इतर कार्यक्रमाची माहिती तसेच देणगी व मंदीरातील इतर सुविधांबाबत ' साईभक्त ' जनसंपर्क कार्यालयासमोर उभे राहत असतात. पावसाळ्यात व उन्हाळ्यात साईभक्तांना त्रास होवू नये याकरिता शेड (Awning ) तयार करणेबाबत मा. अध्यक्ष यांनी सूचना केली आहे. याकामाकरिता खालील एजन्सीकडून दरपत्रक मागविण्यात आलेली आहेत.

१. डेकोर फ्लेक्स, दमण, मुंबई
२. आनंद एस. शैलन्द्रा, नाशिक
३. पल्लवी एजन्सी, नाशिक

दरपत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **एजन्सीचे नांव** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **डेकोर फ्लेक्स. दमन** | | **पल्लवी, नाशिक** | | **आनंद शिंकदर, नाशिक** | |
| ०१ | Water Proof & Washable Fabrics ३६'x१०' = ३६० चौ.फूट | १२५<br>४५०००<br>३५००<br>४००<br>५२५०० | प्रती चौ. फूट<br>ट्रान्सपोर्ट<br>लेबर व Fixing | १४४<br>५१८४०<br>५७६०<br>६४६०<br>६४०८० | प्रती चौ.फूट<br><br>लेबर व Fixing<br>१२.५% Vat | १७०<br>१५० | प्रती चौ.फूट<br>प्रति चौ. फूट |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील दरांचा विचार करता , डेकोर फ्लेक्स, दमन यांचे दर कमी स्वरुपाचे आहेत. याप्रमाणे Awning शेड डेकोर फ्लेक्स, दमन यांचेकडून करुन घेणे बाबत निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. प्रसाद लाडू बाबत.**

**निर्णय क्र.४६६.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०५.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२११ अन्वये यापुढे साईभक्तांना प्रत्येकी ७५ ग्रॅम वजनाचे दोन प्रसाद लाडू रुपये १०/- प्रति पाकिट या दराने विक्री करण्यात यावी असे ठरलेले आहे.

परंतु, प्रत्येकी ७५ ग्रॅमचे दोन प्रसादलाडू ऐवजी प्रत्येकी ५० ग्रॅमचे तीन प्रसाद लाडू देण्यात यावेत, अशी साईभक्तांची मागणी आहे.

याकरीता साईभक्तांना प्रसाद रुपाने पूर्वीप्रमाणेच प्रत्येकी ५० ग्रॅम वजनाचे तीन प्रसाद लाडू रुपये १०/- प्रति पाकिटास या दराने देण्यात यावेत. तसेच तिरुपती बालाजी देवस्थानाप्रमाणे १५० ग्रॅम वजनाचा एक प्रसादलाडूही रुपये १०/- या दराने विक्रीस ठेवणेत यावा, असें ठरले.

(कार्यवाही- प्रसादालयप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी नियुक्तीबाबत.**

**निर्णय क्र.४६७.** श्री साईबाबा संस्थानचा कारभार हा दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे. संस्थान पत्रव्यवहार, शासकीय पत्रव्यवहार व विविध प्रस्तावावार शासकीय मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करणे याकामी मराठी, हिंदी, इंग्रजी पत्रव्यवहार स्वतंत्ररित्या पाहू शकणाऱ्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी, एम.बी.ए. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त तसेच ज्या उमेदवाराचे वय ३५ ते ४५ पेक्षा जास्त नाही व ज्यांना सध्या रुपये २५,०००/- पेक्षा कमी वेतन मिळत नाही अशा पात्र उमेदवारांकडून ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी या पदावर नियुक्ती होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत असे ठरले.

याचवेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे कार्यरत असलेले विभाग बदलण्यात यावेत.

तसेच ऐच्छिक रिटायमेंटबाबतही शासकीय जी आर असल्यास अथवा ज्या संस्थांनी /बँकांनी व्हीआरएस ची योजना कार्यान्वीत केलेली आहे. अशा संस्था अथवा बँकाकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व यथायोग्य प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६८.** पुणे विद्यापीठात संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री नामदेव महाराज यांचे अध्यासन आहे. त्याचप्रमाणे श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेबाबत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा. श्री अशोक कोळस्कर यांची मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांनी समक्ष भेट घेऊन चर्चा करावी असें ठरले.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी/अध्यक्ष/उपाध्यक्ष)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. कर्मचाऱ्यांचे आगमन निर्गमन वेळेकरीता फिंगर प्रिंट मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४६९.** संस्थान कर्मचाऱ्यांचे कामावर येण्याचे व जाण्याचे वेळेबाबत नोंद ठेवण्यासाठी संगणकीकृत व्यवस्था (Prio-metrix Attendence Systeem) खरेदी करणेकामी नामांकित कंपन्याकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत, असें ठरले.

(कार्यवाही - कामगार अधिकारी )

वरील निर्णय क्र. ३८९ ते ४६९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )